
साप्ताहिक

# माणूस

१५ डिसेंबर ८४/२ रुपये

## उत्तर प्रदेशाच्या रिंगणात



साप्ताहिक

माणूस

वर्ष : चोविसावे

अंक : एकूणतिसावा

१५ डिसेंबर १९८४

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ

सुरेश नावडकर



# मुंबापुरी

## ☐ इंदिरावादी काँग्रेस-अरेरे !

महाराष्ट्राचे कागदी वाघ अब्दुल रेहमान अंतुले ह्यांनी बंडाचा झेंडा उभारला आहे. ह्या देशातील लोकशाही मूल्यांची जपणूक करण्यासाठी आणि तळागाळातील माणसाला न्याय मिळवून देण्याकरता त्यांनी इंदिरावादी काँग्रेस पार्टी काढली आहे.

अंतुल्यांचा दावा आहे की, अठ्ठ्याहत्तर-मध्ये काँग्रेस त्यांच्या दिल्लीच्या घरात फुटली. शंभर वर्षांचा जुना पक्ष आमच्या घरात फुटला असता तर आम्ही स्वतःला कपाळ-करंटे म्हणवून घेतले असते; पण अंतुल्यांना तसे वाटत नाही. इंदिरा गांधी हयात असता-नाही त्यांच्या संमतीखेरीज अंतुल्यांनी त्यांच्या नावाचा वापर प्रतिष्ठानासाठी केला होता. त्यामुळे आता त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या नावाचा वापर करायला कुणाची परवानगी काढायची त्यांना आवश्यकता भासली नाही.

अंतुल्यांच्या ह्या पक्षात भाऊराव पाटील, राम पंडागळे, गुलाबराव पाटील, रविंद्र राऊत अशा नररत्नांचा भरणा आहे. भाऊराव आणि राम पंडागळे यांच्याबद्दल आम्ही पामरांनी काय सांगावे ? अरेबियन नाइटस् (गौरी देशपांड्यांनी भाषांतरीत केलेले, फुलामुलांचे अरेबियन नाइटस् नव्हे) सपक ठरावे इतका ह्या जोडगळीचा राजकीय प्रवास सुरस आणि चमत्कारिक आहे.

अंतुल्यांच्या ह्या पक्षाला विदर्भाचे सिंह जांबुवंतराव धोटयांचाही पाठिंबा आहे. ह्या सिंहाने गेल्या पाच वर्षात लोकसभेतत कधी डरकाळ्या फोडल्या नाहीत; पण संसदेबाहेर 'जागो' चित्रपटात ह्या विदर्भाच्या सिंहाला आम्ही एका फडतूस नवतारकेभोवती गरा-गरा चकरा मारताना पाहिले आहे.

मागे एकदा काँग्रेस आयचे जनरल सेक्रे-टरी मुपनार यांची सह्याद्रीच्या पहिल्या मजल्यावर पत्रकार परिषद झाली. खाली आवारात काय गडबड चालली आहे म्हणून त्यांनी चौकशी केली तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, जांबुवंतरावांच्या 'जागो' चित्र-पटाचे शूटिंग चालले आहे. मुपनारांनी कपाळावर हात मारला. त्यांचा ऑफ द रेकॉर्ड रिमार्क होता 'गॉड सेव्ह द पार्टी.'

लोकशाही मूल्यांची आणि गरिबांच्या उद्धाराची भाषा अंतुले, भाऊराव, पंडागळे आणि धोटे यांच्या सारख्यांनी करावी ह्या-सारखी लोकशाहीची शोकांतिका नाही.

याहूनही उद्विग्न करणारी घटना म्हणजे जनता पार्टीचे अध्यक्ष चंद्रशेखर यांची निवड-णुकीत अंतुल्यांना साहाय्य करण्याची मुंबा-पुरीत केलेली घोषणा. याच पक्षाच्या मृणाल गोरे आणि पी. बी. सामंतांनी अंतुल्यांचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी जिवाचे रान केले आणि आता त्याच पक्षाच्या पदयात्रींना अंतुल्यांच्या कुशीत विसावा घेण्याची बुद्धी सुचते याला काय म्हणावे ? ही कोठली राजकीय नीतिमत्ता ? हजारो मैल चालून आल्यावरही चंद्रशेखरांचे पाय आता निवडणुका जवळ आल्यावर लटपटा-यला लागावे ह्याचेच आम्हाला नवल वाटते.

कागदी वाघाचे कागदावर सतत नाव छापून आले की, त्यांच्या डरकाळ्या खऱ्या वाटू लागतात. अंतुल्यांच्या बाबतीत असेच झाले आहे. अंतुले कॉपी चांगली देतात म्हणून दर दोन अंकांनंतर मुंबापुरीतील रंगीबेरंगी मासिके अंतुल्यांवर कव्हर स्टोरी करतात. आजकाल राम जेठमलानींच्याही कृपेने त्यांचे नाव वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर झळकते. 'बदनाम हुआ तोभी...'

आपल्या नावाचा प्रसिद्धी माध्यमात सतत राबता असावा ह्यासाठी अंतुल्यांनी काही पत्रकार हाताशी बाळगले आहेत. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या काळात त्यांनी ह्या पत्र-कारांच्या घरादाराची सोय केली. त्यामुळे

अंतुल्यांचे हे उपकार उभ्या आयुष्यात तरी फिटतील काय असा प्रश्न ह्या पत्रकारांना पडला असावा. म्हणूनच 'अंतुले पवार जॉइंट कॅम्पेन' ह्यासारख्या बातम्या अचानक वृत्तपत्रांतून दिल्या जातात. काँग्रेस एसच्या आबासाहेब कुलकर्ण्यांनी तत्काळ दुसऱ्या दिवशी ह्या बातमीचा इन्कार केला. मागे अंतुल्यांच्या मरीन ड्राइव्हवरील घरात झालेल्या एका पत्रकार परिषदेत एका पत्रकाराने 'साहेब, आता परत मंत्रालयात तुमचे दर्शन केव्हा होणार?' असा रुद्ध कंठाने प्रश्न केला होता.

तात्पर्य काय, तर जमल्यास काँग्रेस आयच्या सहाय्याने, न जमल्यास विरोधी पक्षांच्या मदतीने, अंतुले सत्ता काबीज करतील. त्यामुळे तळागाळाच्या गरिबांनी आता निश्चित झोप घेण्यास हरकत नसावी.

## ☐ प्रचाराचा नारळ

निवडणुका जाहीर होऊन जवळजवळ तीन आठवडे लोटलेत, तरी मुंबईत हवा अद्याप तापायची आहे. सभा, पदयात्रा होतायेत, प्रभात-फेऱ्या झडतायेत; पण किक् अजून काही लागत नाहीये.

नाही म्हणायला चंद्रशेखर-वाजपेयी गेल्या रविवारी जनता-भाजप प्रचाराचा नारळ फोडून गेले. चंद्रशेखरांनी अंतुल्यांवर स्तुति-सुमनं उधळून विरोधी पक्षांसमोर कुजका नारळ ठेवला, तर वाजपेयींनी शिवतीर्थावर शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्यासह जोडीने प्रचाराचा नारळ फोडून एकमेकांना प्रेमाच्या आणाभाका दिल्या.

ठाकऱ्यांनी आपल्या भाषणात भाजप-जनता-युती ही विचारांची युती असल्याचं सांगितलं, तर त्यांच्याच पक्षाच्या मनोहर जोशींनी 'आपण निवडून गेल्यास हिंदू खासदार म्हणून काम करणार' असं जाहीर करून युतीची वैचारिक बैठक स्पष्ट केली.

मऱ्हाठी मनावरचा आपला ताबा आता सुटत चालल्याचं पाहून शिवसेनेनं आता हिंदुत्वाचा झेंडा फडकवला आहे. ठाकऱ्यांचा उल्लेख मनोहर जोशींनी 'हिंदूहृदयसम्राट' असा केला; पण त्यामुळे वर्षभरापूर्वी मुंबईच्या मशिदीमशिदीतून ईदचा नमाज पढायला गेलेल्या राम नाईक, डॉ. प्रभाकर पै प्रभृती भाजप-नेत्यांची मोठी पंचाईत झाली!

वाजपेयींनी दुसऱ्या दिवशीची पत्रकार परिषद अचानक आयत्या वेळी रद्द केली याचं मुख्य कारण म्हणजे शिवसेनेची युती. भाजपचेच ज्येष्ठ नेते राम जेठमलानी या युतीविरुद्ध असल्याचं बोललं जातंय. राम जेठमलानी ज्या मुंबई उत्तर-पश्चिम मतदार संघातून निवडणूक लढवत आहेत, तिथे तर भाजप-सेना-युतीचे दुष्परिणाम जेठमलानींना भोगावे लागतील. कारण या मतदारसंघातील पार्ला-जुहू विभागातला उच्चभ्रू, धनिक वर्ग सेनेला पसंत करणार नाही.

पत्रकारपरिषदेत या युतीवरून उगीच 'इन्कन्व्हिनियन्ट' प्रश्न विचारले जातील या चिंतेने व्याकूळ होऊन भाजपच्या मुंबई-नेत्यांनी सी. सी. आय. मधली ही प्रेस कॉन्फरन्सच रद्द केली. याचा परिणाम मात्र हा झाला की वाजपेयी प्रेसला टरकले असा आम्हा पत्रकारांच्यात आठवडाभर विनोद सुरू होता.

तिकडे, चंद्रशेखर दोन दिवसाच्या मुक्कामात ज्याला त्याला अंतुल्यांचं महत्त्व सांगत सुटले. आपण अंतुल्यांना पाठिंबा देणार नाही; पण अरुण नेहरू आणि मंडळींपेक्षा अंतुले उजवे आहेत आणि काँग्रेस (आय)चा पराभव करण्यासाठी कोणत्याही शक्तीशी आम्ही हात मिळवणी करू असे खुल्लमखुल्ला गर्भित इशारे चंद्रशेखरांनी टाकले. समझनेवालेको इशारा काफी है!

## ☐ रसोत्सव

डिसेंबरची गुलाबी थंडी काही अजून जाणवत नाहीये. तरी या मोसमातली दुसरी ऊबदार खुमारी मात्र जाणवू लागली. नोव्हेंबर-डिसेंबरच्या या रगदार दिवसात मुंबईत रसोत्सवाचे अन स्वरोत्सवाचे जागोजागी दिवे लागतात.

याची पहिली सुरुवात गेल्या महिन्याच्या मध्याला डॉ. मल्लिकार्जुन मन्सूरच्या मैफलीने झाली. मन्सूरजींना ऐकणं हा एक आनंद आहे. त्यात त्यांचा 'मूड' लागला असल्यास तर दुधात साखर! एनसीपीएची डॉक्टरांची मैफल अविस्मरणीय झाली.

सेंट झेवियर्सच्या म्युझिक ग्रुपने नवोदित कलाकारांची एक मैफल सादर केली. तर अंजली गुप्ता या सुखदेवमहाराजांच्या तालमीत तयार झालेल्या निष्णात कथक नर्तिकेने 'कथकका अनुभव' हा खूपसा वेगळा असा कथक-प्रयोग तेजपालमध्ये सादर केला.

बोल्शोय मंडळी आपल्या अनुपमेय नृत्याविष्काराचे शिल्प मुंबईकरांच्या मनात कोरून गेली. तर तिथे अमेरिकन सेंटरने एकोणिसशे तीसच्या प्रचंड मंदीच्या काळात हॉलिवुडने निर्मिलेल्या म्युझिकल्सचा धावता आलेख सादर केला.

चार्लीचा 'द ग्रेट डिक्टेटर' दुपारच्या शोला 'स्टर्लिंग'मध्ये जोमात चालू आहे तर ज्युली ऍंड्रूजचा 'साउंड ऑफ म्यूझिक' आकाशवाणी सभागृहात गर्दी खेचत आहे.

नौदलसप्ताह आणि जंबो सर्कसचा नशा आहेच अन् अगदीच बोअर झालात तर प्रफुल्ला डहाणूकरचा बजाज आर्ट गॅलरीतला रंगोत्सव बघून या रंगून जाल, पुन्हा रेशमी चिमटे घ्यायला गॅलरी पंडोलमध्ये मारियो मिरांडा कुंचला घेऊन आहेच ना तयार!

— विष्णू जयदेव

## खुलासा

☐ 'माणूस'चा १ डिसेंबर ८४ चा अंक पोचला. आभारी आहे. मुलाखती वाचल्या. श्री. संजय संगवई यांनी माझी मुलाखत घेतली आहे; पण शब्दांकन करताना कमी-अधिक होत असते, तसे थोडे येथे झाले आहे. निवडणुकांच्या संदर्भात दलितांना कोणतीच भूमिका नाही, त्यामुळे त्यांना लाभ मिळेल तिकडे ते मते देतील, असे केलेले शब्दांकन माझे म्हणणे जसेच्या तसे न पकडता आल्यामुळे झाले आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पक्षात अनेक गट झाल्यामुळे संघटन नाही. त्यामुळे जो पक्ष दलितांचे प्रश्न सोडवील त्याला दलित मत देतील असे माझे मत. राजीव गांधी व प्रकाश आंबेडकर ह्यांच्या घराण्यांचा एकत्र निर्देश कशासाठी? 'प्रकाश आंबेडकरांमागे कोण आहे?' असे विधान मी अजिबात केलेले नाही. कारण ते अवास्तव आहे. मी एवढेच म्हटले की, बाबासाहेबांचे नातू असूनही प्रकाश आंबेडकरांना संपूर्ण समाजाचा पाठिंबा नाही. ह्याचे कारण दलित समाज गटागटात विभागला आहे. तेव्हा संगवईंनी गैरसमज पसरविणारे विधान माझ्या तोंडी घालायला नको होते. दलित समाज राजीव गांधींना मानतो किंवा राजीव गांधींबद्दल पानतावणे खूपच चांगले बोलले यासारख्या विधानांशी माझा संबंध जोडून नेमके काय साधायचे आहे कुणास ठाऊक!

१ डिसें. १९८४. गंगाधर पानतावणे
औरंगाबाद

राजधानी दिल्ली

# ज्ञान–ए–शौकची हवा

इंदिरा गांधींच्या हत्येनंतरचे दुखवटयाचे बारा दिवस संपले. हिंसाचाराचे वादळ दिल्लीत भरकटून नाहीसे झाले. संपूर्ण दिल्लीवर पसरलेली सुतकी अवकळा विरत चालली नि हिंसाचारात होरपळलेल्यांनी हळूहळू स्वतःला सावरायला सुरुवात केली. राखेचे ढिगारे उपसून नव्या मांडणीने उद्योगधंद्यांना प्रारंभ झाला. जवळजवळ सर्व भागातील कर्फ्यू उठवला गेला...... आणि दिल्लीतील जनजीवन पुन्हा सुरळीत सुरू झाले.

'रामकृष्णही आले गेले
त्याविण जग का ओसचि पडले ?
कुणी सदोदित सुतका धरिले ?...'

इंडियागेटच्या हिरवळीवर मुलांच्या पुस्तकांचे प्रदर्शन भरत असल्याची घोषणा झाली आणि दहा दिवस सक्तीच्या, उदासवाण्या सुट्टीला कंटाळलेली दिल्लीतील मुले आनंदाने प्रफुल्लित झाली. शाळांतून अद्याप दुसऱ्या टर्मिनल (सहामाही) परीक्षेचीही घोषणा झालेली नसल्यामुळे हा आनंद स्फटिकासारखा होता. दरवर्षी दिल्लीत हे पुस्तक-प्रदर्शन फेब्रुवारीत भरत असते. तेव्हा वार्षिक परीक्षा जवळ आल्यामुळे त्याचा निर्भेळ आनंद मुलांना मिळू शकत नाही. यंदा नोव्हेंबरातच हे पुस्तकप्रदर्शन खास मुलांसाठीच भरत असल्यामुळे मुले अगदीच खुषीत होती.

'पापा, हमें चिल्ड्रन्स बुकफेअर देखने ले चलिये नं'

'हां पापा, और साथही नेहरू बालमेला भी लगा हुवा है, वहाँ भी होके आयेंगे'

घराघरांतून मुलांच्या गोड विनंत्या सुरू झाल्या.

'पपा, ह्या रविवारी बुकफेअरला नक्की जायचं हं!'

'हो, आणि या खेपेस दोनदा जायचं. एका वेळेस सगळी पुस्तकं पाहून होत नाहीत.'

'यंदा तर इंटरनॅशनल बुकफेअर आहे. फॉरिनचे स्टॉल्स पहायला मग वेळच उरत नाही.'

आमच्याही मुलांनी तगादा लावला. बुकफेअर नोव्हेंबरअखेरीस संपणार होते. त्यापूर्वीचा शेवटचा रविवार आला आणि आम्ही मुलांना बुकफेअर दाखविण्यासाठी निघालो.

संध्याकाळचा पाचचा सुमार. नोव्हेंबरातील एका स्वेटरची थंडी. अंधार पडायला अजून अर्धा तास अवकाश होता. इंडियागेटसमोरची कारंजी थुयथुयत होती. मुलामाणसांनी भरलेले हिरवळीवरील वातावरण उत्फुल्ल होते. प्रदर्शनाबाहेरील कमानीवर 'इंटरनॅशनल चिल्ड्रन्स बुकफेअर' ही अक्षरे झळकत होती. 'नॅशनल बुक ट्रस्ट' तर्फे हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. भारतीय आणि परदेशी अनेक प्रकाशकांचे स्टॉल्स पुस्तकांनी सजले होते आणि मुलांच्या वर्दळीने त्यांची शोभा वाढली होती. स्वतःच्या हातांनी कुठलेही पुस्तक चाळून ते निवडण्याचे स्वातंत्र्य असल्यामुळे मुलांना अलिबाबाची गुहा सापडल्याचा आनंद होत होता. कुठले पुस्तक घ्यावे नि कुठले नको असे झाले होते. या स्टॉलवरून त्या स्टॉलवर मुले फुलपाखरांसारखी नाचत होती.

सी. बी. टी. (चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट) च्या स्टॉलवर खरेदी केलेल्या पुस्तकांसोबत C. B. T. अशी अक्षरे असलेल्या जाड कागदाच्या आकर्षक टोप्या मुलांना देण्यात येत होत्या. मुलांना आपल्या स्टॉलजवळ आकर्षित करण्याची ही चतुर युक्ती होती. त्या टोप्या घालून गोजिरवाणी मुले प्रदर्शनातून हिंडत होती.

पुस्तकमहल, किताबखाना, एन् बी. टी., सी. बी. टी, पॉप्युलर इत्यादी दिल्लीतील प्रख्यात प्रकाशकांबरोबरच इतर अनेक छोटया–मोठया प्रकाशकांचे स्टॉल्स उभे होते. तथापि इंग्लिश आणि रशियन पुस्तकांव्यतिरिक्त चीन, जपान, कोरिया, जर्मन आणि भारतातील प्रादेशिक भाषा यांच्या पुस्तकांच्या स्टॉल्सवर पुस्तके नुसती पहायला मिळू शकत होती. ती पुस्तके तिथे विक्रीसाठी नव्हती. प्रकाशकांकडून मागवावी लागणार होती. त्यामुळे मुले काहीशी हिरमुसली झाली.

सर्व पुस्तकांवर १० टक्के कमिशन देण्यात येत होते. मार्क ट्वेन, ज्यूल्स व्हर्न, डिकन्स, स्टीव्हन्सन, अॅलेक्झँडर ड्यूमाज, शेक्सपिअर इत्यादी नामवंत लेखकांची उत्तमोत्तम पुस्तके मजबूत बांधणीत आणि संक्षिप्त आवृत्तीतही उपलब्ध होती. तरीही मुलांचे कॉमिक्सचे आकर्षण कमी होत नव्हते. (वेळ संपल्यावर स्टॉलच्या मालकाने उगाच नाही पाच हजार रुपयांचा गल्ला मोजला!)

आम्ही मुलांना पुस्तकांच्या खरेदीसाठी ठराविक रक्कम देऊ केली होती. तेवढया पैशात कुठली पुस्तके बसवावीत याच्याशी त्यांची मानसिक झुंज चालू होती. पुस्तकांच्या किमती पाहून आम्ही तिथे त्या रकमेत थोडी वाढ केली. तेव्हा थोडीशी वर्ल्ड क्लासिक्स आणि जास्त प्रमाणात तऱ्हेतऱ्हेची कॉमिक्स घेऊन मुले मोकळी झाली.

अंधार पडल्याबरोबर प्रदर्शनाच्या आवारातील झाडांवर द्राक्षांप्रमाणे छोटया-छोटया रंगीत दिव्यांचे घोस लोंबकळू लागले. अचानक थंडी खूप वाढली. दिल्लीची थंडी दिवसाच्या कुठल्या प्रहरी अचानक वाढेल किंवा कमी होईल, सांगता येत नाही. जणू थंडीच्या छोटया-मोठया लाटाच.

इंडियागेटच्या खुल्या परिसरात आम्ही त्या थंडीत सापडलो. नेहरू बालमेळा आणि बुकफेअर यांची संयुक्त गर्दी असल्यामुळे वाहन मिळणे कठीण होते. सुदैवाने एक रिक्षा मिळाली आणि आम्ही घरी परतलो. मुलांना मात्र पुस्तकांचा खजिना गवसल्याचा अपार आनंद झाला होता. ती वाचण्याच्या उबदार कल्पनेत दंग होती. म्हणूनच की काय घरी आल्यावर 'आम्हाला नाही इतकी थंडी वाजली' असे म्हणत ती पुस्तकांच्या दुनियेत शिरलीही.

¤

या नोव्हेंबर महिन्यातच दिल्लीतील प्रगतिमैदानावर भव्य व्यापार–मेळा (ट्रेड-फेअर) भरला होता. भारतातील सर्व राज्यांचे आणि बाहेरील अनेक देशांचे सुंदर देखणे स्टॉल उभे होते. दुपारी २ ते रात्री ८ पर्यंत प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते. तिकीट १ रुपया. सकाळी व्यापारी दृष्टिकोनातून प्रदर्शन पाहणाऱ्या 'बिझनेसमन्स' साठी १० ते २ ही वेळ ठेवली होती. त्या वेळेस जाणाऱ्यांना २५ रुपये तिकीट होते. त्यामुळे सकाळी गर्दी जवळजवळ नसायचीच. दुपारी मात्र असंख्य दिल्लीकरांनी प्रगतिमैदान फुलून गेलेले असे.

प्रत्येक राज्यातील खास उद्योगधंद्यांतील उत्पादनांची कमिशन देऊन विक्री चालू होती. सर्व राज्यांनी आपापले स्टॉल्स सजवले होते. कापडांचे विविध प्रकार, ज्यूटच्या अनेक वस्तू, गालिचे, लोकरीचे आणि रेशमाचे कापड व कपडे, नित्योपयोगी वस्तू,

खेळांचे साहित्य, सौंदर्यप्रसाधन व सिग्रेट्स, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, साड्या, खाद्यपदार्थ इत्यादी शेकडो प्रकार प्रदर्शनात होते. शिवाय ठिकठिकाणी खाद्यपेयांचे स्टॉल्सही जोरात चालू होते. यंदा देशी स्टॉल्सपैकी केरळच्या स्टॉलला आणि परदेशी स्टॉल्सपैकी रशियाच्या स्टॉलला प्रथम पारितोषिक मिळाले.

प्रदर्शनाच्या वेळी प्रगतिमैदानातील सर्व छोट्या रस्त्यांवर उंच उंच खांबांवर रंगीबेरंगी निशाणे फडकत होती. 'मानससरोवरझील' निळ्याशार पाण्याने भरलेले होते. संध्याकाळी रंगीबेरंगी छोट्या दिव्यांनी झाडाझुडुपांवर रोषणाई केलेली होती. ठिकठिकाणी लावलेल्या स्पीकरमधून सुरेल संगीताचे सूर पाझरत होते. स्टॉल्स आणि रस्ते देशी-परदेशी लोकांनी भरलेले असूनही संध्याकाळी संपूर्ण वातावरण तरल... मंदिर बनलेले होते. दरवर्षी प्रदर्शनाच्या वेळी असेच उत्साहपूर्ण वातावरण असते. ट्रेड-फेअरला एकदा प्रत्यक्ष भेट दिल्यावाचून याची नशा कळणार नाही.

दरवर्षी दिल्लीत व्यापार-मेळा भरत असतो. लोकही तितक्याच उत्साहाने या व्यापारमेळ्याला भेट देण्यासाठी जात असतात. भव्य मैदानाच्या परिसरात गर्दीच्या झुंडीतून हिंडत उत्साहपूर्ण वातावरणाची धुंदी अनुभवतात. निरनिराळ्या राज्यातील व परदेशातील स्टॉल्सना भेटी देऊन जगभरच्या उद्योगधंद्यांचे नि उत्पादनांचे विविध प्रकार उत्सुकतेने जाणून घेतात. आपापल्या आर्थिक कुवतीनुसार खरेदी करतात. किंबहुना पुष्कळजण तिथे खरेदीसाठीच आलेले असतात, बहुतेकजण इथे एखाद्या ट्रीपचा आनंद अनुभवण्यासाठी येतात, खातात, पितात, चैन-मौज करतात. लाखो रुपयांची उलाढाल दिवसागणिक होत असते. ट्रेड-फेअर म्हणजे अशा शान–ए–शौकची वाहती हवा असते. सुमारे १५ ते २० दिवस ती दिल्लीत वाहात असते.

—ललिता मिरजकर

उत्तर आणि दक्षिण

# निवडणुकांचे वारे

**अभय गोखले**

चरणसिंग, मोरारजी, जगजीवनराम व चंद्रशेखर यांच्या हेकेखोरपणामुळे विरोधकांत जागांच्या बाबतीत समझोता होऊ शकलेला नाही. उत्तरप्रदेश ( ८५ जागा ) बिहार ( ५४ जागा ) मध्यप्रदेश ( ४० जागा ) राजस्थान ( २५ जागा ) व हिमाचलप्रदेश, हरयाणा, केन्द्रशासित दिल्ली व चंदिगड या हिंदी प्रदेशात लोकसभेच्या जवळजवळ निम्म्याहून थोड्या कमी जागा असल्याने या राज्यांत जो पक्ष बाजी मारतो तो पक्ष केन्द्रात सत्तेवर येऊ शकतो; परंतु यापैकी दिल्लीचा अपवाद वगळता कोठेच विरोधकांत समझोता झालेला नाही. त्यामुळे इंदिरा कांग्रेसपक्षाचे काम सोपे होणार आहे. उत्तरप्रदेशात चरणसिंग ही एक शक्ती मानली जाते. दलित मजदूर किसान पक्ष नावाची जी आवळ्या-भोपळ्याची मोट चरणसिंगांनी बांधली आहे त्यामुळे त्यांच्या मूळ लोकदलाच्या शक्तीत फारसा फरक पडलेला नाही. गेल्या निवडणुकांत चरणसिंगांच्या पक्षाने लोकसभेच्या २९ जागा उत्तरप्रदेशातून जिंकल्या असल्या तरी त्या वेळेस ते पंतप्रधान होते ही गोष्ट नजरेआड करता येणार नाही. बुलंदशहर मतदारसंघातील लोकसभेच्या पोटनिवडणुकीत चरणसिंगांच्या उमेदवाराचा दारुण पराभव झाल्याने चरणसिंगांच्या लोकप्रियतेचा बुडबुडा फुटलेला आहे. अशा परिस्थितीत इतर विरोधीपक्षांशी सन्मान्य तडजोड करून निवडणुका एकत्रितपणे लढवता आल्या असत्या; पण चरणसिंगांनी आडमुठेपणाचा अवलंब करून फारच थोड्या जागा इतर विरोधकांना सोडण्याची तयारी दाखवली. त्यातच भाजप, जनता व त्याचे मित्रपक्ष यांनी अव्वाच्या सव्वा जागांवर अधिकार सांगितला. त्यामुळे बोलणी फिसकटून आता बहुतेक मतदारसंघांत तिरंगी अथवा चौरंगी लढती होणार आहेत. याचा फायदा कांग्रेस ( इं ) ला मिळणार हे उघडच आहे. द. म. कि. पक्षाने मर्यादित प्रमाणात जगजीवनराम यांच्या पक्षाशी समझोता केलाय. दमकि पक्ष ( ७३ जागा ) भाजप ( ५४ जागा ) व जनता पक्ष ( ४१ जागा ) लढवत आहेत. म्हणजे बहुतेक ठिकाणी दमकिविरुद्ध भाजप व जनताचे उमेदवार निवडणूकरिंगणात असणार आहेत. त्यातल्या त्यात चांगली गोष्ट म्हणजे चरणसिंग, चंद्रशेखर, मनेका गांधी या अनुक्रमे दमकि. जनता व राष्ट्रीय संजयमंच या पक्षाच्या अध्यक्षांविरुद्ध विरोधी पक्षांनी उमेदवार उभे केलेले नाहीत. चरणसिंगांविरुद्ध त्यांचे पूर्वीचे हनुमान, राजनारायण उभे राहिले असून इंदिरा कांग्रेसचा पाठिंबा मिळविण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. अलाहाबाद मतदारसंघात मौलाना बहुगुणा यांच्याविरुद्ध सिनेस्टार अमिताभ बच्चन उभा राहिल्याने त्यांची हवा तंग झाली असून गढवाल मतदारसंघ सोडल्याचे त्यांना आता दुःख होत असेल. इंदिराजींच्या हत्येमुळे सहानभूतीची लाट आल्याने अमेथीमधून पंतप्रधान राजीव गांधी यांना हरवणे आता मनेका गांधी यांच्या आवाक्याबाहेरचे आहे. विरोधक विभागले गेले असल्याने उत्तरप्रदेशातील एकंदर ८५ जागांपैकी साठच्या आसपास जागा कांग्रेस ( इं ) ने जिंकल्यास आश्चर्य वाटायास नको. दमकि पक्ष दहा ते बारा जागा व भाजप दोन ते तीन जागा व जनता आणि त्याचे मित्रपक्ष चार ते पाच जागा जिंकू शकतील असे सध्या तरी वाटते.

### बिहारात दलबदलूंचा उपद्रव

बिहारमध्ये लोकसभेच्या ५४ जागा आहेत. या ठिकाणी विरोधी पक्षांमध्ये समझोता झालेला नाही. सर्वांत जास्त जागा भाजप व त्याच्या खालोखाल जनता पक्ष व दमकि पक्ष लढवत आहेत. बिहारमध्ये विरोधकांत समझोता झाला नसला तरी उत्तरप्रदेशाइतकी किंमत त्यांना मोजावी लागणार नाही. कारण अलग-अलगपणे लढूनही विरोधक यापूर्वी बऱ्यापैकी कामगिरी करू शकलेत. राजकीयदृष्ट्या बरीच स्थित्यंतरे बिहारमध्ये घडून आलेली आहेत. माजी मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्र यांनी वरवर का होईना मुख्यमंत्री चंद्रशेखरसिंग यांच्याशी जमवून घेतलेले दिसते. कर्पूरी ठाकूर सतत पक्षबदल करून आता दमकि पक्षात आले आहेत. अर्थात त्यांच्या दलबदलू वृत्तीने जनतेला त्यांच्यात कितपत इंटरेस्ट उरलाय ते निवडणुकीच्या निकालानंतर समजेलच. बिहारमधील जनता पक्षाचे खंदे नेते सत्येंद्र नारायणसिंग हे कांग्रेस ( इं ) पक्षात गेले आहेत. अशा परिस्थितीत विरोधकांना सामना फार कठीण पडणार आहे. बहुतेक ठिकाणी भाजप, जनता, दमकि उमेदवार एकमेकांविरुद्ध उभे असल्याने ते एकमेकांची मते खातील व कांग्रेस ( इं ) चे काम सोपे करतील. भाजप, जनता व दमकि पक्ष यांच्यात समझोता झाला असता तर निम्म्या जागा जिंकण्याची उमेद विरोधकांना बाळगता आली असती. जगन्नाथ मिश्रा हे स्वतः गंभीरपणे पक्षकार्यास लागले असतील तर ब्राह्मणजमातीची मते मोठ्या प्रमाणात कांग्रेस ( इं ) ला मिळतील. एस. एन. सिंग यांच्या कांग्रेसप्रवेशामुळे रजपूत जमातीची मते मोठ्या प्रमाणात ते कांग्रेस ( इं ) ला मिळवून देतील. सध्याच्या स्थितीत फारसा बदल झाला नाही तर बिहारमध्ये लोकसभेच्या ५४ जागांपैकी ४० ते ४५ जागा कांग्रेस( इं) पक्ष सहज जिंकू शकेल.

## वाजपेयी विरुद्ध शिंदे

मध्यप्रदेशात लोकसभेच्या ४० जागा आहेत. येथेही विरोधकांत समझोता होऊ शकला नाही. जनता व दमकि पक्ष यांच्या अवास्तव मागणीला कंटाळून भाजपने एकट्यानेच सर्वच्या सर्व जागा लढविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र जनता व दमकि पक्ष एकट्याच्या जिवावर जागा जिंकण्याच्या परिस्थितीत नसले तरी भाजपच्या काही उमेदवारांना पाडून ते आपले उपद्रवमूल्य सिद्ध करू शकतील. या अगोदरच्या एक-दोन पोटनिवडणुका व पालिकानिवडणुकांतील भाजपची कामगिरी समाधानकारक नव्हती. त्यातच माजी मुख्यमंत्री वीरेंद्रकुमार सकलेचा यांनी निवडणुका तोंडावर आल्या असता बंडखोरी करून पक्षापुढे पेच निर्माण केला आहे. त्यांनी आता आपली उमेदवारी मागे घेतली असली तरी ते पक्षाविरुद्ध काम करू शकतील. आणखी एक भाजपचे नेते हमीद कुरेशी यांनी नुकताच भाजपचा राजिनामा दिला आहे. पक्षातील या फुटीचा परिणाम नक्कीच भाजपच्या निवडणूकयशावर होणार आहे. कॉंग्रेस ( इं ) बरोबर एकट्याने लढत देण्याइतका भाजप शक्तिमान नाही. अशा परिस्थितीत भाजप एकंदर चाळीस जागांपैकी आठ ते दहा जागा जिंकू शकला तरी खूप झाले असे म्हणावे लागेल. कॉंग्रेस ( इं ) ने भाजपला चकित करण्याच्या हेतूने, नवी दिल्लीची जागा सोडून ग्वाल्हेरची सुरक्षित जागा लढवणारे भाजपचे अध्यक्ष अटलबिहारी वाजपेयी यांच्याविरुद्ध माधवराव शिंदे यांना उभे केले आहे. माधवराव हे पूर्वी गुणा मतदारसंघातून निवडून येत असत. अर्थात त्यामुळे भाजपला घाबरून जायचे कारण नाही. कारण ग्वाल्हेर महानगरपालिका त्यांच्याच ताब्यात आहे. शिवाय भाजपचे एन. के. शेजवळकर गेल्या वेळेस प्रचंड बहुमताने येथून निवडून आलेले आहेत. माधवराव शिंदे यांच्या माता विजयाराजे शिंदे या भाजपच्या उपाध्यक्षा आहेत. शिवाय माधवरावांची बहीण भाजपच्या तिकिटावर शेजारच्या भिंड मतदारसंघातून उभी आहे. मात्र वाजपेयींना नेहमीप्रमाणे सामना सोपा जाणार नाही हे नक्की.

राजस्थानमध्ये लोकसभेच्या २५ जागा आहेत. त्यांपैकी बऱ्याच जागांवर भाजप व दमकीपक्ष यांच्यात समझोता झाला होता, मात्र उत्तरप्रदेशात दोन पक्षांना समझोता करण्यात अपयश आल्याने त्याची प्रतिक्रिया म्हणून राजस्थानमधील या दोन पक्षांची बोलणी फिसकटली व आता हे पक्ष स्वतंत्रपणे लढत आहेत. सुरुवातीच्या समझोत्यानुसार दमकीपक्ष ९ जागा व उरलेल्या जागा भाजप लढवणार होता; परंतु उत्तरप्रदेशात भाजपची जागांबद्दलची मागणी चरणसिगांनी धुडकावून लावल्याने आता भाजप २५ जागांपैकी २४ जागा लढवणार असून दमकिला मदत करणार नाही. फक्त दमकिच्या राजस्थानच्या पक्षाध्यक्षांविरुद्ध भाजप उमेदवार उभा करणार नाही. तेथूनच जनता पक्षाध्यक्ष (राजस्थान) ही उभे आहेत. जनताचे माजी मुख्यमंत्री भैरवसिंग शेखावत यांनी बरीच जनताभिमुखी कामे ते सत्तेवर असताना केल्यामुळे ते लोकप्रिय आहेत व ते स्वत: बहुसंख्य रजपूत जमातीचे असल्याने त्याचा फायदा भाजपला मिळेल. ते स्वत: विधानसभेत विरोधी पक्षनेते आहेत. अर्थात एवढ्याने लढत देण्याइतका भाजप राजस्थानात प्रभावी नाही. काही मतदारसंघात सरळ लढती आहेत; परंतु जेथे भाजपच्या उमेदवारांना कॉंग्रेस (इं) बरोबर जनता व दमकीपक्षाशी लढत द्यावी लागेल. तेथे त्यांची बाजू कमजोर असणार आहे. अशा परिस्थितीत भाजप, जनता व दमकी हे पक्ष २५ पैकी सहा ते सात जागा जिंकू शकले, तरी त्यांनी बरेच कमावले असे म्हणावे लागेल.

## दिल्लीत भाजपचा जोर

दिल्लीमध्ये लोकसभेच्या सात जागा आहेत. दिल्लीत नेहमीच कॉंग्रेस व जनसंघ ( भाजप ) यांच्यात संघर्ष होत आलेला आहे. ही निवडणूकही त्याला अपवाद असणार नाही. सुदैवाने दिल्लीत विरोधी पक्षात समझोता झाला असून सात जागांपैकी पाच जागा भाजप तर प्रत्येकी एक जागा जनता व दमकीपक्ष लढवतील. दिल्लीत शिखांची वस्ती बरीच आहे. इंदिराजींच्या हत्येनंतर सर्वांत जास्त अत्याचार शिखांवर दिल्लीत झाले. अशा परिस्थितीत शिखांची मते कॉंग्रेस (इं) ला मिळणार नाहीत; परंतु ती भाजपला मिळतील याचीही शाश्वती नाही. इंदिराजींच्या हत्येनंतर दिल्लीत शिखांवर व त्यांच्या मालमत्तेवर जे हल्ले करण्यात आले व कित्येक शिखांची निर्घृण हत्या करण्यात आली त्याला कॉंग्रेस (इं) पक्षाची फूस व सहानुभूती होती अशी कित्येक शिखांची समजूत आहे. त्यामुळे ते कॉंग्रेस (इं) पक्षाला मतदान करणार नाहीत. मात्र पंजाब प्रश्नाबाबत मतांवर डोळा न ठेवता भाजपने स्पष्ट भूमिका घेतल्याने शिखांची भाजपला फारशी सहानुभूती नाही. मात्र कॉंग्रेस (इं) ला भाजपच दिल्लीत पराभूत करू शकेल याची त्यांना जाणीव असल्याने त्यांना नाइलाजाने भाजप उमेदवारांना मतदान करावे लागेल. दिल्लीचे मतदार आलटून-पालटून कॉंग्रेस व भाजपला विजयी करतात. आता भाजपची पाळी आहे. मात्र इंदिराजींच्या हत्येनंतर निर्माण झालेली सहानुभूतीची लाट दिल्लीत जास्त तीव्र आहे. अशा परिस्थितीत भाजप व कॉंग्रेस (इं) यांना समसमान यश मिळण्याची शक्यता वाटते.

## दोघांना समान संधी

हरयाणात चरणसिंग व देवीलाल पुन्हा एकत्र आल्याने दमकीपक्ष चांगली लढत देऊ शकेल. मात्र येथेही भाजप, जनता व दमकीपक्ष यांच्यात समझोता होऊ शकला नाही. तशाही परिस्थितीत कॉंग्रेस (इं) व विरोधीपक्ष यांना समसमान संधी आहे. हिमाचलप्रदेशात भाजप व जनता यांच्यात समझोता होऊन चारपैकी तीन जागा भाजप तर एक जागा जनता लढवेल. मात्र कॉंग्रेस (इं) शी लढत देण्याइतके भाजप व जनता प्रबळ नसल्याने लोकसभेची एखादी जागा ते जिंकू शकले तरी ती कामगिरी मोठी मानावी लागेल. अशा प्रकारे हिंदी प्रदेशामध्ये विरोधकात समझोता नसल्याने बऱ्याच जागा त्यांना गमवाव्या लागतील.

## मुंबई–ठाणे–पुणे

महाराष्ट्रातही शरद पवारांच्या प्रयत्नांना यश आले नाही. अनेक मतदारसंघात बहुरंगी लढती होतील. मुंबई, पुणे, रत्नागिरी मतदारसंघांबाबत वाद निर्माण झाले. मुंबईतील सहा मतदारसंघांपैकी मुंबई उपनगर पश्चिम व मुंबई उत्तर मतदारसंघांत सरळ सामने होत असून तेथील भाजपचे रामजेठमलानी व जनताचे रवींद्र वर्मा निवडून येण्यास फारशी अडचण भासणार नाही. मुंबई दक्षिण मतदारसंघात मोरारजी व इतर जनता नेत्यांच्या हेकेखोरपणामुळे रतनसिंग राजदा यांना जनतातर्फे पुन्हा उभे करण्यात आले आहे. गेल्या दोन्ही वेळेस राजदा हे भाजपच्या पाठिंब्यामुळेच निवडून आले होते. या मतदारसंघात जनताचे विशेष काम नाही. १९८० च्या विधानसभा निवडणुकांत भाजपने या मतदारसंघातील तीन जागा जिंकून जवळजवळ कॉंग्रेसइतकीच मते मिळवली होती. राजदा या खेपेस निवडून येणार नाहीत ही काळ्या दगडावरची रेघ आहे; परंतु भाजपच्या जयवंतीबेन मेहता यांना ते अपशकून करू शकतील. त्यांचा

निवडणुकीत दत्ता ताम्हाणे झाला तर जनतापक्षाला आपली जागा समजेल. सध्याच्या परिस्थितीत या मतदारसंघात कॉंग्रेसचे मुरली देवराव व भाजपच्या जयवंतीबेन मेहता यांना समसमान संधी आहे.

मुंबई उपनगर पूर्वमतदारसंघात दमकिपचे सुब्रह्मण्यम् स्वामी आपली अनामत रक्कम वाचवतात का हे बघावे लागेल. या मतदार-संघात खरी लढत भाजपचे प्रमोद महाजन व कॉंग्रेस (इं) चे गुरुदास कामत यांच्यातच आहे. त्यांच्याशिवाय दत्ता सामंत यांच्या कामगारआघाडीचे बोराडे व दलित पँथरचे अरुण कांबळे उभे असून त्यांना जनता पक्षाचा पाठिंबा आहे. कामगारआघाडीचे टी. एस. बोराडे हे किती मते ( कॉंग्रेसची ) फोडतात यावर भाजपच्या प्रमोद महाजन यांचे यश अवलंबून आहे. सध्या तरी गुरुदास कामत यांचे पारडे जड वाटत आहे. मध्यमुंबई उत्तरमतदारसंघात प्रमिला दंडवते ( जनता ) यांना इंदिरा कॉंग्रेसचे शरद दिघे यांच्याबरोबरच भाजपपुरस्कृत शिवसेनेचे उमेदवार मनोहर जोशी यांच्याशी लढत द्यावी लागणार असून प्रमिला दंडवते या वेळेस पुन्हा निवडून येण्याची फारशी शक्यता नाही. खरी लढत बहुधा शरद दिघे व मनोहर जोशी यांच्यातच होईल व मतविभाजनामुळे शरद दिघे यांची बाजू वरचढ ठरेल असा रागरंग सध्या दिसतोय. मध्यमुंबई दक्षिण मतदारसंघात कॉंग्रेस व जनता पक्षाचा उमेदवार नाही. येथे कॉंग्रेसने कम्युनिस्ट पक्षाच्या रोझा देशपांडे यांना पाठिंबा दिला असून त्यांना जनता पक्ष व त्याच्या मित्रपक्षांनी पाठिंबा दिलेले कामगारनेते दत्ता सामंत व भाजप पुरस्कृत शिवसेना उमेदवार वामनराव महाडिक यांच्याशी लढत द्यावी लागणार आहे. गेल्या निवडणुकांत महाडिक यांनी एकट्या शिवसेनेच्या बळावर नव्वद हजाराहून अधिक मते मिळवली होती. रोझा देशपांडे यांचे वडील कामगारनेते डांगे यांचा आता गिरणगावात फारसा जम राहिलेला नाही. शिवाय कॉंग्रेसने नुसता पाठिंबा दिला असल्याने त्यांचे कार्य-कर्ते या मतदारसंघात फारसे सक्रिय रहाणार नाहीत. दत्ता सामंत गिरणीकामगार संपात अपयशी ठरल्याने त्यांना फारसा पाठिंबा मिळेल असे वाटत नाही. अशा परिस्थितीत शिवसेनेचे महाडिक यांनी बाजी मारली तर आश्चर्य वाटावयास नको. कारण मत-विभाजन प्रामुख्याने दत्ता सामंत व रोझा देशपांडे यांच्यात होणार आहे.

ठाण्यात भाजपचे जगन्नाथ पाटील यांना विजय मिळविण्यात फारसे प्रयास पडणार नाहीत. इतर विरोधी पक्षांबरोबरच शिव-सेनेचाही पाटील यांना पाठिंबा आहे. पुण्यात जनता व भाजप यांच्यात वाद निर्माण झाला. जनताचे मोहन धारिया व भाजपचे जगन्नाथराव जोशी एकमेकांविरुद्ध दंड थोपटून उभे आहेत. या जागेबाबत विनाकारण वाद निर्माण झाला आहे. भाजपचे सध्याचे पुण्यातील बळ व कामगिरी पहाता जनताने ही जागा भाजपला सोडण्यास हरकत नव्हती. अर्थात आता जोशी व धारिया हे दोघेही उभे राहिल्याने गाडगिळांचे यश जवळ आले आहे. याबाबतीत भाजपच्या कॅडरमुळे दुसरा क्रमांक पटकावण्याच्या बाबतीत तो जनतावर बाजी मारेल. काही अघटित घडले तरच गाडगीळ पराभूत होऊ शकतील. बारामतीत शरद पवार व राजापूरमध्ये मधू दंडवते यांचे यश निश्चित आहे. ज्या रत्नागिरी मतदारसंघाबाबत जनता व भाजप यांच्यात मतभेद निर्माण झाले होते तेथून जनता उमेदवाराने माघार घेतल्याने भाजपचे डॉ. नातू आता यशाची खात्री बाळगू शकतील. अंतुले व जांबुवंतराव धोटे यांच्या बंडखोरीचा कॉंग्रेस (इं.) पक्षावर फारसा परिणाम होणार नाही. स्वतः अंतुले व धोटे निवडून येण्याची बरीच शक्यता आहे. महाराष्ट्रातील एकंदर चित्र पहाता विरोधी पक्ष ४८ जागांपैकी दहा ते बारा जागा जिंकू शकतील अशी सध्याची स्थिती आहे.

गुजराथमध्ये जनता, भाजप व दमकि यांच्यात समझोता झाला आहे. जनता १२, भाजप ११ व दमकि २ जागा लढवणार आहे. एके ठिकाणी एका अपक्ष उमेदवारास सर्व विरोधी पक्ष पाठिंबा देणार आहेत. मागील बऱ्याच पोटनिवडणुकांत भाजपने नेत्रदीपक यश मिळवले आहे. समझोता होऊनही भाजपने जनतापक्षाकरिता सोडलेल्या बडोदाजागेकरिता माजी पोलीसआयुक्त ( बडोद्याचे ) जसपालसिंग यांना उभे केले आहे. त्यामुळे जनता पक्षात बरीच नाराजी पसरली असून त्याच्या निषेधार्थ सुरत पालिकेच्या काही नगरसेवकांनी सत्ताधारी भाजपचे उमेदवार जे सुरतेचे महापौर आहेत त्यांचा पाठिंबा काढून घेतला आहे. शिवाय भाजपने जसपाल-सिंगसारख्या बडोद्याच्या दंगलीत वादग्रस्त ठरलेल्या पोलीसअधि-काऱ्यास ( त्यांनी हिंदूंची बाजू घेतली असा त्यांच्यावर आरोप केला जातो. ) बडोद्याहून उमेदवारी दिल्याने त्याच्या निषेधार्थ भाजपच्या अल्पसंख्य विभागप्रमुखाने आपल्या सहकाऱ्यांसह पक्षाचा त्याग केला आहे. बलसाडमध्येही जनता कार्यकर्त्यांनी भाजपच्या उमेदवारास पाठिंबा देण्यास नकार दिला आहे. या सर्वांचा परिणाम भाजपच्या बडोदा, सुरत, बलसाड या निवडणुकीतील यशावर होणार आहे. असे जरी असले तरी भाजपची परिस्थिती पूर्वीपेक्षा बरीच सुधारली आहे व इतर विरोधी पक्षांशी समझोता करण्यात तो यशस्वी झाल्याने व कॉंग्रेस (इं.) मध्ये मुख्यमंत्री माधवसिंग सोळंकी व त्यांचे टीकाकार जीनाभाई दारजी यांच्या समर्थकांत लाथाळी चालू असल्याने विरोधी पक्ष लोकसभेच्या गुजराथमधील २६ जागांपैकी ५ ते ६ जागा जिंकून पूर्वीपेक्षा चांगली कामगिरी करू शकतील.

दक्षिणेत कर्नाटकात जनता पक्ष सत्तेवर आहे. तेथे जनता व भाजप यांच्यात समझोता झाला असून जनता पक्ष २३ जागा तर भाजप ४ जागा लढवेल. एक जागा कम्युनिस्टांना सोडण्यात आली आहे. रामकृष्ण हेगडे यांची मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द चांगली चाललेली असल्याने त्यांच्याबद्दल जनतेत सहानुभूती आहे. शिवाय कॉंग्रेस (इं.) तर्फे त्यांचे मंत्रिमंडळ पाडण्याकरिता ज्या घृणास्पद कारवाया करण्यात आल्या त्या जनता विसरलेली नाही. कॉंग्रेस (इं)च्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे निवडणुकीच्या निमित्ताने गुंडुराव, श्रीकान्तय्या, के. एच. पाटील, मोईली हे गट एकत्र आलेले दिसतात. त्याचप्रमाणे जनतापक्ष सत्तेवर असूनही त्याचे संघटनात्मक कार्य फारसे नाही याचा लाभ कॉंग्रेस (इं)ला मिळेल. बंगारप्पा गटही आता कॉंग्रेस (इं.) मध्ये सामील झाला आहे. माजी जनता-मंत्री असीस सैत व चंद्रप्रभा अर्स यांनी कॉंग्रेस (इं.) मध्ये प्रवेश केला आहे. एकंदर स्थिती पहाता जनता व भाजप एकंदर २६ जागांपैकी दहा ते बारा जागा जिंकू शकतील असे वाटते.

## देशम ३०–३५ जागा मिळवेल

आंध्रप्रदेशात लोकसभेच्या ४२ जागा आहेत. यापैकी एन. टी. रामाराव यांनी भाजप, दोन्ही कम्युनिस्टपक्ष यांना प्रत्येकी दोन व जनतापक्षास एक जागा सोडली आहे. उरलेल्या पस्तीस जागा त्यांचा तेलगूदेशम् पक्ष लढवेल. मध्यंतरी कॉंग्रेस (इं) ने एन. टी. रामाराव

यांचे सरकार घटनाबाह्यरीतीने पाडल्याने तेलगुदेशम व एन. टी. आर यांच्याबद्दल जनतेत सहानुभूतीची लाट आली होती. मात्र नंतर एन. टी. आर. यांना मंत्रिमंडळ स्थापन करण्यासाठी पुन्हा बोलावण्यात आले व लाटेचा आवेग ओसरला. इंदिराजींच्या हत्येनंतर इतर राज्यांप्रमाणे आंध्रमध्येही कॉंग्रेस (इं.) पक्षाबद्दल सहानुभूती. निर्माण झाली असून तिचा फायदा कॉंग्रेस (इं.) पक्षाला उठवता येईल. एन. टी. आरच्या तेलगदेशमचे पूर्वीइतके बळ राहिलेले नाही. भास्करराव गट बाहेर पडल्याने तेलगुदेशमच्या मतांचे विभाजन होईल. एन टी. आर यांनी ज्या चार जागा दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना सोडल्या आहेत त्याबाबत त्यांच्यात वाद निर्माण झाला असून दोन ठिकाणी ते एकमेकांविरुद्ध लढत आहेत. एन. टी. आरने उभे केलेले काही उमेदवार पक्षबदलू हा छाप बसलेले असल्याने त्यांच्याबद्दल जनतेत व तेलगुदेशमला पाठिंबा देणाऱ्या विरोधी पक्षांत नाराजी आहे असे असले तरी तेलगुदेशम व त्याचे मित्रपक्ष ४२ जागांपैकी तीस ते पस्तीस जागा जिंकू शकतील असा अंदाज आहे. या राज्यातून नरसिंहराव, शिवशंकर इत्यादी केंद्रीयमंत्री कॉं. (इं.) तर्फे निवडणूक लढवीत असून त्यांची हवा तंग झाली आहे.

**तामिळनाडू : आजारीपणाचा फायदा इं. कॉं. ला**

तामिळनाडूत कॉंग्रेस (इं.) व अण्णा द्रमुक पक्ष यांच्यात निवडणूकयुती झाली आहे. इंदिराजींची हत्या व मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन आजारी असणे या दोन गोष्टी या आघाडीला जनतेची अपार सहानुभूती मिळवून देत आहेत. शेवटच्या क्षणी शिवाजी गणेशन व त्यांच्या पाठीराख्यांचे बंड रोखण्यात कॉंग्रेस (इं.) पक्ष यशस्वी झाल्याने आता या दोन पक्षांची आघाडी तामिळनाडूतील लोकसभेच्या जास्तीत जास्त जागा जिंकेल याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. केरळमध्ये (इं.) प्रणीत संयुक्त लोकशाही आघाडी व मार्क्सवादी कम्युनिस्टप्रणीत डावी लोकशाही आघाडी यांच्यात सरळ लढत असून त्यांना समसमान यश मिळेल असे वाटते. ओरिसात कॉंग्रेस (इं.) पक्षाचे माजी केंद्रीय मंत्री रामचंद्र रथ व त्यांचे सहकारी जनतापक्षात सामील झाल्याने जनतापक्षाची बाजू बळकट झाली असली तरी जनतापक्ष अगोदर ठरल्याप्रमाणे भाजप, दमकीपक्ष, कम्युनिस्ट यांच्याशी समझोता करू शकला नाही व सर्वच्या सर्व जागा एकटयाच्या ताकदीवर लढवत आहे. बिजू पटनाईक यांच्या जनतापक्षाची तेवढी ताकद नाही. पटनाईक यांनी चरणसिंगांप्रमाणे आडमुठे धोरण पत्करून विरोधीपक्षांबरोबर होत असलेला समझोता आयत्या वेळेस उडवून लावला. त्यामुळे मतविभाजन होऊन आता कॉंग्रेस (इं) पक्ष राज्यात जास्तीत जास्त जागा जिंकू शकेल.

प. बंगालमध्ये इंदिराजींच्या हत्येमुळे निर्माण झालेली सहानुभूतीची लाट फारशी दिसत नाही. राज्यातील डाव्या आघाडीची कामगिरीही फारशी वाईट नाही. इंदिरा कॉंग्रेसमध्ये गटबाजी बोकाळली आहे. माजी मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे यांना कॉंग्रेस (इं.) पक्षाने पुन्हा सामावून घेतलेले नाही. त्यांच्यासारखा संघटनाकुशल माणूस डाव्या आघाडीशी चांगली टक्कर देऊ शकला असता. डाव्या आघाडीने आपापसातील मतभेद मिटवले असून ज्योती बसूंसारखा लोकप्रिय नेता त्यांच्याजवळ आहे. अशा परिस्थितीत लोकसभेच्या एकंदर ४२ जागांपैकी तीस ते पस्तीस जागा डावी आघाडी सहज जिंकेल असे वाटते. आसाम व पंजाबमध्ये या वेळेस निवडणुका होणार नाहीत. इतर लहान-सहान राज्यांतही कॉंग्रेस (इं.) ची बाजू मजबूत वाटते.

अशा परिस्थितीत कॉंग्रेस (इं) पक्ष लोकसभेच्या एकंदर ५१५ जागांपैकी २६० ते ३०० जागा जिंकू शकेल असे सध्या तरी वाटते. मतदानाच्या दिवसापर्यंत यामध्ये फारसा फरक पडेल असे वाटत नाही. विरोधकांत जागांबद्दल समझोता न झाल्याने कॉंग्रेस (इं) पक्षाचे काम सोपे झाले आहे. □


**वास्प** खोल विहिरीकरिता व कूप नलिकेकरिता

**इजेक्टो टरबाईन व सबमर्सिबल पंप.**

विक्रीनंतर सेवा हे वैशिष्ठ्य

**वॉटर सप्लाय स्पेशालिस्टस् (प्रा.) लि.**

१५१, थंबू स्ट्रीट,

मद्रास – १

## रायगड लोकसभा निवडणूक

# अंतुलेंची शेवटची मुसंडी

वार्तापत्र – संजय संगवई

आज तारीख सत्तावीस आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांनी, कॉलेजातल्या मुलांनी आपल्या वहीत ही तारीख लिहून ठेवा. दहा वर्षांनी वही उघडून बघावी. गरिबी त्या वेळी संपलेली असेल! तुम्ही–आम्ही सगळे यांची एक मोठी बोट आहे, होडी आहे. तुम्ही सगळ्यांनी मला कप्तान केला आहे. वादळातून ही बोट बाहेर काढण्यासाठी जे धैर्य, जी निष्ठा, जी शक्ती पाहिजे ती परमेश्वराच्या कृपेने तुमच्या या सेवकापाशी आहे. आपल्या बाजूने फक्त परमेश्वर आहे. तो शक्ती देतो. हे तुम्ही आपल्या घरी जाऊन म्हाताऱ्यांना सांगा, लहान मुलांना सांगा–पण नम्रतेने सांगा. परमेश्वर फार मोठा आहे. तो आपल्या बाजूने आहे.'

...'तुमच्या सेवकाने काय गुन्हा केला? पैसे जमविले! मी माझ्यासाठी जमविले का? आपल्यासारख्या गरिबांसाठी, झोपडीतल्या माणसासाठी पैसे जमविले–ते ज्यांच्या कोटाचे खिसे भरून वाहत आहेत त्यांच्याकडून'

...कडाड्–कडाड् टाळयाच टाळया...

सत्तावीस नोव्हेंबरला लोकसभेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता. माजी मुख्यमंत्री अब्दुल रहमान अंतुले हे काँग्रेस (आय) श्रेष्ठींचा आदेश डावलून कुलाबा मतदार संघातून अर्ज भरण्यासाठी अलिबागला आले. बरोबर मोठा लवाजमा होता. श्रीवर्धन, म्हसला, मुरुड इथून दोन–तीन ट्रक भरून माणसं आली. मिरवणूक निघाली. अर्ज भरल्यावर सभा झाली. त्यात बोलताना अंतुले म्हणाले, 'आजची २७ तारीख हे क्रांतीचे पहिले पाऊल आहे. पुढच्या सत्तावीस (डिसेंबरला) क्रांतीचे दुसरे पाऊल (मतदान) पडेल. त्यापुढच्या सत्तावीस तारखेला पूर्ण महाराष्ट्रात क्रांती होईल. लिहून ठेवा!'

कोणतीही हवा निर्माण करण्यात अंतुलेंचा हातखंडा आहे. पक्षाचा पाठिंबा नसताना, दिल्लीला टक्कर देऊन हा माणूस उभा राहतो आणि असं गरिबांचं आणि कोकणाचं बोलतो, त्याचं विरोधकांनादेखील तात्पुरतं का होईना कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही...

. काँग्रेस (आय) मधून बाहेर काढलं, पंतप्रधान राजीव गांधींनी धारेवर धरलं आहे, काँग्रेसची यंत्रणा पाठीशी नाही तरीसुद्धा अंतुले निवडणूक लढवतात–कशासाठी आणि कशाच्या जोरावर? या निवडणुकीतील अनुकूल किंवा प्रतिकूल निकालाचा काय परिणाम होईल?

खरं तर गेल्या आठवड्याअखेर चित्र स्पष्ट नव्हतं. निवडणूकप्रचार अजून नव्हताच. सत्तावीस नोव्हेंबरपासूनच आपल्या उमेदवारांचा प्रचार करणारा फक्त शेतकरी कामगार पक्ष. दि. बा. पाटील व खटाऱ्याच्या नावाने रस्ते, बसस्टँड, झाडे रंगून गेली होती. क्वचितच पेणच्या आसपास काँग्रेस (आय)चे कुणी ए. टी. पाटील हे उमेदवार असल्याचे कळत होते. गरिबांचे कनवाळू बॅ. अंतुलेसाहेब यांचा उल्लेख वडखळनाक्याच्या पुलाकडे दिसला अन् विनोद वाटला. यंदाच्या निवडणुकीत 'दोन अमंगलमूर्तींचे विसर्जन' अशी पोस्टर्स होती. 'दिखाऊ कामाचा पसारा–अंतुले' तर 'केवळ विद्वत्ता–अभ्यास–शून्य काम' असे ए. टी. पाटील यांची चित्रे असलेली शे. का. प. ची ही पोस्टर्स.

### शेकापचा जास्त जोर

किंबहुना महाराष्ट्रात इतरत्र कुठेही नसलं तरी शे. का. प. चे कुलाबा (रायगड) जिल्ह्यात, त्यातही त्याच्या उत्तरेकडच्या पनवेल, उरण, पेण व अलिबाग या भागात चांगले काम आहे. सध्या या भागात शेकापचे तीन आमदार आहेत. हे सर्व उत्तरेकडच्या मतदारसंघातले.

हा वरचा भाग बऱ्याचदा विरोधकांबरोबर राहिला आहे. लोकसभेच्याच बाबत बोलायचे झाल्यास आतापर्यंतच्या सात निवडणुकांमध्ये तीन वेळा शे. का. प. निवडून आला. ज्या ज्या वेळी काँग्रेस व विरोधक यांच्यात सरळ सामना झाला त्या वेळी शेकापचा उमेदवार निवडून आला असा इतिहास आहे.

मात्र दक्षिणेकडची गोष्ट वेगळी आहे. श्रीवर्धन, माणगाव, म्हसळा, मुरुड या चार तालुक्यात शे. का. प. चा जोर नाही. निदान आता तरी. रवींद्र राऊत (नंतर अंतुले) तुकाराम सुर्वे, अशांसारखे कॉं. (आय)चे आमदार सध्या आहेत. उरणमध्ये कम्युनिस्टांचे थोडेफार काम आहे. माणगाव, पेण, पनवेल, कर्जत, खालापूर इथे जनसंघाची बऱ्यापैकी ताकद आहे.

पुढे जाण्यापूर्वी या मतदारसंघाची जुजबी ओळख असणे आवश्यक आहे

३– कुलाबा हा मतदारसंघ व कुलाबा जिल्हा (आताचा रायगड) हे एकच नाहीत. जिल्ह्यातले पोलादपूर व महाड तालुके रत्नागिरी मतदारसंघाला जोडले आहेत. राहिलेल्या बारा तालुक्यांतून सहा विधानसभा मतदारसंघ तयार केले गेले आहेत. ते असे–

१) श्रीवर्धन : श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड, माणगाव (अंशतः)

२) माणगाव – माणगाव (अंशतः) व रोहा (भाग)

३) पेण – पेण, पाली (सुधागड), रोहा (भाग),

४) अलिबाग – अलिबाग व उरण

५) खालापूर – कर्जत व खालापूर

६) पनवेल – पनवेल व उरण (भाग)

एकंदर सात लाख ६ हजार ७३५ मतदारांपैकी सर्वात जास्त खालापूर (१ लाख २७ हजार) पनवेल (१ लाख २२ हजार) अलिबाग (१ लाख १५ हजार) या मतदारसंघात आहेत. यामुळे शे. का. प. च्या

मतदारसंघाचे पारडे जड राहील.

श्रीवर्धन ( १ लाख १७ हजार ) व माणगाव ( १ लाख ९ हजार ) हे अंतुलेंचे मतदारसंघ म्हणून ओळखले जातात. पेण ( १ लाख १४ हजार ) हा ए. टी. पाटलांचा मतदारसंघ आहे.

## आगरी मतांचे महत्त्व

या भागातील वस्तीचा पक्षांच्या इतिहासाशी संबंध आहे. पनवेल, उरण, पेण, अलिबाग या भागात आगरी वस्ती फार मोठ्या प्रमाणात आहे वस्तुत: ठाणे जिल्ह्यातल्या पालघरपासून ते खाली श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत त्यांची वस्ती आहे. आगरी खेड्यांचं वैशिष्ट्य असं की, त्यात फक्त आगरी लोकांचीच वस्ती असते. पिढ्यानपिढ्या मीठ पिकविण्याचा आगरातील धंदा करणाऱ्या लोकांमध्ये पहिला जम बसविला तो शे. का. पक्षाने. स्वातंत्र्यानंतर या जिल्ह्यातील कॉंग्रेसची सूत्रे लेले, लिमये, कुंटे यासारख्या ब्राह्मणमंडळींच्या ताब्यात होती. त्यामुळे Leftist alternative असलेला व बहुजन आगरी समाजाचा म्हणून शे. का. प. फार जोरात पुढे आला. अलिबाग तालुक्यात नारायण नागू पाटील ( पी. एन्. पाटील यांचे वडील ) यांनी आगरी लोकांना सुशिक्षित करण्यात मोठा पुढाकार घेतला. आज रायगड जिल्ह्यातील ७५ टक्के शिक्षक आगरी आहेत. तेच सर्व जिल्ह्यात विखुरलेले आहेत. ही शे. का. पक्षाची शक्ती आहे. किनारपट्टीवरच्या कोळी समाजातदेखील भाऊसाहेब राऊत यांनी पक्ष पसरवला.

त्यानंतर खाली जावं तसं Composition बदलत जातं. नागोठणे, कोलेटीच्या खालून तिलोरी, कुणबी जमात वाढू लागते ती थेट रत्नागिरीपर्यंत. त्याच वेळी माणगाव, मुरुड, म्हसाळे या ठिकाणी कुणबी मराठा–राव समाज आहे.

श्रीवर्धन, म्हसळा, मुरुड, माणगाव या भागात मुस्लिमांची संख्या मोठी आहे या जिल्ह्यात एकंदर ८० हजारांच्या आसपास मुस्लीम मतदार आहेत. ही कॉंग्रेसची मते. या वेळी अंतुलेंची मुख्य किंवा सर्वच मदार या ६०–७० हजार मतांवर आहे.

## दत्ता पाटलांचं गणित

या वेळी शे. का. पक्षच निवडून येईल असं आमदार दत्ता पाटील ठासून सांगत होते. त्यांचं गणित म्हटलं तर अत्यंत व्यवहार्य आहे, नाही तर फारच सरळसोट. आहे. ते म्हणतात की, ' जिल्हा परिषद आमच्या ताब्यात आहे. ( त्यांचे मोठे बंधू प्रभाकर पाटीलच त्याचे अध्यक्ष आहेत. ) अलिबाग, पनवेल, उरण, खालापूर, कर्जत या पंचायत-समित्या आमच्या ताब्यात आहेत. पेण, सुधागड या कॉं. ( आय ) च्या आहेत, तर मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा ( व आता माजगाव ) पंचायत समित्या अंतुलेंकडे आहेत.

आमची यंत्रणाच इतकी घट्ट विणलेली आहे की, पुढच्या विधानसभेच्या व पंचायत समिती निवडणुकांसाठी सर्व उमेदवार आताच ठरले असून त्यांच्या कामाला सुरुवात झाली आहे.

नंतर ते सरळ लढतीच्या फायद्याचा निर्वाळा देतात– ' १९८० मध्ये जनता–शेकाप व कॉंग्रेस ( आय ) असा तिरंगी सामना झाला होता. कॉं. (आय)चे ए. टी. पाटील यांना १ लाख ६० हजारांवर मते मिळून ते विजयी झाले. त्या वेळी दि. बा. पाटील ( शेकाप ) १ लाख ११ हजार व दत्ता खानविलकर ( जनता ) ८७,६१४ अशी विरोधकांच्या मतांची विभागणी झाली. आता ही विभागणी टळेल. त्यामुळे आमच्या उमेदवाराला दोन लाखांहून जास्त मते पडतील. त्यातच आता कॉंग्रेसची मतं ए. टी. ( पाटील ) व अंतुले यांच्यात फुटतील.

हे सांगितल्यावर प्रचारसभेतलं एक गणित ते मांडतात. १९५२ पासूनच्या निवडणुकांत कॉंग्रेस व शेकाप यांना आळीपाळीने लोकसभेच्या जागा मिळाल्या. १९५२ – सी. डी. देशमुख (कॉं.), १९५७ – भाऊसाहेब राऊत (शेकाप), १९६१–भास्करराव दिघे (कॉं.), १९६७ – नानासाहेब कुंटे (शेकाप), १९७१ शं. बा. सावंत (कॉं. आय), १९७७ – दि. बा. पाटील (शे. का. प.), १९८० – ए. टी. पाटील (कॉंग्रेस) आणि १९८४ मध्ये आमचा उमेदवार !

उत्तरेकडच्या पनवेल, पेण, उरण, अलिबाग या भागातल्या आगरी लोकांच्या निर्णायक मतांचा शे. का. प. ला नेहमीच पाठिंबा मिळत राहिला आहे. मात्र ही मते राजकीय स्वरूपाचीच आहेत, जातीय नव्हेत, असं दत्ता पाटील परत–परत सांगत होते. त्यासाठी त्यांनी बहुसंख्य आगरी वस्तीत या वेळी मोहन पाटील हा मराठा आमदार शेकापने आणला हे त्यांनी सांगितलं. मात्र त्याचवेळी श्रीवर्धन, मुरुड, म्हसाळे भागात मुस्लिमांची जास्त वस्ती असल्याने तिथं शे. का. प. काहीच करू शकणार नाही हे मान्य केलं. तिथे केवळ आगरी समाजातल्या किंवा Non-Muslims वरच भर देण्याचं धोरण असल्याचं ते म्हणाले.

श्रीवर्धन – म्हसाळे भागात आगरी १५ गावं आहेत. शिवाय काही मुस्लिमनेते आमच्या बाजूने आहेत. माणगावचे मुस्लिम कोणत्या बाजूने आहेत ते निश्चित नाही. बहुधा तिथे आमच्या वाट्याला ४० टक्के मतं येतील. मुरुड तालुक्यात ६० टक्के मतं आमची आहेत. कर्जत–खालापूर हे पूर्वीपासून आमचेच भाग आहेत. रोह्यात आम्ही ६० टक्के असू. आज रेवदंडा, खारेपाटण, चौल इथले मुस्लिम कार्यकर्ते आमच्या बाजूने आहेत असं आम्हाला वाटतं.'

या सर्वांमुळे ही लढत डी. बी. जिंकतील याबद्दल आम्ही निश्चित आहोत.

यामध्ये अजून एक घटक म्हणजे ए. टी. पाटील व अंतुले यांचं काहीच काम नाही. त्याउलट आमचं या जिल्ह्यात लोकांसाठीच काम आहे असा दावा डी. एन्. करतात.

## कॉंग्रेस (आय्) : दुहेरी शत्रू

तिकडे ए. टींच्या कँपची दुहेरी अडचण आहे. एकीकडे शे. का. प. ला तोंड देताना अंतुले गटालाही–म्हणजे पूर्वीच्या सत्ताधारी गटालाही–ठोकायचं आहे. अंतुले वा शे. का. प. सारखा त्यांना एका जमातीवर हुमखास हक्क सांगता येत नाही. या दोघांही शत्रूंना एकाच वेळी मारायचं आहे. मग त्याच्यासाठी ते अनेक प्रसंग शोधून काढून प्रचाराचा मार्ग आखत आहेत.

अजून ए. टीं चा प्रचार पद्धतशीर सुरू झाला नाही. सत्तावीस तारखेला रायगड जिल्ह्याची पूर्ण कॉंग्रेस (आय्) कमिटी अध्यक्ष बाळासाहेब म्हात्रेंसकट अंतुलेंना जाऊन मिळाली. तो तर प्रचंड धक्काच होता. गेल्या बुधवारीच नवे जिल्हाध्यक्ष दत्ता खानविलकर यांनी संपूर्ण तालुक्यातून नवी संघटना उभारणीचं काम पूर्ण केलं. तोपर्यंत पक्षश्रेष्ठीकडून जिप्स, पैसा, पोस्टर्स आली आहेत. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक मतदारसंघासाठी एक

जीप, चाळीस हजार रुपये असा किमान ऐवज आल्याची बातमी आहे. अंतुलेंबरोबर गेलेले अनेक पदाधिकारी आता हळूहळू परत येत आहेत. बहुतेकजण द्विधा अवस्थेत आहेत. तुकाराम सुर्वे (रोहा) व बी. एस. पाटील ही मंडळी परत येत आहेत.

या Positive गोष्टींपेक्षाही ए. टी. गटाने आपल्या विरोधकांच्या कमकुवत बाजूंकडेच लक्ष देऊन आपला आत्मविश्वास वाढविण्याचा प्रयत्न चालविलेला दिसतो.

भाई शेटये यांचा असहकार, जे. बी. सावंत यांना उमेदवारी देणे यामुळे माणगाव–रोह्यातून शेकापला विरोध होईल असे ते म्हणतात. उदाहरणार्थ, पेणमधून मोहन पाटील या मराठा आमदाराला आगरी बहुसंख्य शे.का.प. पाठिंबा देत नाहीत.

या वेळी विधानसभेसाठी त्याला वगळून हरिश्चंद्र पाटील हा आगरी उमेदवार उभा करणार आहे. त्यामुळे मोहन पाटील शे. का. प. चं वरवरचं काम करतो.

दुसरे जनता, भाजप यासारखे पक्ष आता शेकापला मदत करणार नाहीत. भाजपची किमान २० हजार मतं पुण्याच्या हिंदू एकता आंदोलनाच्या विलास तुपेला जातील. त्याचप्रमाणे रिपब्लिकन पक्षाचे अॅड. कृष्णा गायकवाड उभे आहेत. अलिबागचे पत्रकार भाऊ सिनकर यांच्या मते या गायकवाड साहेबांनी १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत माजगावमधून दुसऱ्या क्रमांकाची १३००० मते मिळवली होती. त्यामुळे हे दोन उमेदवार नगण्य नाहीत.

श्री. सिनकर तर यापेक्षाही वर जाऊन म्हणतात–

अलिबाग तालुक्यात अंतुले व डी. एन्. व पी. एन्. ( पाटील ) यांचे साटेलोटेच आहे. या दोघांना दुखवायचं नाही असं अंतुले यांनी ठरवलं. त्यामुळे कांग्रेस कार्यकर्त्यांनी जरी या भागांविरुद्ध तक्रारी केल्या तरी अंतुले त्याची दखल घेत नसत.

या वेळी दगाबाजी होऊन डी. बीं. ना मतं न पडता अंतुलेंना मतं पडली व ते विजयी झाले तर जिल्हा परिषद बरखास्त होण्याची शक्यता आहे.

पाटीलबंधू आणि अंतुले यांच्या हातमिळवणीचा तर ए. टीं च्या गटाने पद्धतशीरपणे प्रचारासाठी उपयोग करून घ्यायला सुरुवात केली आहे. या दोघांचं काही Dealing होतं अशीही अफवा फेकली जाते.

यासंबंधात दोन–तीन परस्परविरोधी गोष्टी सांगितल्या जातात. शे. का. प. च्या मुंबईतील बैठकीच्या वेळी अंतुलेंनी दत्ता पाटील, त्यांचे पुत्र जयंत पाटील, मुलगी मीनाक्षी पाटील यांना बोलावून कॉ.( आय ) चे तिकिट नाही मिळाले तर शे. का. प. च्या तिकिटाची मागणी केली. त्या वेळी शेकापवाल्यांनी ऐनवेळी उमेदवारी मागण्यापेक्षा आधीच जाहीर करून टाका असा आग्रह धरला. दुसऱ्या एका सूत्राच्या सांगण्यानुसार खुद्द पाटीलमंडळींनीच हा विषय काढला व कुलाब्यात पक्षाचे तिकिट अंतुलेंना द्यावे अशी सूचना मांडली. त्यावर चिटणीसमंडळात गहजब झाला.

## अंतुलेंचा आत्मघात

काही का असेना, अंतुले खटाऱ्यात बसणार या आवईचा ए. टी. गट या वेळी पुरेपूर उपयोग करून घेणार आहे. त्याखेरीज भ्रष्टाचाराचाही इश्यू करण्याचा त्यांचा मानस आहे.

अंतुले यांच्याविरुद्ध तर सध्या दत्ता, खानविलकर वगैरे मंडळींनी दंड थोपटले आहेत. त्यांचं म्हणणं असं की, 'या माणसानं जिल्ह्यात कांग्रेस वाढू दिली नाही. जिल्ह्याचा खासदार ए. टी. पाटील यांना कामच करू दिलं नाही. अंतुलेंसारखा भ्रष्टाचारी माणूस लोकांना आवडणार नाही असा त्यांचा कयास.

खानविलकर म्हणतात, 'अंतुलेंनी बांधकाममंत्री असताना चांगलं काम केलं हे मान्य करतो. मात्र मुख्यमंत्री असताना काय केलं ?

अंतुलेंच्या भ्रष्टाचाराचा उल्लेख झाल्यावर मी म्हणालो, 'हे तुम्हाला आधीपासूनच माहीत होतं का ?'

'हो.'

'मग तुम्ही त्याला Tolerate कसं केलं ?'

खानविलकर : काय करणार ? श्रेष्ठीच त्याला अनेक महत्त्वाच्या पदांवर घेत होते. त्यांनीच याचं महत्त्व वाढवून ठेवलं. आम्हाला स्थानच नव्हतं.'

अंतुलेंना परत पक्षात घेतल्यावर तुम्ही परत त्यांचं काम कराल का ? यावर माणगाव तालुका कॉं. ( आय ) मुख्य भाऊ पवार यांनी होकारार्थी उत्तर दिलं. त्यांच्या भोवतीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी यावर खळखळ केली नाही. मात्र खानविलकरांनी अंतुलेला जिंकला तरी परत पक्षात घेतले जाणार नाही असं म्हणून मुद्दा टाळला.

या प्रचारतंत्रापेक्षाही आता ए. टी. गटाला अंतुलेंकडे गेलेली माणसं परत येण्याची आशा निर्माण झाली. तुकाराम सुर्वे, रोहा, जयरामशेट हापूसकर, अतानुल्ला उंड्रे (श्रीवर्धन) या गटाची परत येण्याची आशा आहे. सत्ताधारी पक्षाचा व श्रेष्ठींचा आशीर्वाद व सत्तेची खात्री ही उद्दिष्टे यामागे आहेत. येत्या आठ दिवसात हा Exodus फार मोठ्या प्रमाणात सुरू होईल असे त्यांचे म्हणणे आहे.

त्याहीपेक्षा रोहा, सुधागड तालुक्यातील अनेक कांग्रेसजन शे. का. प. मध्ये गेले असून जे. बी. सावंतांची उमेदवारी यांसारख्या शेकाप श्रेष्ठींच्या निर्णयामुळे ते ऐनवेळी ए. टीं. ना साह्य करतील अशी आशा भाऊ पवार यांना वाटते.

येत्या काही दिवसांत ए. टी. पाटलांचा जोर निश्चितच वाढणार असं दिसतं. ए. टीं.-ची प्रतिमा निष्क्रिय म्हणून असली तरी ते भ्रष्टाचारी नाहीत असं सर्वांना वाटतं. आगरी समाजातील एक विद्वान माणूस म्हणून त्यांना मान आहे. १९७१ मध्ये लोकसभा कांग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंड करूनही एकट्याच्या बळावर त्यांना ७३००० मते मिळाली. मात्र लोकसंपर्क व माणसं जोडणे यात ते फार कमी पडतात– निदान डी. बी. पुढे तरी. डी बी. पाटील यांची एक स्वच्छ, तळमळीचा माणूस म्हणून प्रतिमा आहे. मात्र उरण शेतकऱ्यांकडून पक्षातर्फे पैसे घेतले, त्याचा अद्याप हिशेब नाही. त्याचा काय वापर होणार ते कळलं नाही अशा मुद्द्यांच्या भांडवलाचा त्यांच्याविरुद्ध उपयोग होईल.

राहताराहिले ज़नाब अंतुले. एखाद्या भरतीच्या लाटेसारखा त्यांच्यामागे पाठिंबा उभा राहिला. तो आता हळूहळू ओसरत आहे. माणगाव, श्रीवर्धन, म्हसळे, मुरुड या पंचायतसमित्या त्यांच्या ताब्यात असल्या

तरी त्यांच्याकडे सत्ता नाही ही त्यांची मोठी कमकुवत बाजू आहे. केवळ मागे काही तरी केलं ही भाषा मतं द्यायला पुरत नाही. पुढचं आश्वासनही लागतं. अंतुले आज सर्वस्वी मुस्लिम मतावर खऱ्या अर्थाने आधारलेले आहेत.

त्यांचे पाठीराखे म्हणून गणले गेलेल्या मुस्लिमेतरांमध्ये आमदार अशोक साबळे (माणगाव), अशोक लोखंडे, आमदार रवींद्र राऊत (श्रीवर्धन) ही त्यांनी स्वतः उपकृत केलेली मंडळी आहेत. अंतुलेंकडून त्यांना काही तरी तात्कालिक लाभ हवा आहे.

अंतुलेंच्या पाठीमागे पक्ष नाही. 'हात' नाही. त्यांचे बहुतेक सर्व कार्यकर्ते आता भाडोत्री किंवा हौशी या प्रकारात गणता येतील किंवा हे मूळचे दुसऱ्या पक्षातील असून आधीच्या काँग्रेसवाल्यांविरोधी गटाचे आहेत. माणगावचे सभापती शिंदे काय, आमदार साबळे काय ही मंडळी काँग्रेसची नव्हेत.

एकच उदाहरण द्यायचे म्हटल्यास पेणच्या उदय टिळक व त्यांचे वडील ज. द. टिळक यांचे आहे.

अशासारखे लोक सरळसरळ नवखे आहेत. त्यांना राजकारणाचा, डावपेचांचा गंध नाही; पण अंतुले संकटात आहेत तोवर त्यांच्या पैशाने, नावाने पाय रोवावेत असा त्यांचा उद्देश आहे त्यांना धड संघटन म्हणजे काय याची गंधवार्ताही नाही.

अंतुलेंची सर्वांत दुबळी फळी म्हणजे त्यांचे मुस्लिम राजकारण. या मतदारसंघातील सर्व मुसलमानांची त्यांना मते आहेत अशी भावना खुद्द माणगाव-श्रीवर्धन-म्हसळे या त्यांच्या बालेकिल्ल्यात झाली. त्यामुळे राऊत वगैरेंचा सर्व (मराठा) समाज, आगरी, ब्राह्मण, कोळी पूर्ण विरुद्ध गेलेला आहे. किंबहुना शेकाप व ए. टी. गट हिंदु मतांच्या दिशेनेच काम करत आहे हिंदु-मुस्लिम मतांचं Polarization जसं होईल, तसं अंतुलेंना निवडून येणं फार कठीण आहे.

आज या मतदारसंघात ७ लाख ६ हजार ७३५ मतदार आहेत. अगदी चार लाखांपर्यंत मतदान झालं आणि त्यात ७० हजार मुस्लिम मतदान अंतुलेंना मिळालं तरी या ध्रुवीकरणामुळे अंतुलेंची इतर मते पूर्णपणे जातील.

आज भाजप, काँग्रेस (आय्) व शे.का.प. अंतुलेंच्या विरोधात हीच भावना पसरवत आहेत. किंबहुना आता हेच करावं लागेल असं खुद्द दत्ता पाटील, दत्ता खानविलकर, भाजपचे कार्यकर्ते उघड मान्य करतात.

तिकडे कुणबी समाजाचा एक मेळावा होऊन 'कुणालाही मत द्या; पण अंतुलेंना नको' असा निर्णय नुकताच झाला ही याचीच लक्षणे.

शे. का. प. व काँग्रेस (आय्) परस्परांवर जोरदार हल्ले करतील, खिंडारे पाडतील; पण त्यांची लढत बाकीच्या तीन लाख मतांसाठी असेल. त्यामुळे अंतुले हे आपल्याच करणीने व मुस्लिम युवकांच्या अतिउत्साहीपणामुळे तिसऱ्या क्रमांकावर फेकले गेले आहेत, एवढे निश्चित. या निवडणुकीत ए. टी. का डो. वी. हा प्रश्न असला तरी अंतुले येणार नाहीत एवढे सध्या दिसते.

समजा अंतुले ही निवडणूक हरले तर? ते नष्ट होतील का? नाही. हा मोठा चिकाटीचा, Dashing बाजूस आहे असं काँग्रेस (आय्) वाले व अंतुलेवादी माणसं मानतात. मात्र या जिल्ह्यातील एक जुने मार्क्सवादी कम्युनिस्ट कार्यकर्ते म्हणतात की, अंतुलेंचा हा Last chance आहे, त्यासाठी ते सर्व शक्ती एकवटून मुकाबला करतील.

अंतुले हे येत्या निवडणुकीत विजयी झाले तर ती लोकशाहीची क्रूर थट्टा वगैरे ठरेल असं काही नाही. तेच काँग्रेस (आय्) किंवा इतर उमेदवारांबद्दलही म्हणता येईल. या निवडणुकीचे महत्त्व वाटते ते वेगळ्याच कारणाने. काँग्रेससारख्या राष्ट्रीय संघटनापक्षांच्या अस्तित्वाचा पाया हा राज्य-प्रांत स्तरावरचे कार्यकर्ते किंवा Elites असतात का या देशव्यापी राष्ट्रीय संघटनेच्या सदस्यत्वामुळे प्रदेशपातळीचे नेतृत्व Legitimate ठरते हा महत्त्वाचा प्रश्न आहे. कोणाच्या आधाराने कोण उभं असतं आणि कोण कोणाला Legitimacy देतं याचं उत्तर 'दोघांकडून' असं समन्वयात्मक येईलच. मात्र संघटनेच्या अडचणीच्या वेळी, प्रभावी नेतृत्व गेल्यावर त्या संघटनेतीलच प्रांतिक शक्ती कितपत स्वतंत्र होऊन आव्हान देऊ शकतात आणि त्यात यशस्वी होतात का हा प्रश्न या वेळी आहे. □

अब्राहम लिंकन
फाळणी टाळणारा महापुरुष
• वि. ग. कानिटकर
भरपूर छायाचित्रांसह प्रकाशित झालेली पहिली डिलक्स आवृत्ती. मोठा क्राऊन आकार. पृष्ठे: ४००, किं. १५० रु.

राजहंस ऑगस्ट ८४ योजनेत सहभागी व्हा.
सविस्तर योजनापत्रक मागवा.
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

उत्तरप्रदेश निवडणुका

# अमिताभ-बहुगुणा, राजीव-मनेका, चरण-राजनारायण निकाल काय लागणार ?

अरुण खोरे

प्रभु रामचंद्र आणि भगवान श्रीकृष्ण यांची जन्मभूमी, सुपीक जमीन करणाऱ्या गंगा, यमुना, शरयू या भारतीयांना लोकमाता वाटाव्यात अशा नद्या, या गोष्टींनी उत्तर प्रदेशचे स्थान भारताच्या सांस्कृतिक नकाशात फार वरचे आहे. भारतीय संस्कृती म्हणून ज्या गोष्टींचा आपण अभिमान बाळगतो, अशी अनेक स्थाने उत्तरप्रदेशात आहेत. बनारसचे काशीविश्वेश्वराचे मंदिर, तिथल्या साड्या, प्रयागचा गंगा-यमुना-सरस्वतीचा त्रिवेणी संगम, सम्राट अशोकाने उभारलेला सांचीचा स्तूप, अयोध्या, मथुरा, वृंदावन, आग्र्याचा ताजमहाल, लखनौ, कानपूरची नवाबी संस्कृती या सर्वांचं भारतीय मनाला एक अप्रूप आहे, आकर्षण आहे. या पट्ट्यात बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेचाही डौल न्यारा आहे.

प्राचीन आणि ऐतिहासिक काळात अनेक महत्त्वाच्या घटना उत्तरप्रदेशात घडल्या आहेत. या घटनांनी सगळ्या भारताच्या भागधेयाला त्या प्रमाणात धक्काही दिल्याचे जाणवते. पानिपतच्या पहिल्या लढाईने मुसलमानी सत्तेचा झेंडा इथे फडकला आणि तिसऱ्या लढाईनंतर मराठ्यांच्या सत्तेला हादरा मिळाला. इंग्रजी सत्तेला शह देणाऱ्या लढाया १८ व्या आणि १९ व्या शतकाच्या कालावधीत झाल्या त्या प्रामुख्याने याच पट्ट्यात आणि तरीहो ही सत्ता सर्वप्रथम अंकुश ठेवू शकली ती याच प्रदेशावर.

आधुनिक काळातही दंतकथा ठरावीत अशी काही थोर व्यक्तिमत्त्वे या प्रदेशात जन्माला आली. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांचे घराणे काँग्रेसचळवळीत सहभागी झाले तो हाच काळ

आजही आपण भारताच्या पंतप्रधानांबद्दल बोलतो तेव्हा या पदामागचा सत्ताधीश आपल्यासमोर नसतो, तर आपल्या सर्वांच्या मनात असलेला एक लोकप्रिय नेता आपल्यासमोर असतो. भारताचे तिन्ही पंतप्रधान (की चार ?) याच प्रदेशातून मिळाले आणि विशेष म्हणजे या तिन्ही पंतप्रधानांवर सगळ्या भारतानं मनापासून प्रेम केलं. त्यांना आपलं मानलं. पंडित नेहरू, लालबहादूर शास्त्री आणि इंदिरा गांधी ही तीन नावं आज आपल्या गौरवाचा विषय आहेत. ही तिन्ही माणसं अलाहाबादच्या परिसरात वाढली. आजही नेहरूंचं आत्मचरित्र बघताना आपल्याला अलाहाबादच्या आनंदभवनाबद्दल एक अनामिक जवळीक वाटू पहाते.

तर असा हा उत्तरप्रदेश आता आठव्या लोकसभेसाठी निवडणुकीच्या रिंगणात आहे. रामायण – महाभारतकाळातली युद्धक्षेत्रे आता स्मारके झाली आहेत आणि आज उत्तरप्रदेशचे ११ कोटीहून अधिक लोक मतपेटीतून युद्ध लढवण्याच्या जय्यत तयारीत आहेत. भारतात सर्वाधिक लोकसंख्या असलेला हा प्रदेश ५७ जिल्ह्यांचा (महाराष्ट्राच्या दुप्पट जिल्हे) आणि क्षेत्रफळात चौथ्या क्रमांकावर आहे.

शेतीप्रधान व्यवसाय असलेला बहुसंख्य वर्ग इथं आहे. आजही रेल्वेने प्रवास करताना दोन्ही बाजूंना डोलणारी, बहरणारी हिरवीगार शेते उत्तरप्रदेशचा प्राण म्हणजे शेती आहे ही ग्वाही देत असतात. राज्यात एकूण लोकसंख्येच्या ८५ टक्के हिंदू आणि उरलेल्या १५ टक्क्यात प्रामुख्याने मुसलमान आहेत. इथल्या अनेक टापूत मुसलमानांची मोठी वस्ती आहे. उत्तरभारताच्या सांस्कृतिक रूपात मुसलमानांच्या संस्कृतीचे एक अपरिहार्य मिसळलेपण जाणवते. इतके की ही नवाबी संस्कृती की भारतीय असे वाटावे. शेती हाच मुख्य व्यवसाय असल्यामुळे आजही बहुसंख्य लोकवस्ती ग्रामीण भागात आहे. कूर्मी, ठाकूर, जाट, शिख, मुसलमान, बनिये. मागासवर्गीय अशा विविध जाती–पंथांचे लोक गंगा–यमुना काठावर सुखेनैव जीवन जगत आहेत.

## तीन लढती

भारतात सर्वांत जास्त लोकसभेच्या जागा याच प्रदेशासाठी आहेत. ८५ इतक्या जागा लोकसभेत उत्तरप्रदेशातून भरल्या जातात. १९६७ आणि १९७७ या दोन निवडणुकांचा अपवाद वगळता या पक्षातील जनतेने सतत काँग्रेसला भरपूर मते देवून निवडले आहे आणि १९६७ साली काँग्रेसमधून बाहेर पडलेले काही नेतेच वेगळ्या पक्षांच्या नावाने उभे राहिले होते, तर १९७७ साली जनतालाटेबरोबरच आणीबाणीत कुटुंबनियोजनाच्या घातक सक्तीबद्दल या भागातील मोठ्या प्रमाणातील अल्पसंख्य समाजाने दहशत घेऊन काँग्रेसविरोधी मतदान केले होते हे लक्षात घ्यावयास हवे.

१९५२ साली या प्रदेशात काँग्रेसला एकूण मतदानाच्या ५३ टक्के मते पडली होती. १९७१ साली ४९ टक्के काँग्रेसच्या नावे पडली. १९६७ साली ३३ टक्के आणि ७७ साली २५ टक्के अशी टक्केवारी कमी झाली होती. यातही एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे व ती म्हणजे देशात काँग्रेसला जे मतदान होते त्याच्या एकूण प्रमाणाचा विचार करता उत्तरप्रदेशात काँग्रेसला सतत झुकते माप पडत आले आहे.

१९८० सालच्या गाजलेल्या निवडणुकीत काँग्रेसने (अर्थातच कॉं. आय.) ८५ पैकी ५१ जागा जिकल्या होत्या. या वेळी काँग्रेसने सर्वच जागांसाठी उमेदवार उभे केले आहेत. त्यांचा मुख्य सामना उत्तरप्रदेशच्या जाट समाजाचे आणि पिछड्या जमातींचे नेते चरणसिंगांच्या दलित मजदूर किसान पक्षाशी आहे. या पक्षाने ७४ उमेदवार उभे केले आहेत. जनता आघाडीचे ६३ जागी उमेदवार आहेत आणि भारतीय जनता पक्षाचे ५५

ठिकाणी उमेदवार उभे आहेत. याखेरीज अपक्षांची संख्याही या वेळी मोठ्या प्रमाणात आहे.

उत्तरप्रदेशचा सगळा पट्टा दिल्लीतल्या सत्ताधिशांच्या दृष्टीने सतत महत्त्वाचा ठरत आला आहे. तिथल्या हितसंबंधितांची पाठराखण करणे, बऱ्याच मोठ्या प्रमाणात असलेल्या कष्टकरी, दलित, पीडितवर्गाला विकासाच्या, प्रगतीच्या भूलथापा मारणे याबाबतीत दिल्लीतले सरकार आणि उत्तरप्रदेशची राजधानी लखनौत असलेले राज्य सरकार अगदी सारखेच आहे. त्यामुळेच आजही अलाहाबाद, वाराणसीच्या रस्त्यावर फाटक्या कपडधातला, हाडे दिसणाऱ्या शरीराचा सायकलरिक्षा ओढणारा कष्टकरी आपल्या पाप-पुण्याचा हिशोब मांडताना दिसतो.

या वेळच्या उत्तरप्रदेशातील निवडणुकीत ज्या काही लढती रंगणार आहेत, त्यातल्या तीन लढती साऱ्या देशाचेच लक्ष वेधून घेणार आहेत.

पहिली रंगतदार लढत आहे ती अभिनेते अमिताभ बच्चन आणि हेमवतीनंदन बहुगुणा यांच्यातली अलाहाबाद मतदारसंघात. दुसरी रंगतदार लढत आहे पंतप्रधान राजीव गांधी आणि मनेका गांधी यांच्यात अमेठी मतदारसंघात आणि शेवटची धमाल लढत आहे ती चरणसिंग आणि त्यांचे एके काळचे हनुमान राजनारायण यांच्यात— बागपत मतदारसंघामध्ये.

अलाहाबाद मतदारसंघातून १९५२ पासून १९६५ पर्यंत लालबहादूर शास्त्री निवडून आले होते. त्यांच्या निधनानंतर १९६७ साली शास्त्रीजींचे चिरंजीव हरिकृष्ण शास्त्री निवडून आले. १९७१ साली कॉंग्रेसच्या तिकिटावरच बहुगुणा निवडून आले. १९८० साली कॉंग्रेसच्या तिकिटावरच के. पी. तिवारी निवडून आले होते. या वेळी त्यांना बाजूला करून अमिताभ बच्चनला तिकिट देण्यात आले आहे.

राजीव गांधींशी लहानपणापासूनचे घरगुती संबंध आणि या संबंधाला गेल्या २ वर्षात राजीव गांधींच्या राजकारणातील वेगामुळे प्राप्त झालेला संदर्भ लक्षात घेता अमिताभ या क्षेत्रात येणार हे जवळजवळ नक्की होते. त्याप्रमाणे हे झाले आहे. विशेष म्हणजे बच्चन कुटुंबीय मूळचे अलाहाबादचेच. अमिताभचे वडिल डॉ. बच्चन आणि मातोश्री तेजी बच्चन यांचे नेहरु कुटुंबाशी जवळचे संबंध होते आणि ते सतत वृद्धिंगत होत गेलेले दिसतात. अडीच वर्षापूर्वी अमिताभ हॉस्पिटलमध्ये जबर जखमी होऊन हतबल झाला होता, तेव्हा श्रीमती गांधी व राजीव गांधी त्याला भेटण्यासाठी मुद्दाम मुंबईला आले होते. या प्रसंगाने या दोहोंमधला स्नेहाचा दुवा किती बळकट आहे हेच भारतीयांच्या मनात ठसले होते. अर्थात केवळ या स्नेहसंबंधाची शिदोरी अमिताभला पुरेशी ठरणार नाही.

उत्तरप्रदेशातले राजकारण आजही जमीनदारी व्यवस्थेच्या ताब्यात आहे. जात, धर्म यांचा विचार इथे सगळ्या संदर्भात होतो आणि यातल्या घटकांचा फायदा अमिताभला विजयासाठी होईल अशी शक्यता वर्तवली जात. एक म्हणजे अमिताभ कायस्थ आहे आणि अलाहाबाद मतदारसंघात ७० हजार कायस्थ आहेत. तिथल्या बुद्धिजीवींच्या मते लालबहाद्दूर शास्त्रींनंतर एवढा प्रभावी कायस्थ अमिताभच्या रूपाने या मतदारसंघात उमेदवार म्हणून उभा आहे. ही मते बहुतेक एकगठ्ठा अमिताभला जातील ही शक्यता खूप मोठी आहे. अमिताभच्या बाजूने दुसरी अनुकूलता म्हणजे तरुणांचा उत्साह त्याच्या उमेदवारीने वाढला आहे. मात्र त्याच्या प्रचारार्थ फिरणाऱ्या तरुणांच्यात किती जण मतदानास पात्र आहेत अशी एक शंका जाणकार बोलून दाखवतात; पण तरुणांच्या या पाठिंब्याचा उपयोग प्रचारासाठी चांगला होईल अशी सध्या स्थिती आहे. आणखी एक भाग म्हणजे या मतदारसंघात २२ हजार बंगाली आहेत. हे मतदार अमिताभलाच मत देतील यात कोणालाच शंका नाही. पिछड्या जातींची ६० हजार मते या विभागात आहेत आणि ही मते एकगठ्ठा मिळवायचा प्रयत्न कॉंग्रेस (आय) चा आणि बहुगुणांचा आहे. या समाजाची एक मोठी संघटना कॉंग्रेस (आय)च्या सरचिटणीस राजेंद्रकुमारी वाजपेयी यांचा मुलगा अशोक वाजपेयी याच्या नेतृत्वाखाली आहे. त्याची अनुकूलता साहजिकच अमिताभच्याच प्रयत्नाची ठरणार आहे.

### कॉंग्रेस—वर्चस्व

याबाबतीत सगळ्यात महत्त्वाचा घटक म्हणजे मुसलमान मतदार. या मतदारसंघात सुमारे १८ टक्के म्हणजे सव्वा लाख मुसलमान मतदार आहेत. या मतदारांना वळवण्यावरच अलाहाबादमध्ये निवडून कोण येणार हे ठरणार आहे; पण गेल्या अनेक वर्षात या सगळ्या प्रदेशात मुसलमानांच्या मनात कॉंग्रेसने एक विशिष्ट स्थान मिळवले आहे. या वेळच्या लोकसभा तिकिटवाटपात मुसलमान उमेदवारांची संख्या ५० आहे, याचा फायदा अलाहाबादमध्ये अमिताभला होईल अशीही शक्यता व्यक्तविली जात आहे.

हे लक्षात घेताना अमिताभचा सामना बहुगुणांसारख्या धूर्त राजकारण्याशी आहे हे विसरून चालणार नाही. रुपेरी पडद्यामुळे अमिताभ जरी सुपरिचित असला तरी त्याचा सर्वसामान्यांच्या प्रश्नाशी, संघर्षाशी बहुगुणा अधिक निकटचे आहेत. राजकारणी डावपेचात मुरलेले ते मुरब्बी राजकारणी आहेत. मागे लोकसभा पोटनिवडणुकीत गढवाल मतदारसंघात त्यांना पराभूत करण्यासाठी पंतप्रधान श्रीमती गांधींनी प्रचाराचे रान उठवले होते; पण त्याचा काहीही उपयोग न होता बहुगुणा निवडून आले होते याचा विसर पडून चालणार नाही. मुसलमान मतदारांना विश्वासात घेण्याचे तंत्र व पद्धती या प्रदेशाचे ते रहिवासी असल्यामुळे बहुगुणांना चांगली ठाऊक आहे. त्यांच्या प्रचारासाठी डॉ. फारुक अब्दुल्ला येत असल्याने मुस्लिम मतदारांना ते बहुगुणांकडे वळवतील अशी आशाही बहुगुणांच्या समर्थकांना वाटते.

आज तरी अमिताभचा प्रचार जोरात आहे. त्याच्या आगेमागे प्रचंड पोलीसताफा, चाहत्यांची गर्दी, सर्वसामान्यांचा लोंढा वाहताना दिसतो आहे. राजीव गांधीही या मतदारसंघात त्याच्यासाठी येऊन जाणार आहेत.

आपल्या सर्वांच्या दृष्टीने खरी लक्षणीय लढत आहे ती राजीव गांधी आणि मेनका गांधी यांच्यात. राजकीय पंडितांच्या मते आज तरी निकाल लागलेला आहे. राजीव गांधी निवडून येणार यात शंकाच नाही. गेले वर्षभर या मतदारसंघाची (अमेठी) जी काळजी घेण्यात आली आहे, त्याचा फायदा राजीवला मिळणार हे नक्की. अर्थात पक्षाध्यक्षपद असल्यामुळे आपल्या मतदारसंघात त्यांना

फार दिवस देता येणार नाहीत. देशभरच्या प्रचारात त्यांना सहभागी व्हावे लागणार आहे. श्रीमती गांधींच्या हत्येनंतर त्यांनी जो संयम दाखवला, सुजाण निर्णय घेतले त्याचा एक मोठा परिणाम केवळ अमेठीतच नव्हे, तर सर्व देशभर होईल असे सांगण्यात येते. मनेका गांधी या विरुद्ध उमेदवार राष्ट्रीय संजयमंचचे अकबर अहमद त्यांची अपद यंत्रणा चालवत आहेत. दीर–भावजयीच्या या लढतीत दीर जिंकणार हे नक्की असले तरी मतदानात किती फरक पडतो हेही महत्त्वाचे आहे.

तिसरी रंगतदार लढत म्हणजे चरणसिंग आणि राजनारायण यांच्यातली. याही लढतीचा निर्णय चरणसिंगांच्या बाजूने लागण्याचा संभव अधिक. उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री, जनता सरकारचे गृहमंत्री आणि संयुक्त सरकारचे पंतप्रधान म्हणून चरणसिंग गाजलेले आहेत. भारतीय क्रांतिदल पक्ष स्थापन करून उत्तरप्रदेशातील काँग्रेसच्या वर्चस्वाला त्यांनीच प्रथम शह दिला. १९८०च्या इंदिरा-लाटेतही चरणसिंगांच्या लोकदलाने सुमारे २९ जागा जिंकल्या होत्या. एकट्या उत्तरप्रदेशात – इतका त्यांचा मोठ्या प्रमाणात प्रभाव आहे. जाटसमाज, पिछड्या जाती यांचा मोठा पाठिंबा त्यांना आहे. विरोधी पक्षांच्या आघाड्यांचे यशस्वी राजकारण भारतात सुरू झाले ते चरणसिंगांच्या नेतृत्वाखाली. त्यामुळे त्यांच्याबाबत अनेक प्रवाद असले तरी त्यांचा जनमानसावरील ठसा कमी झालेला नाही. उलट राजनारायण यांनी आपल्या वर्तनाने आणि सतत पक्षबदलूवृत्तीने राजकारणाला हास्यास्पद बनवले आहे. त्यांचे डिपॉझिट जप्त होते की नाही एवढाच प्रश्न आहे असे जाणकार सांगतात.

## पण मतदार कोण ?

गेल्या सहा महिन्यांत काँग्रेसने मोठ्या प्रमाणात संघटनात्मक, सरकारी पातळीवर मोठे बदल करून उत्तरप्रदेशात आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न चालवला आहे. जून महिन्यात केंद्रीय वाणिज्यमंत्री विश्वनाथ प्रताप सिंग यांनी पदाचा राजीनामा दिला व ते उ. प्र. काँ. समितीचे अध्यक्ष झाले, तर केंद्रीय उद्योगमंत्री नारायण दत्त तिवारी उ. प्र. च्या मुख्यमंत्रीपदावर आले. या सहा महिन्यांच्या काळात कोट्यवधी रुपयांच्या योजना कार्यान्वित झाल्या आहेत. कोट्यवधी रुपयांच्या सवलती लागू झाल्या आहेत. पक्षश्रेष्ठींच्या मते ८० साली मिळवलेल्या ५१ जागा तरी टिकल्याच पाहिजेत असा आमचा प्रयत्न आहे. राज्यसरकार कर्मचाऱ्यांना चार महागाईभत्तेवाढी, बोनस, आर्थिक दुर्बल गटातील १ लक्ष कुटुंबियांना ४ टक्के दराने कर्जवाटप, ग्रामीण भागात काम करणाऱ्यांना .१ किलोऐवजी रोज २ किलो धान्य. राज्य, राष्ट्रीय हमरस्ते जोडण्याच्या ७० कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी, वीजपुरवठा आणि नवी कनेक्शन्स देण्यासाठी ७५ कोटी रुपयांची तरतूद, राज्यातील १७ हजार पंपनलिकांची दुरुस्ती कार्यान्वित अशा कोट्यवधी रुपयांचे काम प्रत्यक्ष वेगाने सुरू झाले आहे. मतदारराजाला खूष करण्याचीच ही चिन्हे आहेत.

या निवडणुकीत मुसलमान मतदारांच्या दृष्टीने एक कोडे आहे. ८० च्या निवडणुकीत काँग्रेस ( आय )ने उर्दू भाषेला दुसरी अधिकृत भाषा म्हणून मान्यता देऊ असे जाहीरनाम्यात म्हटले होते; पण तसे होण्याला बराच विरोध झाला. या संदर्भात राज्यसरकारने अजूनही काही केलेले नाही. मात्र ८२ साली एका वटहुकुमान्वये उर्दू भाषिकांच्या सवलती वाढविण्यात आल्या आहेत. याला काँ. (आय)मधल्या अनेकांचा व मुस्लिम विरोधी जनमताचा खूप विरोध होत असल्याने या सवलती चालू असल्या तरी अधिकृत भाषेची मान्यता अजून तरी उर्दूला मिळालेली नाही.

या प्रश्नाखेरीज हिंदूंचा एक भावनिक प्रश्नही पुढे येतो आहे. अयोध्येचे रामजन्ममंदिर गेले अनेक वर्षे वादामुळे कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात आहे. त्या मंदिराची मुक्ती करा आणि रामाचे दर्शन भाविकांना सुलभ करा असे विश्व हिंदू परिषदेने मोर्चे काढून म्हटले आहे; पण अद्यापि तरी या प्रश्नात फारसे कुणा राजकीय पक्षाला स्वारस्य असल्याचे दिसलेले नाही. हा प्रश्न वादाला आला तरच राजकीय पक्षांची भूमिका समजू शकेल.

आज तरी उत्तरप्रदेशच्या निवडणुकीचे चित्र असे आहे. मातीच्या भांड्यात आपले जेवण उरकणारा, अर्धी–अर्धी विडी पेटवून हौस भागवणारा फाटक्या कपड्यातला भैय्या, बनिया यांच्या मतपत्रिकेवरच राजकीय पक्षांचे भवितव्य अवलंबून आहे आणि या लोकांना कसे बनवायचे ते काँग्रेसला, बहुगुणांना आणि चरणसिंगांना पुरते ठाऊक आहे! रोज पाच–दहा रुपयांत अनवाणी पायाने सायकल–रिक्षा ओढणारा वाराणशीतला भैय्या एका मतपत्रिकेसाठी दहा रुपये मिळाले तर का खूष होणार नाही ? आणि त्याची ही गरज या सर्वांनाच माहिती आहे. कारण या दहा रुपयांचे दहा लाख करण्याची शक्ती पण मतदार त्यांना देत असतो! □


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# भारतातील संसदीय लोकशाही
## पाया पोखरलेली इमारत

विषय तसा म्हटला तर परिचित आहे. मात्र परिचित असूनही त्यावर देशात विविध प्रकारच्या व्यासपीठांवरून सातत्याने चर्चा चाललेली दिसते. विशेषत: अलीकडच्या काळात भारतातील संसदीय पद्धतीच्या अस्तित्वावर आणि ती बदलण्याच्या आवश्यकतेवर काही प्रमुख राजकीय नेत्यांनी मतप्रदर्शन केल्यानंतर वादंगही निर्माण झाले होते. एखादी गृहीत तत्त्वांवर आधारलेली पद्धती अपेक्षा पूर्ण करीत नसेल तर त्यावर टीका होणे स्वाभाविक म्हटले पाहिजे; पण बऱ्याच वेळा असा अनुभव येतो की, राजकारणातील सक्रिय भाग घेणाऱ्या व्यक्ती जी टीका करतात त्यात 'राजकारण' असू शकते. राजकारणाच्या बाहेरच्या व्यक्ती जो टीका करतात ती स्वतंत्र विचारांच्या आधारे असतेच असे म्हणता येण्यासारखी परिस्थिती असते असे बऱ्याच वेळा दिसत नाही. वरीचशी टीका अपूर्ण माहितीच्या आधारावर किंवा अज्ञानावर आधारित असते. यामुळे विचारात तर गोंधळ होतोच; पण ज्यावर टीका केली जाते त्या कल्पनेवरही मोठा अन्याय होत असतो. मानवी जीवनातील संघर्षाला तत्कालीन समाजातील वैचारिक गोंधळ हेही एक कारण असते. किती तरी वेळा तावातावाने भांडणाऱ्या दोघांचे म्हणणे जवळजवळ एकच असते असे अनुभवास येते भारतातील संसदीय लोकशाहीचा विचार करताना संसदीय लोकशाहीची प्रमुख लक्षणे, भारतातील तिची वाटचाल, ही वाटचाल होत असताना प्रकर्षाने दिसणारे दोष, असे दोष दिसताना भारतातील विशिष्ट सामाजिक जीवन त्यास कसे कारणीभूत ठरत आहे आणि शेवटी संसदीय पद्धतीच भारतात योग्य असल्याने कायद्यांच्या द्वारा काही दोष कसे दूर करता येतील, तसेच राजकीय जीवनात सहजसाध्य संकेत निर्माण करून ही पद्धती योग्यरीत्या राबविता कशी येऊ शकेल याबावत माझे चिंतनातून निर्माण झालेले विचार मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

भारतातील संसदीय पद्धतीवरील आजतागायत होत असलेल्या विचारविमर्शातून एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते ती ही की, भारतात ती अजूनपर्यंत पूर्ण मान्य झालेली तर नाहीच; पण तिच्या स्वरूपाबाबत आणि कार्यवाहीबावत जाणत्यांच्या मनातदेखील विकल्प आहेत. थोडक्यात निष्ठा म्हणून आपण तिचा स्वीकार करू शकलो नाही. भारतीय संविधानाने ती स्वीकारल्यानंतर तीस वर्षांनंतरही अजून अशी परिस्थिती का राहावी ? आपण संसदीयपद्धती विचारपूर्वक स्वीकारली यात शंकाच नाही. भारताच्या घटनापरिषदेत याबाबत साकल्याने विचार झाला होता. संसदीय पद्धतीबाबतच्या आपल्या अपेक्षा इंग्लंडमध्ये ती ज्या तऱ्हेने कार्य करीत आहे त्यावर आधारित आहेत. इंग्लंडमध्ये काही शतकांच्या अनुभवातून ती उत्क्रांत झालेली आहे. तिच्यातले दोष निघून गेले असल्याने तेथे ती निष्ठेने राबवली जाते. ब्रिटिश लोकांची रक्तात भिनलेली वैशिष्ट्येही त्याला कारणीभूत आहेत. कारण शेजारच्या फ्रान्समध्ये ती कधीच स्थिर होऊ शकली नाही. ब्रिटिशांच्या भारतावरील दीर्घ स्वामित्वामुळे व त्यांचेबरोबर निर्माण झालेल्या साहचर्यातून त्यांचा आपल्यावर वैचारिक प्रभाव निर्माण झाला. अजूनही इंग्रजी भाषेच्या या देशातील प्रतिष्ठेने ब्रिटिशांचा वैचारिक प्रभाव टिकून आहेच. स्वाभाविकपणे येथेही इंग्लंडप्रमाणेच संसदीय पद्धती चालावी असे आपणास वाटते. तशी ती चालत नाही म्हणून तिच्यावर टीका होते. मग प्रसंगी ती बदलून टाकावी या अतिरेकी टीकेचे टोकही गाठले जाते. तिचे मूळ स्वरूप शाबूत ठेवूनही ती येथे चांगली चालू शकेल. हे सामर्थ्य तिच्यात निश्चित आहे.

### संसदीय पद्धत : प्रमुख लक्षणे

संसदीय लोकशाहीमध्ये सरकार ( मंत्रिमंडळ ) हे प्रत्यक्ष लोकप्रतिनिधी असलेल्या, कायदेमंडळाच्या कनिष्ठ गृहाला जबाबदार असते. याचाच अर्थ संसदेच्या कनिष्ठ गृहात सरकारच्यामागे जोपर्यंत बहुमत असते तोपर्यंत सरकार काम करू शकते– म्हणजेच सत्तेवर राहू शकते. सामान्यत: ज्या पक्षाला या गृहात बहुमत लाभते त्या पक्षाचे मंत्रिमंडळ बनते व त्या पक्षाचा नेता पंतप्रधान बनतो. पंतप्रधानाच्या मार्गदर्शनाखालील मंत्रिमंडळ देशाची धोरणे ठरविते व आपल्या नियंत्रणाखालील प्रशासकीय यंत्रणेद्वारा त्या धोरणांची कार्यवाही करते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मंत्र्यांना धोरणे ठरविताना आवश्यक ती माहिती देणे व प्रसंगी सल्ला देणे या व्यवस्थेत आवश्यक असते. कारण राजकीय सत्ताधारी निवडणुकीतून सत्तेवर येत असतात. प्रशासकीय कारभाराच्या दृष्टीने ते नेहमीच अनुभवी असतातच असे नाही. शासनाचे यशापयश मंत्रिमंडळाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून राहते आणि मंत्रिमंडळाची कार्यक्षमता पंतप्रधानाच्या नेतृत्वाच्या दर्जावर अवलंबून असते. या सर्व पद्धतीत पंतप्रधानाला आत्यंतिक महत्त्व असते. तो शासनाचा प्रमुख असतो. त्याचप्रमाणे कायदेमंडळातील बहुमताचा नेता असल्याने कायदेमंडळातील काम-

**नेतृत्वाची प्रशासकीय अकार्यक्षमता, निश्चयाचा अभाव, दडपणांना बळी पडण्याची प्रवृत्ती, धरसोडवृत्ती, इतर सर्व गोष्टींपेक्षा राजकीय सत्ता हातात ठेवण्याची आत्यंतिक इच्छा आणि प्रस्थापित हितसंबंध असलेल्या वर्गाची एकूण समाजजीवनातील पकड यामुळे समाजवादाचा उद्घोष आणि देशातील सतत वाढत जाणारी विषमता ही विसंगती स्वातंत्र्योत्तर भारताचे वैशिष्टय बनले.**

प्रा. हेमचंद्र भगवंत देशपांडे, कुरुंदवाड

कामकाजावर त्याचाच वरचष्मा राहतो. संसदीय पद्धतीत संसद बहुतांशी सार्वभौम असते असे मानले जात असले तरी निश्चित बहुमत पाठीमागे असलेले मंत्रिमंडळ आणि पंतप्रधान संसदेच्या कार्यावर सहज प्रभाव गाजवू शकतात. पक्षशिस्तीच्या बंधनामुळे हे काम सोपे होते. थोडक्यात, बहुमत असलेल्या पक्षाचे सदस्य सरकारची पाठराखण करण्याव्यतिरिक्त फारसे महत्त्वाचे काम करू शकत नाहीत. जनतेचे प्रतिनिधित्व नावाचेच राहते.

संसदीय लोकशाहीत यामुळे विरोधी पक्षाला मोठे महत्त्व असते. तो अल्पमतात असला तरी त्याच्या कार्यातून लोकमताचे प्रतिबिंब कायदेमंडळाच्या कामकाजात दिसू शकते. मंत्रिमंडळाला लोकाभिमुख ठेवण्याचे कार्य प्रामुख्याने विरोधीपक्षाच्या परिणामकारक कामाने होत असते. विरोधी पक्ष तुल्यबळ असेल तर तो बहुधा भावी राज्यकर्ता पक्ष म्हणून ओळखला जातो. सरकारवर नियंत्रण ठेवण्याबरोबरच सरकारला कार्य करू देण्याची जबाबदारी विरोधी पक्षावर असते.

हे चांगल्या संसदीय लोकशाहीचे सामान्यत: स्वरूप म्हणता येईल; परंतु काही वेळा कोणत्याच एका पक्षाला बहुमत नसेल तर परिस्थिती गुंतागुंतीची होते. फ्रान्समध्ये पूर्वी असे नेहमी घडे. भारतातही अनेक घटकराज्यांत १९६७ च्या निवडणुकांनंतर असे घडले होते. अशा वेळी संसदीय पद्धतीत सामान्यतः नामधारी सत्ता असलेल्या घटनात्मक प्रमुखाला काहीसे महत्त्व येते; पण त्यामुळे परिस्थितीत फारसा गुणात्मक बदल होतोच असे नाही.

## १९४७–१९८१

स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये कॉंग्रेस हा एकच मोठा पक्ष केंद्रस्थानी सतत तीस वर्षे सत्तेवर राहिला. या काळात तुल्यबळ विरोधी पक्ष कधी उभाच राहू शकला नाही. अनेक पक्ष कायदेमंडळात सरकारला विरोध करीत; पण त्यांचा विरोध खऱ्या अर्थी परिणामकारक ठरू शकत नसे. विरोधी पक्षात अनेक उत्तम संसदपटू होते. त्यांचेमुळे संसदेत चैतन्य दिसे एवढेच म्हणता येईल. विरोधी पक्षांतील परस्परभिन्न विचारप्रणालींमुळे कधीच संघटितपणा निर्माण होऊ शकला नाही. याउलट स्वातंत्र्य–चळवळीतील कॉंग्रेसचे कार्य, त्या कार्याची भावनिक पुण्याई, नेत्यांची मालिका, म. गांधी, पं. नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद, मौलाना आझाद यांच्या लोकमानसातील प्रतिमा इत्यादि अनेक करणांमुळे कॉंग्रेसपक्ष प्रभावी राहिला. कॉंग्रेसच्या भारतभरच्या कार्यकर्त्यांमुळे तो निवडणुकांत सतत विजयी होत राहिला. याशिवाय भारतीय लोकांत सत्तेवर असलेल्या व्यक्तींमागे धावण्याची काही प्रमाणात व्यक्तिपूजक व काही प्रमाणात लहानमोठे फायदे मिळविण्याची स्वार्थी प्रवृत्ती असल्याने कॉंग्रेसपक्षाच्या दीर्घसत्तेला आधार मिळाला. इतर लहान–मोठ्या प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरांवरील पक्षांतून दुय्यम किंवा त्याहून कनिष्ठ पातळीवरील 'पुढारी' किंवा कार्यकर्ते सातत्याने सत्ताधारी कॉंग्रेस पक्षात जात राहिले याचे कारण भारतीय समाजाची वरील प्रवृत्तीच होय. याउलट विरोधी पक्षात वृत्तपत्रीय प्रसिद्धीच्या झोतात राहिलेले नेते दिसत होते; पण त्या पक्षांना नेहमीच सामान्य कार्यकर्त्यांची वाण राहिली. त्यामुळे निवडणुका जिंकण्याचे त्राण त्यांच्यात निर्माण होऊ शकले नाही. निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या पैशाचा ओघही सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाकडे सतत वाहात होता. देशातील उद्योगपती, व्यापारी, सरंजामदार इत्यादी सधन वर्ग नेहमीच कॉंग्रेसच्या पाठीमागे होता व दिलेल्या पाठिंब्याचा लाभही तो उठवत राहिला. कॉंग्रेसच्या सर्वोच्च पातळीवरील नेतृत्व प्रामाणिक नव्हते असे खात्रीपूर्वक म्हणणे अशक्य आहे; पण हे नेतृत्व राजकीय सत्ता मिळविण्यासाठी ज्यांची आर्थिक वा इतर अनेक प्रकारे मदत घेत होते त्यांच्या गैरव्यवहारांना कधीच आळा घालू शकले नाही. एका बाजूने समाजवादी घोषणा होत होत्या, काही प्रमाणात कायदे वा तत्सम धोरणे, आखलेली वा संमत झालेली दिसत होती; पण त्यांची परिणामकारक अंमलबजावणी मात्र कधीच झालेली दिसली नाही. नेतृत्वाची प्रशासकीय अकार्यक्षमता, निश्चयाचा अभाव, दडपणांना बळी पडण्याची प्रवृत्ती, धरसोडवृत्ती, इतर सर्व गोष्टींपेक्षा राजकीय सत्ता हातात ठेवण्याची आत्यंतिक इच्छा आणि प्रस्थापित हितसंबंध असलेल्या वर्गाची एकूण समाजजीवनातील पकड यामुळे समाजवादाचा उद्घोष आणि देशातील सतत वाढत जाणारी विषमता ही विसंगती स्वातंत्र्योत्तर भारताचे वैशिष्टयच बनले. उत्पादनवाढीतून निर्माण झालेल्या संपत्तीचे नियंत्रण आणि उपभोग या गोष्टी एकूण लोकसंख्येच्या मानाने फार लहान वर्गाच्या हाती राहिल्या. यामुळे लोक सतत त्रासलेले आणि असंतुष्ट राहिले आणि तरीसुद्धा कॉंग्रेसपक्ष निवडणुका जिंकीतच राहिला. मात्र निवडणुकीतील मतदानाचा विचार केल्यास झालेल्या मतदानाच्या

कधीही निम्म्याहून अधिक मते सत्तेवर येणाऱ्या कांग्रेसपक्षाला मिळालेली नाहीत ही गोष्ट खालील आकडयांवरून सिद्ध होते.

| लोकसभा निवडणूक | एकूण जागा | कांग्रेसला मिळालेली मते (टक्के) | कांग्रेसचे निर्वाचित उमेदवार संख्या | एकूण संख्येशी त्यांच्या संख्येचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १९५२ | ४८९ | ४५% | ३६४ | ७४% |
| १९५७ | ४९४ | ४७.७८% | ३७१ | ७४% |
| १९६२ | ४९४ | ४५.६% | ३५८ | ७०% |
| १९६७ | ५२१ | ४०.१% | २८१ | ५४% |
| १९७१ | ५१५ | ४३.१% | ३५० (नवकांग्रेस) | ६८% |

१९७७ च्या निवडणुकीत जनतापक्षालादेखील ( मित्रपक्षांसह ) २९९ जागा मिळाल्या; पण मतांचे प्रमाण ४३.१७% एवढेच होते. विधानसभांच्या निवडणुकांत सामान्यतः असेच चित्र असे. काही वेळा काही घटकराज्यात कांग्रेसला बहुमत मिळाले नाही, त्याऐवजी विरोधी पक्षांची संयुक्त मंत्रिमंडळे सत्तेवर आली. काश्मिरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स किंवा तामिळनाडूत द्रा. मु. क. वा अण्णा द्रा. मु. क. असे क्वचित उदाहरण एखाद्या विरोधी पक्षाच्या हाती सत्ता येण्याचे दिसते.

भारतीय संसदीय लोकशाहीच्या वाटचालीत ही गोष्ट निरोगी तर नाहीच, उलट दुर्धर रोगाच्या अस्तित्वाचीच निदर्शक म्हणता येईल. पन्नास टक्क्यांहून कमी मते मिळूनही लोकसभेतील बहुमत मात्र सत्तर टक्क्यांवर ही मोठीच विसंगती होय. याचा एक परिणाम असा झाला की, विरोधी पक्षात रस्त्यावर येण्याची प्रवृत्ती सतत वाढत राहिली व संसदीय व्यवस्थेबाबत वैफल्य निर्माण झाले. १९७७ मध्ये जनता पक्ष सत्तेवर आल्यावर रस्त्यावर सतत येण्याचे काम तत्कालीन 'इंदिरा कांग्रेस' या प्रमुख विरोधी पक्षाने केले. १९५२ च्या निवडणुकीत राष्ट्रीय स्तरावर १४ पक्ष आणि प्रादेशिक स्तरावर ५० पक्ष सामील झाले होते. नंतरच्या काळातही या चित्रात फारसा बदल झाला नाही. विरोधी पक्षांची मोठी संख्या, त्यांच्यातील परस्परविरोध, व्यक्तिनिष्ठ पक्षांचा बुजबुजाट, नवे पक्ष निर्माण होणे व त्यांचे पुन्हा तुकडे होणे ही विरोधी पक्षांची प्रतिमा लोकांच्या दृष्टीने नेहमीच नावडती होती. विरोधी पक्षांना संसदीय लोकशाहीच्या वाटचालीतील अपयशाला काही प्रमाणात का होईना दोष दिलाच पाहिजे.

## वळण मिळायला हवे होते

स्वातंत्र्यानंतर जवळजवळ पंचवीस वर्षे एकाच पक्षाचे सरकार केंद्रस्थानी मोठ्या बहुमताचे आधारे सत्तेवर असूनसुद्धा ते हुकुमशाही प्रवृत्तीचे झाले नाही. पं नेहरूंची लोकशाहीवरील श्रद्धा हे याचे प्रमुख कारण होतेच; पण त्याशिवाय कांग्रेस पक्षाचे स्वरूपही त्याला कारणीभूत होते. पक्षांतर्गत गट आणि प्रवाह परस्परांवर नियंत्रण ठेवण्याचे, छेद देण्याचे आणि त्यातून समतोल निर्माण करण्याची कामगिरी बजावीत; पण यामुळेच पक्षांचे घोषित कार्यक्रम खऱ्या अर्थी अंमलात येत नसत, पक्षाच्या अधिवेशनात होणाऱ्या घोषणाच रहात. या सर्व काळात सरकार म्हणजे कारभार करणारी एक यंत्रणा एवढेच कांग्रेस पक्षीय सरकारचे स्वरूप राहिले. एकामागोमाग एक पंचवार्षिक योजना पार पडल्या, शेतीत आणि उद्योगधंद्यात प्रगती दिसत होती, देशाच्या चेहऱ्यामोहऱ्यात वरून तरी बदल दृष्टोत्पत्तीस येत होता; परंतु वाढणाऱ्या लोकसंख्येच्या जीवनमानाच्या पातळीत काही प्रमाणात ऱ्हासच होत होता. यापूर्वी म्हटल्याप्रमाणे समाजातील काही घटकांच्या उपभोगात मोठी वाढ झाली तरी बहुसंख्य लोक त्यापासून वंचितच राहिले. त्यांच्या आकांक्षा मात्र वाढत गेल्या. त्यामुळे असंतोष, वैफल्य, दारिद्र्य, लाचारी यात तेवढी वाढ झाली. समाजवादाच्या घोषणा होत असताना समाजवादाच्या विरोधीच वाटचाल झाली. भारतीय सार्वजनिक जीवनाची ही शोकांतिका होती.

खरे पाहिले असता याच काळात भारतातील संसदीय लोकशाहीला निश्चित वळण मिळावयास हवे होते, ती प्रतिष्ठित व्हावयास हवी होती, तांत्रिक तसेच व्यावहारिकदृष्ट्या ती प्रगल्भ व्हावयास हवी होती. राजकीय व सामाजिक जीवनात संकेत निर्माण व्हावयास हवे होते, पक्षपद्धती अनुभवातून तरी विकसित व्हावयास हवी होती; पण यातील काहीच झाले नाही. भारतीय समाजाच्या हाडीमाशी रुजलेले स्वभावदोष याला जसे कारणीभूत आहेत तसेच राजकीय नेत्यांची, विशेषतः सत्ताधारी नेत्यांची अकार्यक्षमता आणि संकुचित स्वार्थी वृत्ती हेही त्याचे महत्त्वाचे कारण आहे. १९५२ पासून ज्याची चर्चा चालू आहे ते पक्षांतरविषयक विधेयक अजूनही कायद्यात समाविष्ट होऊ शकले नाही, अशा गोष्टींचे समर्थन करता येणार नाही. ज्यांच्यावर ते संमत करवून घेण्याची जबाबदारी होती त्यांच्या पदरात त्यांच्या पापाचे माप घातलेच पाहिजे. भारताला संसदीय लोकशाहीचा मोठा पूर्वानुभव नव्हता, तशी परंपराही येथे नव्हती. अशा वेळी घटनानिर्मितीत ज्यांनी भाग घेतला होता आणि प्रामुख्याने त्यांचेच हाती ती राबविण्याचीही सत्ता आलेली असताना, त्यांनी संसदीय लोकशाही सुस्थिर आणि सुप्रतिष्ठित करण्यासाठी जे जाणीवपूर्वक प्रयत्न करावयास हवे होते त्यात ते निश्चितच कमी पडले. वास्तविक त्यांचेवर पडलेली ती ऐतिहासिक स्वरूपाची जबाबदारी होती इंग्लंडमध्ये १९५६ मध्ये सुवेझविषयक धोरण फसल्यावर अँथनी ईडन यांनी राजीनामा देऊन निवृत्ती स्वीकारली. त्यांचेनंतर पंतप्रधानपदावर आलेले हॅरॉल्ड मॅकमिलन व हॅरॉल्ड विल्सन स्वेच्छेने निवृत्त झाले. त्यांनी खासगी जीवन जगणे पसंत केले. आजही हे दोघे जिवंत आहेत; पण त्यांनी राजकारणात पुन्हा कधी लुडबुड केल्याचे ऐकिवात नाही. आपल्याकडे ज्यांनी निवृत्ती समारंभपूर्वक जाहीर केलेली असते तेही आपल्याशिवाय देशाचे कसे होणार या 'चिंते' ने पुन्हा राजकारणात नव्या उत्साहाने उतरल्याचे दृश्य पहावयास मिळते. वर्षानुवर्षे ठराविक मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करणारे आणि अधिकारपद भोगणारे आपल्या निवृत्तीचा कधी विचारच करू शकत नाहीत. एका मतदारसंघाचे २० ते ३० वर्षे प्रतिनिधित्व करणारे किंवा तितकीच वर्षे मंत्रिपद उपभोगणारे भारतात किती तरी दाखविता येतील. कोणतेही मंत्रिपद मिळाले तरी चालेल, प्रसंगी सरळ सरळ पदावनती मान्य करून देखील सत्तेला चिकटू पाहणारे अनेक राजकीय मुंगळे येथे सापडतात. एकदा मंत्रिपद गेल्यावर पुन्हा ते

मिळविण्याची धडपड करणारे, कोणत्याही मंत्रिपदावर समाधान मानून घेणारे, मंत्रिपद न मिळाल्यास एखादे राज्यपालपद मिळवू इच्छिणारे आणि यातील काहीच साध्य न झाल्यास विविध मंडळे आणि समित्या यांपैकी कोठे तरी चिकटणारे महाभाग भारतात अनेक आहेत. यामुळे काही फायदे मिळतात आणि बाजूला फेकले न जाण्याची शक्यता असते हाच त्यांचा उद्देश असतो. भारतासारख्या ६८ कोटींहून अधिक लोकसंख्या असलेल्या देशात 'आमच्याशिवाय चालणार नाही' ही राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या नेत्यांची वृत्ती खऱ्या लोकशाहीच्या कल्पनेशी विसंगत आहे. संसदीय लोकशाहीमध्ये राजकीय नेतृत्वात सातत्याने भरती होत राहिली पाहिजे, असे झाले तरच नवोदित, होतकरू लोकप्रतिनिधींना किंवा कार्यकर्त्यांना उत्तेजन मिळते, लोकशाही व्यवस्थेच्या दर्जामध्ये गुणात्मक बदल होत राहतो, कारभारयंत्रणा चैतन्यमय राहू शकते आणि राजकीय जीवनात मरगळ दिसत नाही. पक्षांतर्गत रस्सीखेच, गटबाजी, चिखलफेक, चारित्र्यहनन यांसारख्या गोष्टींनाही आळा बसतो. भ्रष्टाचारी मार्ग वापरून अधिकारपद मिळविण्यापेक्षा गुणांच्या आधारावर अधिकारपद मिळविण्याची माफक स्पर्धा राहू शकते. हे आपल्याला करता आले नसते का? काही बाततीत कायदे आणि काही बाबतीत संकेत रूढ करून हे करणे अशक्य नाही. माझे असे विचारपूर्वक मत बनले आहे की, कोणतेही सार्वजनिकपद हे एका व्यक्तीकडे ८ ते १० वर्षांहून अधिक काळ नसावे, उदाहरणार्थ राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्री, खासदार, आमदार, जिल्हापरिषद पदाधिकारी, नगरपरिषदांतील पदे, सहकारी साखरकारखाने वा तत्सम आर्थिक प्रभावाची केंद्रे, शिक्षणसंस्था, कोणत्याही प्रकारच्या सोसायट्या इत्यादी ठिकाणी सुमारे १० वर्षे संबंधित नेतृत्वाला आपले कर्तृत्व दाखविण्यास पुरेशी आहेत. जास्त काळ पदावर राहणे म्हणजे इतरांना ती संधी नाकारणे होय. सार्वजनिक जीवनातील हा एक प्रकारचा अपराधच आहे. यामुळे समाजजीवन स्वच्छ आणि प्रवाही राहात नाही, तसेच भ्रष्टाचाराला अनुकूल परिस्थिती राहते. आपल्या मंत्रिपदाला स्पर्धक निर्माण होऊ नयेत म्हणून अशा नव्या इच्छुकांसाठी सार्वजनिक क्षेत्रात नवी पदे निर्माण करून ती द्यावयाची ही राज्यकर्त्यांची रीतच होऊन बसली आहे हा राजकीय क्षेत्रातील भ्रष्टाचार आणि सामाजिक जीवनातील गुन्हाच होय. हे टाळण्यासाठी सार्वजनिक पदे ८ ते १० वर्षांहून अधिक काळ एका व्यक्तीकडे राहणार नाहीत हे कायद्यांनी व्हायला पाहिजे यु. एस. ए. मध्ये राष्ट्राध्यक्षपद दोनहून अधिक वेळा (म्हणजेच ८ वर्षे) एकाला मिळू शकणार नाही हे घटनेने सांगितले आहे. कॉंग्रेस पक्षाकडे दीर्घकाळ सत्ता असताना वास्तविक हे व्हायला हवे होते. अजूनपर्यंत ते होऊ शकत नाही याचे कारण आपले राजकीय नेते मूलत: स्वार्थी, सत्तापिपासू, दूरदृष्टीचा अभाव असलेले आणि भावी राजकीय किंवा सामाजिक समस्यांकडे गांभीर्याने किंवा तळमळीने पाहण्याची इच्छाच नसलेले होते व आहेत. भावी काळासाठी चांगला वारसा ठेवावा याचा विचार करण्याचे भान त्यांना नाही. इतिहास त्यांना क्षमा करेल असे मला वाटत नाही.

श्रीमती इंदिरा गांधी प्रथम जरी १९६६ मध्ये पंतप्रधान झाल्या तरी खरी सत्ता त्यांचे हाती १९६९ नंतरच आली. त्यानंतरच्या काळात त्यांनी काही नवी धोरणे स्वीकारून ती कार्यवाहीत आणण्याचा निश्चितच प्रयत्न केला. त्यांचेकडे त्या वेळी प्रामाणिकपणा नव्हता असे म्हणता येणार नाही; पण परिस्थितीचा गुंता त्यांच्या आवाक्याबाहेर होता. त्यामुळे १९७१ नंतरच्या काळात मोठे बहुमत त्यांच्या पाठीशी असूनही नवनव्या प्रभावी घोषणा करणे आणि मंत्रिमंडळात अनेकदा बदल करणे याशिवाय त्यांचे हातून भरीव असे काही होऊ शकलेच नाही, याची जाणीव जशी त्यांना होऊ लागली तसे त्यांनी आपल्या हाती सत्ता केंद्रित करण्यास प्रारंभ केला. विरोधी पक्षांपेक्षा त्यांना स्वपक्षीयांकडूनच जास्त धोका वाटत असावा की काय कोण जाणे; पण स्वपक्षातील प्रतिष्ठित नेत्यांना अस्थिर करावयाचे, त्यांच्याविरुद्ध टीका होईल हे पहावयाचे, मंत्रिमंडळात खातेपालट करावयाची किंवा अधूनमधून तशी हवा निर्माण करावयाची, घटकराज्यातील मुख्यमंत्री बदलावयाचे किंवा ते आपल्यामागे राहतील असे पहावयाचे या किंवा अशा प्रकारच्या गोष्टी करण्यातच त्यांच्या नेतृत्वाची शक्ती खर्ची पडत राहिली. पुन्हा पंतप्रधान बनल्यावरही त्यांचे सत्ता वापराच्या पद्धतीत काही फरक पडल्याचे दिसत नाहीच. अशा कृती करण्याच्या दृष्टीने त्यांचे राजकारण 'गतिशील' राहिले; पण त्याने काहीच साध्य झाले नाही. संसदीय लोकशाहीच्या मान्य स्वरूपावर १९७१ नंतरच सर्वांत जास्त आघात झाले. कायदेमंडळाची स्वतंत्र प्रतिष्ठा १९७१–७२ नंतर झपाट्याने खाली आल्याची अनेक उदाहरणे दाखविता येतात. संसदीय लोकशाहीत स्पीकरपदाचे आत्यंतिक महत्त्वाचे स्थान मानले जाते; पण या काळात स्पीकरपदासाठी दुय्यम पातळीवरच्या व्यक्तीची निवड करावयाची आणि अशा व्यक्तीने मंत्रिपद स्वीकारण्यासाठी स्पीकरपदाचा राजिनामा द्यावयाचा ही गोष्ट गुरदयाळसिंग धिल्लांबाबत दिसते. त्यानंतर एका राज्यमंत्र्याला (श्री. बळिराम भगत) लोकसभेचे स्पीकर करण्यात आले. हे फार वाईट होते. श्री. ग. वा. मावळंकर किंवा श्री. अनंतशयनम् अय्यंगार यांचेसारखी प्रतिष्ठा स्पीकरपदावरील व्यक्तीला पुढे राहिली नाही. मंत्र्यांच्या पातळीवरील लोकांना लाचार बनविणे, त्यांना भीतिग्रस्त ठेवणे, त्यांचेकडून विरोध होणार नाही हे पाहणे, व्यक्तिस्तोम वाढविणे यासाठी पद्धतशीर प्रयत्न झाले. यासाठी राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या लोकांना पुढे आणणे व आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांना वापरण्याचे एक तंत्रच निर्माण झाले. श्री. यशपाल कपूर यांचे उदाहरणाने हे स्पष्ट होते. श्री. संजय गांधीसारख्या तरुणाला कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना केवळ पंतप्रधानांचा पुत्र म्हणून आत्यंतिक महत्त्व आले. असे करताना कोणताही विधिनिषेध ठेवण्यात आला नाही. यामध्ये लाचार आणि हितसंबंधी अनुयायांचा जसा मोठा दोष दिसतो तसा अशा अनुयायांना उत्तेजन देण्याच्या प्रवृत्तीचाही दोष दिसतो. याला आळा घालता आला नसता का? पण अशी गोष्ट अजाणता होत नसते, त्यापाठीमागे विशिष्ट हेतू असतो. घराण्याच्या हाती सत्ता राहावी हा मोठा मोह भारतीय लोकांच्या प्रवृत्तीचा विचार केल्यास स्वाभाविक, पण लोकशाहीच्या कल्पनेविरुद्ध येथे आढळतो. ही गोष्ट श्रीमती केवळ गांधींसारख्या सर्वोच्च पातळीवरील नेतृत्वातच होती

असे नव्हे, राज्यपातळीवरील, जिल्हा पातळीवरील, अगदी गावपातळीवरच्या पुढाऱ्यांतही हेच आढळते. लोकप्रतिनिधिपद वा मंत्रिपद यावर किती तरी खासदार–आमदारांनंतर त्यांचे मुलगे–मुली आणि पत्नी विराजमान झाल्याचे किंवा त्यांची काही तरी राजकीय सोय करण्यात आल्याची अनेक उदाहरणे सर्वश्रुत आहेत. या प्रवृत्तीला सरंजामशाहीची प्रवृत्ती याशिवाय दुसरे नावच नाही. ही सरंजामी मनोवृत्ती भारतीय समाजजीवनात खोलवर रुजली आहे. याबाबतीत लोकांचा मोठा दोष असला तरी त्यांना वळण न लावू इच्छिणाऱ्या नेतृत्वाचा फार मोठा दोष आहे असे वाटते. लोकशाही नेतृत्वाचे ते नैतिक उत्तरदायित्व असते.

याच काळात न्यायमंडळाच्या स्वतंत्र स्थानावर आणि प्रतिष्ठेवरही तीव्र आघात झाले. याचे घातक परिणाम काय होतील-याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यात आले. भारतीय न्यायव्यवस्थेत मोठे दोष होते आणि आजही आहेत यात शंकाच नाही. बऱ्याच वेळा खराखुरा न्याय प्रस्थापित होऊच शकत नाही हेही खरे आहे; पण यासाठी न्यायसंस्थेला सवंग टीकेचे लक्ष्य बनविणे हे अयोग्य होते. कोणतीही स्पष्ट उद्देश असणारी सामाजिक–आर्थिक न्याय प्रस्थापित करू शकणारी नवी व्यवस्था न सांगता, असणाऱ्या न्यायव्यवस्थेच्या पायाला हादरे देण्याव्यतिरिक्त यातून काही दिसून आले नाही. १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदावर तीन न्यायाधिशांची सेवाज्येष्ठता डावलून श्री. अजितनाथ रे यांची नेमणूक करून नेमके काय साधण्यात आले हे आजही सांगता येत नाही; पण त्यानंतर मध्यवर्ती जबाबदार मंत्र्यांपासून गल्लीबोळातल्या 'पुढाऱ्यां'पर्यंतच्या असंख्यांनी न्यायव्यवस्थेच्या 'प्रतिगामित्वा'वर टीकेची झोड उठवली. याला निश्चित पुरोगामी उद्दिष्ट नव्हते, दिशा नव्हती किंवा योग्य मार्गदर्शनही नव्हते. संकुचित स्वार्थाचे व देशाचे अहित करणाऱ्या अदूरदृष्टीचे हे द्योतक म्हटले पाहिजे. यातून भुई धोपटण्याशिवाय काहीही साध्य झाले नाही. अशा गोष्टींना संसदेत विरोधी पक्ष विरोध करीत; पण अशा विरोधाला जुमानायचेच नाही असे ठरल्यावर त्या विरोधाला काही अर्थ उरला नाही. 'बहुमत' मात्र आंधळे बनले होते. चुकीचे पायंडे पडत होते व जुने चांगले मोडले जात होते. संसदेतील सत्ताधारी पक्ष आपले राष्ट्रीय कर्तव्य विसरून सर्वोच्च नेतृत्वाचा अहंकार, महत्त्वाकांक्षा आणि अधिकारशाही प्रवृत्तीचा जणू दास बनला होता. संसद ही संसदीय लोकशाहीतील सर्वोच्च प्रातिनिधिक संस्था आहे. ती संपूर्ण देशातील नागरिकांचे प्रतिनिधित्व करीत असते. राज्यघटनेचे रक्षण करण्याचे आणि नागरिकांच्या हितासाठी सरकार कार्य करीत आहे की नाही हे पाहण्याचे तिचे उत्तरदायित्व असते. या सर्व महत्त्वाच्या तत्त्वांकडे या काळात दुर्लक्ष करण्यात आले. संसदेतील बहुमत हे सर्वोच्च नेतृत्वाच्या इच्छा, ईर्षा आणि लहरीनुसार वापरण्यात आले. बहुमत ताब्यात ठेवण्यासाठी विशिष्ट मार्ग वापरण्यात आले. उदाहरणार्थ, पाच किंवा अधिक वर्षे आमदार किंवा खासदार असणाऱ्या व्यक्तीला पुढे आयुष्यभर पेन्शन देणे. हा व्यापक अर्थाने भ्रष्टाचारच होता. काही घटकराज्यांतील आमदार सर्व देशभर रेल्वेच्या प्रथम वर्गाने फुकट प्रवास करू शकतात हे कदाचित अनेकांना माहीतही नसेल! जनता पक्षाने आपल्या अडीच वर्षांच्या कार्यकालातही याबाबत काही केले नाही, त्या पक्षाला काही करणे शक्यही झाले नसते. कारण शेवटी आपल्या समाजाच्या काही प्रवृत्ती आहेत. प्राप्त झालेल्या अधिकाराचा स्वार्थासाठी उपयोग करणे आणि जे सार्वजनिक आहे त्याचा मिळेल तेवढा मोफत उपभोग घेणे ही सर्वत्र दिसणारी प्रवृत्ती आढळते. हा प्रकार भ्रष्टाचाराचाच असतो. जेवढा अधिकार आणि दर्जा मोठा तेवढी भ्रष्टाचाराची व्याप्ती मोठी होऊ शकते.

१९७४ पासून देशापुढील समस्या तीव्रतर होत गेल्या. विरोधकांनीही मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर येण्याच्या कृती सुरू केल्या. श्रीमती गांधींचे सरकार अकार्यक्षमता, भ्रष्टाचार आणि अधिकारशाहीतील दुय्यम नेतृत्व किंवा नोकरशाहीची भीतिग्रस्त व लाचार मनोवृत्ती यामुळे या समस्या सोडविण्याबाबतीत पूर्णतः अपयशी ठरलेले दिसत होते. विरोधकही संघटित होऊ लागले. अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर 'आणीबाणी' पुकारली गेली. 'आणीबाणी'त मोठ्या संख्येने विरोधकांना तुरुंगात डांबण्यात आले, वृत्तपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली. संपूर्ण देशातच एक दडपणाचे, भीतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. नेत्यापेक्षा अनुयायांचा उत्साहच याबाबत मोठा होता. दुय्यम किंवा त्याहून कनिष्ठ दर्जाचे सत्ताधारी राजकीय नेते, सत्ताधारी पक्षाचे स्थानिक नेते, सरकारी अधिकारी, पोलिसखाते यांनी जणु सर्व समाजाला ओलीस धरले होते असे 'आणीबाणी'च्या दीड वर्षातील वातावरण होते. तो सर्व इतिहास अजूनही ताजा आहे. या कालावधीत ज्या घटनादुरुस्ती करण्यात आल्या त्यामुळे 'लोकशाही' व 'कायद्याचे राज्य' या कल्पनाच धोक्यात आल्या. शेवटी सार्वत्रिक निवडणुकीची संधी मिळाल्यावर श्रीमती गांधींच्या सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाचा मोठा पराभव झाला आणि विरोधक प्रथमच केंद्रात सत्तेवर आले.

## जनतापक्षाची कारकीर्द आणि नंतर

देशातील वातावरण एकदम मोकळे झाले. जनता पक्षाने काही घटनादुरुस्त्या संमत करवून 'आणीबाणी'तील गाजलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीतील आक्षेपार्हता काढली. तरीसुद्धा सर्वच कृती दूरदृष्टीच्या होत्या असे नव्हे. जनतापक्षाच्या काही कृती तर आधीच्या सरकारच्या कृतींना केवळ प्रतिक्रिया म्हणून करण्यात आल्या. विशेषतः श्रीमती गांधींच्या विरोधी अनेक आयोग निर्माण करून आणि त्यांचेवर खटले भरून शेवटी लोकमताला देखील उबग आणला. जनता सरकारमधील अनेक सत्तारूढ व्यक्ती पूर्वीच्या कॉंग्रेस संस्कृती'तूनच आलेल्या होत्या. त्यांची स्पर्धा, रस्सीखेच, राजकारणाची हीन पातळी, गटबाजी, चारित्र्यहननात्मक प्रचार यातून शेवटी लोकांनी ज्या पक्षाला प्रचंड बहुमत मिळवून उत्साहाने सत्तेवर आणले होते त्या पक्षाने लोकांचा विश्वासघात केला असेच म्हटले पाहिजे. पूर्वीचे समाजवादी व जनसंघीय यांनीही यातील आपला वाटा उचलला होता. केवळ अडीच वर्षांत त्या पक्षाची सत्ता संपुष्टात आली. राजकीय पक्षांची आणि नेत्यांची विश्वासार्हताच संपल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. भारतीय लोकशाहीची ही एक शोकांतिकाच होती. लोकसभेमध्ये ज्या सरकारचे बहुमत कधीही सिद्ध होऊ शकले नाही अशा चरणसिंग सरकारने चार महिने देशाची सत्ता

उपभोगल्यावर लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत राजकीय अस्थिरतेला अक्षरशः उबगलेल्या लोकांनी पुन्हा श्रीमती गांधीना पुरस्कार दिला. त्यानी स्थैर्याचे आश्वासन दिले होते. श्रीमती गांधी प्रभावी लोकनेत्या होत्या. प्रतिकूल परिस्थितीत खंबीरपणे वागून त्यांनी जनमानसात पुन्हा स्थान मिळवून सत्ता खेचून आणली हे निश्चितच कौतुकास्पद म्हणता येईल; पण त्या सत्तेवर आल्यानंतर देशापुढील समस्या पुन्हा एकदा तीव्रतर झाल्या, यात परिस्थितिजन्य कारणांपेक्षा त्यांच्या कार्यपद्धतीतील मूलभूत दोष हेच बहुतांशी कारणीभूत आहेत. समस्यांचा सखोल अभ्यास करून त्यावर परिणामकारक ठरतील अशी धोरणे आखून ती राबविण्यापेक्षा त्यांची क्षेप घोषणा करणे आणि सत्ताधारी पक्षात सतत अस्थिर भवितव्याचे वातावरण निर्माण करून दडपण ठेवणे यापलीकडे गेली नाही असे दिसते. मंत्र्यांमध्ये खातेपालट करणे, मुख्यमंत्र्यांना बदलणे, न्यायव्यवस्था, राज्यपाल, वरिष्ठ सरकारी अधिकारी यांचेवर दडपण राहील अशा कृती करणे यापलीकडे या काळात फार काही घडले नाही. संसदीय लोकशाहीची ही एक कसोटीच आहे असे म्हणावे लागेल. भारतीय संसदीय पद्धतीत बरेच दोष आहेत यात शंकाच नाही; पण अध्यक्षीय पद्धती व तत्सम काही हे त्याचे उत्तर नाही. अध्यक्षीय पद्धती एक यु. एस. ए. हा देश सोडल्यास कोठेही यशस्वी ठरलेली नाही. उलट द. अमेरिका, आफ्रिका, आग्नेय आशिया इत्यादि प्रदेशात त्यातूनच हुकुमशाही सत्ता निर्माण झाल्या हा इतिहास आहे. भारतात लोकशाही विचार निश्चितच व्यापकपणे आणि खोलवर रुजलेला आहे आणि मान्य झालेला आहे. प्रस्थापित व्यवस्थेतील दोष जाणीवपूर्वक दूर करणे हे सत्ताधारी तसेच विरोधी पक्षांचे आणि व्यापक अर्थाने भारतीय लोकांचे कर्तव्य आहे. ज्याला भावी काळाची काळजी वाटते आणि भारताच्या प्रश्नांची जाण आहे त्याने घटनाकर्त्यांनी पूर्ण विचारांती स्वीकारलेल्या संसदीय लोकशाहीला पुरस्कार देणे अगत्याचे आहे. नेत्यांनी आणि लोकांनीही काही संकेत पाळले पाहिजेत. तेवढे होऊ शकले तर तेथील लोकशाही व्यवस्थित मार्गस्थ राहील.

## काही सुधारणा

भारताच्या संसदीय लोकशाही व्यवस्थेत काही सुधारणा घडवून आणण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्यास तिचे सध्याचे स्वरूप निश्चितपणे सुधारेल असे वाटते. खरे तर अशा सुधारणा करणे फारसे कठीण नाही. यापैकी काही सुधारणा कायदे संमत करून करता येतील, तर काही संकेतांच्या सहाय्याने प्रत्यक्षात आणता येतील. भारतातील सत्ताधारी आणि इतर पक्षांतील नेतृत्वाने भावी काळाचे भान ठेवून हे करावयास हरकत नाही. जागृत नागरिकांनी याबाबत राजकीय नेत्यांवर आणि आपल्या प्रतिनिधींवर जरूर तर दबाव आणून त्यांना लोकशाही निकोप करण्याच्या दृष्टीने अशी पाऊले उचलण्यास प्रवृत्त करावे. कायदे करून ज्या सुधारणा करता येतील अशा काही सुधारणा खाली सुचवीत आहे.

१. भारतीय राष्ट्रपतीपद जास्त कार्यप्रवण करता येणे शक्य आहे. आजपर्यंतचे राष्ट्रपती बऱ्याच अंशी पक्षातीत राहिल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर काही विशिष्ट परिस्थितीत वापरण्याजोगे 'डिस्क्रिशनरी' अधिकार राष्ट्रपतींना दिल्यास त्या प्रसंगी देशात मतभेद आणि वादंग यांचे जे दर्शन होते आणि त्यातून राजकीय जीवनात जो गढूळपणा येतो तो टाळता येईल. उदाहरणार्थ, घटक राज्यातील मंत्रिमंडळ पदच्युत करून तेथे राष्ट्रपती-अंमल पुकारण्याचा निर्णय हा राज्यपालांच्या अहवालानंतर स्वतः राष्ट्रपतींनी घ्यावा. अशा प्रसंगी केन्द्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेऊ नये किंवा तशी शिफारस केल्यास ती राष्ट्रपतीवर बंधनकारक असू नये. यासाठी घटनादुरुस्ती करावी लागेल. देशाची एकात्मता टिकविण्यासाठी घटनेने केन्द्रसत्तेला व्यापक अधिकार दिलेले आहेत त्यांचे मार्गदर्शन राष्ट्रपतीना राहील. असा बदल जर घडवून आणला तर विरोधी पक्षीय घटकराज्यांना राजकीय भीती वाटणार नाही.

२. निवडणुकांपूर्वी निदान दोन महिने घटकराज्यांमधील कायदेमंडळ व मंत्रिमंडळ विसर्जित करून तेथे राष्ट्रपतींचा अंमल असावा. लोकशाहीची कल्पना येथे उगाच ताणू नये. राष्ट्रपती हे देखील अप्रत्यक्ष लोकांचेच प्रतिनिधी असतात. हा बदल केल्यास सत्तेचा वापर निवडणुका जिंकण्यासाठी जो केला जातो ती परिस्थिती टाळता येईल. नाही तरी या काळात मंत्री कार्यालयीन काम जवळजवळ करीतच नाहीत. यामुळे काही बिघडणार नाही. राज्यपाल वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने कारभार पाहू शकतील. अर्थात केन्द्रसरकारबाबत मात्र असे करून चालणार नाही.

३. घटकराज्यात ज्या वेळी एका पक्षाला निश्चित बहुमत मिळत नाही वा असे बहुमत मिळवू शकणारी एखादी आघाडी स्थिररूपात दिसत नाही, त्या वेळी मंत्रिमंडळ अस्थिर राहते व राजकीय भ्रष्टाचार व गैरप्रकारांना वाव मिळतो. अशा वेळी कायदेमंडळ विसर्जित करून राज्यपालांना दोन वर्षांसाठी प्रशासक नेमावे. या काळात राजकीय अस्थिरता दिसणार नाही. दोन वर्षांनंतर मध्यावधी निवडणूक घेऊन लोकप्रतिनिधींच्या हातो सत्ता पुन्हा सोपवावी. या काळात अंदाजपत्रक संसदेकडून संमत करून घेता येईल. आवश्यकतर विधान परिषदेचा प्रभाव वाढविता येईल. त्याने काही गोष्टी शक्य होतील.

४. केन्द्रसरकार व घटकराज्यांतील मंत्रिमंडळाच्या सदस्यांची कमास संख्या घटनेने निश्चित करावी. केन्द्रात ती ४० ते ४५ पर्यंत व घटकराज्यात २० ते २५ पर्यन्त पुरेशी आहे. यामुळे सौदेबाजी, अकार्यक्षमता, अनिश्चितता यांना पायबंद बसेल.

५. मंत्र्यांचे व लोकप्रतिनिधींचे भत्ते व सवलती यांना मर्यादा हवीच. आवश्यक तर त्यांचे वेतन वाढवून द्यावे व सवलती, भत्ते कमी करावे. त्यांना स्वतःच्या खिशातून खर्च करण्याची वेळ आली पाहिजे. कायद्यांच्या निर्मात्यांनी स्वतःचे भत्ते व सवलती वाढवून घेणारे कायदे करणे म्हणजे मोठा भ्रष्टाकारच आहे. त्यांनी असे कायदे पुढील कायदेमंडळासाठी वाटल्यास करावेत. मंत्र्यांचे दौरे व त्यांचेवर सार्वजनिक तिजोरीतून होणारा खर्च यांचे अहवाल जनतेसमोर निदान प्रत्येक तीन महिन्यांनी आले पाहिजेत घटकराज्यातील मंत्र्यांनी सरकारी खर्चाने दिल्लीस किती वेळा जावे याला धरबंधच दिसत नाही. या प्रवृत्तीला पायबंद आवश्यक आहे.

६. मंत्र्यांची व लोकप्रतिनिधींची मालमत्ता जाहीर होणे आवश्यक आहे. प्रत्येक वर्षी हे व्हावयास हरकत नाही. कारभार स्वच्छ दिसण्यासाठी ही गोष्ट महत्त्वाची आहे.

७. सरकारी धोरणांशी प्रत्यक्ष ज्यांचा संबंध नाही अशा अनेक

विषयांवर बिनसरकारी विधेयके मांडली गेल्यास सरकारने आपल्या पक्षातील सभासदांना (व सर्वच पक्षांनी अशा प्रकारे) मतदानस्वातंत्र्य द्यावे. असे झाल्यास सरकारच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण होत नाही; पण कायदेमंडळातील सदस्य लोकांच्या इच्छा परिणामकारकपणे व्यक्त करू शकतील. प्रत्येक विधेयकावर पक्षीय आदेशातून मतदानाची आवश्यकता नाही.

८. राष्ट्रपतींना पदभ्रष्ट करण्यासाठी सध्याच्या संसदेतील २/३ बहुमताऐवजी ३/४ बहुमताची अट असावी. याशिवाय निम्म्याहून अधिक घटकराज्यांऐवजी २/३ घटकराज्यांनी असा ठराव संमत करणे आवश्यक ठेवावे. यामुळे राष्ट्रपती जास्त निर्धास्त राहतील. अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाचे वेळी राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या दडपणाखाली जाणार नाहीत व ते पुरेसा विचार करूनच मंत्रिमंडळाच्या शिफारसी किंवा निर्णयांना संमती देतील. यासाठी अशा प्रकारच्या तरतुदी करणे आवश्यक वाटते.

९. पक्षांतराला बंदी घालणारा कायदा होणे नितांत आवश्यक आहे. आपल्या पक्षावर वा कोणत्याच पक्षावर निष्ठा नसलेल्या लोकांकडून लोकशाहीचे भले होणे अशक्य आहे. आपल्या निर्वाचितपदाचा राजिनामा न देता पक्षांतर करणे म्हणजे जनतेची सरळ फसवणूक आहे. आपले आहे ते पद कायम ठेवून पक्ष बदलण्यास बंदी हवी.

## पुढील सुधारणा व्हाव्यात

१. कायदेमंडळाच्या प्रतिष्ठेत भर टाकणारे संकेत प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे. कायदेमंडळातील कामकाज निःपक्षपाती होण्यासाठी, तसे होत आहे याविषयी सर्वांची खात्री होण्यासाठी स्पीकरपदाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. यासाठी स्पीकरपदावरील व्यक्तीने पुन्हा मंत्री किंवा राज्यपाल असे पद स्वीकारू नये. यासाठी आवश्यक असेल तर स्पीकरपदाला जास्त वेतन आणि चांगल्या पेन्शनची सोय करावी.

२. कायदेमंडळाच्या कामकाजास प्रौढता आणि प्रतिष्ठा आली पाहिजे. यासाठी आरडाओरड करणे, नियम धुडकावून गोंधळ घालणे, वारंवार सभात्याग करणे अशासारखे प्रकार निश्चितच कमी झाले पाहिजेत. हे होण्यासाठी सर्वच पक्षांनी काहीशी सामूहिक वृत्ती धारण केली पाहिजे. बाहेरचे राजकारण आणि संसदेतील सहभाग यात पक्षांनी फरक करण्याची नितांत आवश्यकता आहे. लोकशाहीवर ज्यांची निष्ठा आहे त्यांना हे करणे अवघड नाही. पक्षांच्या प्रतोदांद्वारा ही जबाबदारी पार पाडता येईल. सत्ताधारी पक्षाने विरोधी पक्षांकडे पाहताना दोन्ही बाजूंची प्रतिष्ठा वाढेल या दृष्टीने पाहिले पाहिजे. विरोधी पक्ष अल्पमतात असला तरी तोही जनतेचे प्रतिनिधित्व करीत असतो याची जाणीव हवी.

३. 'घटनादुरुस्ती' बाबत खरोखरीच गंभीर विचार होणे आवश्यक आहे. भारतीय घटनेत तीस वर्षांत ४५ घटनादुरुस्त्या झाल्या; त्यातील २५ दुरुस्त्या श्रीमती गांधींच्या कारकीर्दीत झाल्या. त्यांपैकी १७ दुरुस्त्या १९७२ ते १९७७ या पाच वर्षांत झाल्या. घटनादुरुस्त्यांचे हे प्रमाण घटनेची प्रतिष्ठा नष्ट करते. नव्या धोरणांची कार्यवाही करण्यासाठी इतक्या दुरुस्त्यांची आवश्यकता आहे ही गोष्ट विश्वास ठेवण्यास कठीण आहे. संविधान आणि संसदेतील बहुमत हे सत्ताधारी पक्षाच्या हातातील खेळणे होता कामा नये.

४. सार्वजनिक नीतिमत्तेच्या दृष्टीने अयोग्य वर्तन करणाऱ्या मंत्र्याने राजिनामा दिला पाहिजे. जाणूनबुजून गैरकृत्य करणाऱ्या मंत्र्याला राजकीय जीवनातून दूर केलेच पाहिजे. त्याबाबत सहानुभूती बाळगणे हे योग्य नाही. तसेच दीर्घकाळ राजकीय जीवन जगलेल्या व्यक्तींनी निवृत्त होऊन खाजगी जीवन जगले पाहिजे. निदान ७० वर्षांवरील व्यक्तींनी निवृत्त होण्यास काहीच हरकत नसावी. अधिकार आणि मोबदल्याच्या कोणत्याही पदांवर अशा व्यक्तींनी राहू नये.

□


५००+५ = ४००+५००

निवडक आणि दर्जेदार राजहंस प्रकाशने
आपल्या संग्रही ठेवण्यासाठी

**राजहंस ऑगस्ट '८४ योजना**

आपण ५०० रुपयांची ठेव ५ वर्षांसाठी राजहंस प्रकाशनाकडे ठेवल्यास व्याजाच्या मोबदल्यात ४०० रुपये किंमतीची राजहंस प्रकाशने आपणास मिळतील व ५ वर्षांनंतर ५०० रु. ची ठेवही परत मिळेल.

**शिवाय**

पुढील ५ वर्षांत प्रकाशित होणारी सर्व राजहंस प्रकाशने २५% सवलतीत सभासदांस मिळू शकतील. (पोस्ट खर्च सभासदांचा).

अपेक्षित सभासद नोंदणी झाल्यावर योजना बंद होईल.

**सविस्तर योजना पत्रक मागवा.**

**राजहंस प्रकाशन**
१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ४११ ०३०.
वेळः सकाळी ११ ते ५
•
वा. र. गोडे, जोशीवाडी, चितळे पथ कॉर्नर,
४१, भवानी शंकर रोड, दादर, मुंबई ४०० ०२८.
वेळः दुपारी २ ते ७

PAN ADS



शोभा भागवत

# भूमिका

मौजच्या दिवाळी अंकातला 'संगोपन : एक प्रयोग' हा अनिल अवचटांचा लेख वाचलात ? लहान मोठ्या सगळ्या मुलांच्या पालकांनी वाचावा असा हा लेख आहे. नको बुवा मुलं इतक्यात. आपल्याला मनाप्रमाणे जगता येणार नाही मग; असं म्हणणारे अवचट हळूहळू मुलींच्या पालकपणात इतके गुरफटून जातात, बदलत जातात, ते सगळं वाचणं आपल्याला खूप शिकवत जातं. मुलींना वाढवणं, संगोपन ही निमित्तं पण त्यातून हे पालक जे दिसतात, कळतात त्यांच्याशी ओळख झाल्यानं छान वाटतं, प्रसन्न वाटतं.

शेवटचा प्रसंग तर फारच गोड आहे. अवचट बाहेर निघालेले असताना मोठी मुलगी म्हणते, 'बाबा, एवढे मळके, चुरगळलेले कपडे घालून बाहेर चाललास? आधी बदल पाहू!' ती इस्त्रीचे कपडे आणून देते. तेवढ्यात धाकटी कंगवा घेऊन येते भांग पाडून देते आणि म्हणते, 'जरा विंचरत जावे केस. ताई आपला बाबा म्हणजे मतिमंदच आहे, नाही?

यावर अवचट हसतात आणि त्यांना वाटतं चला ! मुली मोठ्या झाल्या आपल्याला लहान व्हायला हरकत नाही.

हे मुलांनी आणि पालकांनी एकमेकांना इतकं जवळचं, इतकं बरोबरचं मानणं सहजपणे सापडत नाही. आई-वडील म्हणून घरात पालकांचं खास उंचावरचं स्थान असावं आणि ते टिकवावं याचा आटापिटा चालू असतो. विशेषत: बाबांचं स्थान तर आभाळातलंच असतं.

बाबा घरात आले की मुलांनी गडबड करायची नाही. बाबा बाहेर चालले असले की आई आणि मुलांनी त्यांना धावपळ करत हवं ते आणून द्यायचं. बाबा झोपलेले असले की आवाज करायचा नाही. ह्या झाल्या किरकोळ गोष्टी.

बाबाही स्वत:ची भूमिका ठोकपणे बजावत राहतात. आमच्या एका मोलकरणीनं नवरा घरात कसा वागतो ते सांगताना मोठ्या अभिमानानं सांगितलं होतं की, 'संध्याकाळी ते कामावरून येतात. डबा ठेवतात. पोरांना विचारतात. कोणी त्रास दिला असला तर त्याला मारतात आणि मग दारू प्यायला बाहेर जातात.' मुलांना वळण लावणं म्हणजे धाक दाखवणं, ओरडणं, अभ्यास कर म्हणणं, टाकून बोलणं असं अनेक पालक करत असतातच. आपण आई म्हणून आणि वडील म्हणून एक भूमिका स्वीकारलेली असते. नाटकातलं एखाद्या पात्राचं समजलेलं काम करत रहावं तसं ही भूमिका वठवण्याचं नाटक आपण करत राहतो आणि त्यालाच मुलं वाढवणं समजतो.

आपल्या मनात अनेक गोंधळ असतात. 'आईला उलट बोललास ?' आईला? जिनी जन्म दिला त्या आईला ?' असं तळमळून विचारलेलं आपण अनेकदा ऐकतो. इथे आई ह्या प्राण्याचा मानसशास्त्रीय आकार भला मोठा मोठा करून त्याचं दडपण आपण पोरांवर घालत असतो.

त्यामुळं आई वडलांना उलट बोलायचं नाही, त्यांच्यावर रागवायचं नाही, त्यांचा अपमान करायचा नाही, त्यांचं सगळं ऐकायचं ही कसरत बिचाऱ्या पोरांच्या नशिबी येते· आईवडलांनीसुद्धा स्वत:च्या लहानपणी ही कसरत केलेली असतेच की !

पण आता मोठेपणी माणसामाणसांमधल्या प्रेमाचा, नात्याचा विचार करताना काय वाढतं ? या नात्यात अटी जेवढ्या जास्त तेवढं प्रेम कमी कमी होत जातं.

नवरा-बायकोतसुद्धा तू असंच राहिलं पाहिजेस, हे करता कामा नये, असं वागता कामा नये, अमुक केलंस तर मी रागावणार तमुक केलंस तर मी रागवणार, तमुक म्हटलंस तर मी चिडणार, तू मला जपलं पाहिजेस, मी म्हणीन ते केलं पाहिजेस अशा अटी असल्या तर मोकळेपणी एकमेकांशी वागताच येत नाही. वाटलं ते म्हणून मोकळं होता येत नाही. खरी मैत्री होत नाही.

माझ्या एक ज्येष्ठ मैत्रीण आहेत. मुलांची लग्नं वगैरे झालीत. त्या परवा सांगत होत्या–

'कसले हो आमचे संसार ! लग्नाला तीस–तीस वर्षं झाली तरी आम्ही आपलं घाबरूनच रहायचं सारखं. त्यांना काय वाटेल हाच विचार करायचा. त्यात काही गंमत नाही.' ह्या बाई बोलताना कधी तरी असंही म्हणतात, 'काही काही पुरुष कसे घरात आले की अगदी चैतन्य निर्माण करतात; पण आमच्याकडे हे आले की सगळ्यांवर दडपण.'

घरचा कर्ता पुरुष ह्या कल्पनांची व्याख्याच पहिल्यापासून चुकलेली असते. अशा घरांमध्ये पुरुष 'माझं घर, माझी बायको, माझी मुलं' म्हणत असतो आणि म्हणूनच भांडण झालं की 'हो माझ्या घरातून चालती' असंही तो म्हणू शकतो. हे घर 'आपलं' नसतं. ह्या घरात मालक असतो. गुलाम असतात.

कोण शिकवतं या भूमिका आपल्याला ? नवरा म्हणून, बायको म्हणून, सून म्हणून, सासू म्हणून, जावई म्हणून, नणंद म्हणून, पालक म्हणून ? असं असं वागलं की तो चांगला नवरा-चांगला कसला ? नवरा ! असं असं वागलं म्हणजे ती सून. प्रत्येकानं विचार करून पहावा आपण या भूमिका कशा शिकलो ?

मानसशास्त्राच्या भाषेत असं जे आपल्या मनात 'असं असं वागलं पाहिजे' असं जे असतं त्याला आपलं 'स्क्रिप्ट' म्हणतात. हे स्वत:चं स्क्रिप्ट आई–वडील, नातेवाईक, शेजारी, मित्रमंडळी यातून आपण तयार करत जातो. तसं वागत राहतो. काही एका वयानंतर स्क्रिप्ट कायम तेच राहतं. बदलत नाही. सुधारत नाही. त्यावर स्वतंत्र विचार होत नाही. धोका इथे असतो.

पालक म्हणून आपलं 'स्क्रिप्ट' कोणतं ? ते आपण कुठून तयार केलंय ? त्यातलं चांगलं काय वाईट काय ? आजूबाजूला जे चांगले पालक दिसतात, ज्यांची मुलांशी मैत्री असते, मुलं ज्यांच्याशी मोकळेपणानं बोलू शकतात असे पालक कसे वागतात ? याबद्दल आपण प्रत्येकानं डोळसपणे पहायला शिकलं

पाहिजे. खऱ्या मैत्रीपायी, एकमेकांबद्दलच्या प्रेमापोटी आलेला मोकळेपणा कुठला आणि केवळ फॅशनपायी आलेला उथळ मोकळेपणा कुठला हेही ओळखायला शिकलं पाहिजे.

योगायोगानं लागोपाठ घडलेल्या दोन घटना आठवल्या. मी कॉलेजमध्ये असताना वडील बाहेरून आले की त्यांचे पाय दुखायचे, आम्ही भावंडं मोठ्या हौसेनं त्यांचे पाय चेपून द्यायचो. एकदा पाय चेपून झाल्यावर शेजारी शेजारी बसून आम्ही गप्पा मारत होतो आणि काही तरी गंमत सांगताना मी वडलांच्या मांडीवर थाप मारली. आई हे पाहून जरा रागावली.ती म्हणायला लागली, 'शोभतं का हे वागणं? एवढ्या मोठ्या मुलीनं वडलांच्या मांडीवर थाप मारणं?' आईचं तिच्या दृष्टीनं काही चूक नव्हतं. तिच्या स्क्रिप्टमध्ये वडलांचे पाय चेपणं बसत होतं; पण माझ्या स्क्रिप्टमध्ये पाय चेपणंही प्रेमापोटी होतं आणि थाप मारणंही प्रेमापोटीच होतं.

पालक म्हणून आपल्या मुलांनी आपल्याशी कसं वागावं याच्या तुमच्या कल्पना काय आहेत? त्यात आपलं 'मी' पण किती असतं? असा विचार करायला लागलं की लक्षात येईल की अवखटांच्या मुली त्यांना 'मतिमंद' म्हणू शकतात याचा अर्थ काय? शेवटी आपापले अर्थ आपणच लावतो आणि त्यातले अनर्थही आपणच निर्माण करतो नाही का? □

चित्रपट

## मुंबईचा फौजदार :


# चटपटीत, विनोदी

मुंबई शहराचं वर्णन 'मुंबई नगरी बडी बाँका' असं केलं जातं. साहजिकच मुंबई-पासून कोसो मैल दूर राहणाऱ्या खेड्यातील माणसाला मुंबई शहराचं अजूनही अप्रूप वाटत आलंय; पण जिवाची मुंबई करण्या-साठी बाहेरगावचा माणूस जेव्हा मुंबईत दाखल होतो, तेव्हा मात्र या शहराच्या जनजीवनाशी जवळीक साधताना त्याची चांगलीच त्रेधातिरपीट उडते. कुणाला इथल्या सिमेंटकाँक्रीटच्या जगात घुसमटायला लागतं तर कुणाला इथल्या धकाधकीच्या आयुष्यात माणसाचं यंत्र झाल्यासारखं वाटतं. कुणी इथल्या धामाच्या धारांनी उबून जातो, तर कुणी इथल्या उलटसुलट दिशांनी धरंगळ-णाऱ्या प्रचंड जनसमुदायाच्या दर्शनानं भांबा-वून जातो. असं असलं तरीही मुंबईविषयीचं सुप्त आकर्षण काही कमी होत नाही आणि नव्या नव्या आकर्षणांची रंगीत भूल घेऊन हा माणूस मुंबईकडे ओढला जातो आहे. यातूनच निर्माण होणाऱ्या गंमतीजमतींनी फिल्मवाल्यांना मात्र चिक्कार विषय पुरवले आहेत. आपापल्या कल्पनाशक्तीनुसार कित्येक निर्माता–दिग्दर्शकांनी हाच विषय नवी नवी आवरणं चढवत प्रेक्षकांच्यासमोर पुन्हा पुन्हा मांडला आहे आणि सदा सतेज अशा विषया-वरचे चित्रपट प्रेक्षकांनीही तितक्याच आव-डीनं पाहिले आहेत. पुण्यात दाखल झालेला 'मुंबईचा फौजदार' हाही याच पठडीतला; पण खूपशी वेगळी पार्श्वभूमी घेऊन आलेला आणि म्हणूनच वेगळा भासणारा.

मराठी चित्रपटाचं अर्थकारण लक्षात घेता मराठी चित्रपटाला तमाशाशिवाय पर्याय नाही अशी ओरड मराठी चित्रपट व्याव-सायिकांकडून नेहेमीच ऐकावयास मिळते. साहजिकच मराठी चित्रपट तमाशापटांची चाकोरी सोडून बाहेर डोकावण्याचं धाडस करत नाहीत. कारण हे भलतं धाडस अंगाशी येण्याची शक्यता जास्त. त्यामुळं बहुतेकजण तापल्या तव्यावर पोळी भाजून घेणंच पसंत करतात. यातून उरलेले कौटुंबिक चित्रपटांची निर्मिती करून हुकमी प्रेक्षकवर्ग मिळवण्याच्या मागं लागलेले. त्यातूनच तमाशापट काय किंवा कौटुंबिक चित्रपट काय–दोन्हींची चौकट ठरून गेलीय. आणि त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टी नव्या नव्या चांगल्या विषयां-पासून, प्रयोगांपासून वंचितच राहिलीय. विशेषत: मराठी साहित्यावरून निर्माण होणारे हिंदी चित्रपट किंवा मराठी रंगभूमी-वर नव्या नव्या कल्पनांना, प्रयोगांना मिळ-णारं प्रोत्साहन या पार्श्वभूमीवर तर ही गोष्ट चांगलीच खटकते. त्यामुळेच एखाद्या मराठी चित्रपटानं केलेला वेगळ्या वाट-चालीचा प्रयत्नही आवर्जून नोंद घेण्याइतपत महत्त्वाचा ठरतो. 'हळदीकुंकू'सारखा हीट चित्रपट दिलेल्या मनोहर रणदिवे यांचा 'मुंबईचा फौजदार' हा चित्रपट पहिल्या चित्रपटाच्या चेहेऱ्यामोहऱ्यापेक्षा खूपच निराळा. गेली ३०–३५ वर्षं चित्रपटव्यव-सायाशी संबंधित असलेले मनोहर रणदिवे या बाबतीतली आपली भूमिका स्पष्ट कर-ताना म्हणाले, 'खरं म्हणजे 'मुंबईचा फौजदार'च्या आधी अनिल बर्वे यांच्याच 'हमीदाबाईची कोठी' वरून चित्रपट काढा-यचा वाटत होतं; पण एक तर त्याच्यावर नाटक आधीच येऊन गेलय. दुसरं म्हणजे त्यातलं वातावरण आपल्याकडचं नाही. पुन्हा आपण तमाशाकडेच जाऊ का असं वाटत होतं. त्यावर उलटसुलट विचारात असता-नाच अनिल बर्वे यांची 'मुंबईचा फौजदार' याच नावावर प्रसिद्ध झालेली गोष्ट वाचनात आली आणि त्यावरच चित्रपट काढायचं ठरवलं. या गोष्टीवरचा चित्रपट लोकांना आवडेल असा आत्मविश्वास पहिल्यापासूनच होता. कारण या कथेचं तेवढं पोटेन्शियल आहे. तसंच प्रेक्षकांना आपण दाखवू ते प्रेक्षक पाहतात. फक्त आपण ते कसं दाखवतोय हे महत्त्वाचं. यासाठी प्रेक्षकांची नाडी अचूक सापडायला हवी. एकदा या दोन्हींचा मेळ नीट बसला की चित्रपट यशस्वी होतोच. यातूनच प्रेक्षकांची अभिरुचीही घडत असते.'

मुंबईच्या जीवनाशी समरस होईल अशा एखाद्या चटपटीत मुलीशी लग्न करण्याची इच्छा असलेले फौजदार मोहिते (रवींद्र महाजनी) आणि रहस्यकथांच्या विलक्षण नादानं फौजदाराशीच आणि तेही मुंबईच्याच लग्न करण्याची स्वप्नं पाहणारी खेडवळ शकू (रंजना) हे 'मुंबईच्या फौजदार'चे दोन प्रमुख शिलेदार. मुलाखत घेण्यासाठी आलेल्या एका मासिकाच्या सहसंपादिकेकडे माधुरी (प्रिया तेंडुलकर) फौजदारसाहेब जीव गहाण ठेवतात आणि भावी संसाराची स्वप्नं रंग-वायला लागतात; पण वडिलांच्या इच्छेपुढे या वाघाची अगदी शेळी होते आणि चट-पटीत माधुरीऐवजी शकूची धोंड फौजदार-

साहेबांच्या गळयात येऊन पडते. शकूला मनासारखा नवरा मिळतो. (म्हणून ती सात जन्मांचं अॅडव्हान्स बुकिंग आधीच करून टाकते.) पण फौजदारसाहेबांना मात्र या अशिक्षित, गावंढळ, खेडवळ, मॅनरलेस... वगैरे वगैरे शकूचा अति राग येतो. आता अशी शकू मुंबईच्या मोठ्या जगात आल्यावर जे जे व्हायला हवं तेच होतं. शकूला सुधारता सुधारता फौजदारसाहेबांच्या नाकी नऊ येतात आणि एक दिवस रागाच्या भरात ते शकूला माहेरी हाकलून देतात. शकू माहेरी न जाता सासऱ्याकडे गावी जाते. सासरा-सून मिळून कट रचतात आणि 'मुंबईच्या फौजदारा'ला वठणीवर आणतात.



हलकेफुलके प्रसंग, प्रसंगनिष्ठ विनोद भरपूर !

## अभिनयाचं वैशिष्टच

अशी ही सरळ साधी कथा तितक्याच सरळसाधेपणानं घेतलेली. मध्यंतरी निखळ, निर्व्याज विनोदाचंही मराठी चित्रपटसृष्टीतून उच्चाटन झालं होतं. कमरेखालचा अश्लील किंवा द्वयर्थी शब्दनिष्ठ विनोद या निर्व्याज विनोदाची जागा घेऊ पाहात होता; पण अलीकडच्या काळात आलेल्या 'एक डाव भुताचा, 'गोंधळात गोंधळ' सारख्या चित्रपटांनी या निखळ विनोदाची पुन्हा एकदा रुजुवात करून दिली आणि या चित्रपटांना मिळालेल्या यशानं या जातकुळीवर शिक्कामोर्तब केलं. 'मुंबईचा फौजदार' हा याच जातकुळीतला. चित्रपट 'मसालेदार' व्हावा अशा धोक्याच्या जागा चित्रपटात अनेक ठिकाणी आहेत; पण हा सवंग मोह टाळण्यात निर्मात्याबरोबरच लेखक वसंत सबनीस आणि दिग्दर्शक राजदत्त यशस्वी झाले आहेत, वसंत सबनिसांचा तर प्रश्नच नाही. या प्रकारच्या चित्रपटांसाठी त्यांचा हातखंडा आहेच. त्यामुळे पटकथा वसंत सबनिसांची आहे, एवढ्या उल्लेखावरूनही सुज्ञ प्रेक्षक चित्रपटाची जात ओळखू शकेल; पण श्रेयनामावलीतील राजदत्त या नावानं मात्र लक्ष वेधून घेतलं होतं. कारण राजदत्त यांची आतापर्यंतची प्रतिमा तरी गंभीर प्रकृतीची; पण हलक्याफुलक्या भूमिकेतूनही राजदत्त यांची योग्य ती छाप पडते. या प्रकारच्या चित्रपटांसाठी आवश्यक अशी गती या चित्रपटाला असून चित्रपट कंटाळवाणा होत नसला तरी तरलतेच्या बाबतीत मात्र हा चित्रपट कमी पडतो. हलकेफुलके प्रसंग यात आहेत, त्यामुळे प्रसंगनिष्ठ विनोद उत्तम साधतो; पण सहजी, जाता जाता केलेला मिष्किलपणा कमीच. विनोदी चित्रपटात तर्कशक्तीसंधी कमी असते किंबहुना नसतेच. हे मान्य केलं तरी या प्रकारचे निखळ, नर्म विनोदी चित्रपट तर्कसुसंगत करता येऊ शकतात हेही अमान्य करून चालणार नाही. 'मुंबईचा फौजदार' मध्येही हे करता येणं शक्य होतं; पण ते झालेलं नाहीय, त्यामुळे हा चित्रपट खूपसा काल्पनिक पातळीवरच राहतो. अर्थात यात गैर काहीच नाही; पण तो जर याहून अधिक वास्तव पातळीवर आला असता तर प्रेक्षकांना अधिक जवळचा वाटला असता. तेव्हा या दृष्टिकोनातून निर्माता रणदिवे यांच्या कल्पनेबरहुकूम चित्रपट तयार झाला आहे का हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, 'चित्रपट अगदी मला हवा तसाच तयार झाला आहे. निर्माता आणि दिग्दर्शक यांच्या मतात फरक पडण्याचा प्रश्नच नव्हता. कारण आम्ही सगळे एकत्र बसून सतत चर्चा करत होतो. आपल्याला काय करायचंय, प्रेक्षकांसमोर काय मांडायचंय याची स्पष्ट कल्पना प्रत्येकाला होती. स्क्रिप्टही तीनदा लिहिल्यानंतर फायनल झालं. नुसते नऊ महिने आम्ही पूर्वतयारीवर घालवलेत. त्याचे रिझल्टस् अर्थातच चांगले मिळालेत. त्या बळावरच आम्ही अवघ्या एकवीस दिवसांत ठरलेल्या बजेटात चित्रपट पूर्ण करू शकलो. कुठल्याही चित्रपटासाठी योग्य प्लॅनिंग महत्त्वाचं असतं. ते झालं की, चित्रपट तयार करण्यात फारशा अडचणी येत नाहीत. त्यामुळेच चित्रपटातील प्रत्येकाच्याच कामगिरीबद्दल मी पूर्ण समाधानी आहे.'

कुठल्याही चित्रपटाची मदार पडद्यामागील कलाकारांइतकीच पडद्यावरील कलाकारांवर अवलंबून असते. यात कुठलीही एक बाजू लंगडी पडली की, चित्रपटाचा तोल बिघडतो; पण 'मुंबईचा फौजदार' मध्ये पडद्यामागील जबाबदारी वसंत सबनीस–राजदत्त वगैरे कंपनीनं जितकी समर्थपणे सांभाळली आहे, तितकीच समर्थपणे पडद्यावर सांभाळली आहे रंजना, रवींद्र महाजनी या चित्रपटसृष्टीतल्या चलनी नाण्यांनी. या दोघांनीही आपल्या अभिनयकौशल्याची पावती वेळोवेळी दिलीच आहे. तशी ती या चित्रपटातही मिळते. वाढत्या वयाच्या खुणा मात्र घात करतात. एक वेळ फौजदाराच्या व्यक्तिरेखेत हे खपून जातं; पण शकूच्या बाबतीत नाही. खेडवळ शकू ही खेडवळ–गावंढळ न वाटता शहरी खेडवळ वाटते. तिच्या वेशभूषा–केशभूषेतला आधुनिकपणा खटकतो. हाच दोष नंतर लेडी कॉन्स्टेबल झालेल्या शकूसाठी केलेल्या केशभूषेतही जाणवतो; पण या सगळ्या प्रति-

कूल परिस्थितीवर रंजना आपल्या अभिनयाच्या बळावर कशी मात करते, ते मात्र बघण्याजोगं. शकूचा तोंडाळपणा, भाबडेपणा दाखवण्यात ती कुठेही कमी पडत नाही. या दोघांबरोबरच प्रिया तेंडुलकर, शरद तळवलकर, बाळासाहेब सरपोतदार, राघवेंद्र कडकोळ वगैरे मंडळी यशस्वी हजेरी लावून जातात.

याशिवाय मुद्दाम उल्लेख करावा लागेल तो विश्वनाथ मोरे यांच्या संगीताचा आणि ईशान आर्य यांच्या छायाचित्रणाचा. चित्रपटात चार गाणी—वेगवेगळ्या मूडस्ची. हे वेगवेगळे मूड या गाण्यांतून चांगले व्यक्त होतात. विशेषतः 'हा सागरी किनारा' हे गाणं.

या चित्रपटाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे यात स्टुडिओ शूटिंग नाहीच. बाह्यचित्रणासाठी निवडलेली लोकेशन्स चांगली असली तरी समुद्राची पार्श्वभूमी जास्त वेळा वापरली गेली आहे आणि त्यामुळे येणारा तोच तोचपणा टाळता आलेला नाही. तथापि ईशान आर्य यांचं छायाचित्रण मात्र डोळ्यांना सुखावह होणारं.

पडद्यावरील कलाकारांची ओळख प्रेक्षकांना होत असतेच. गरज असते ती पडद्यामागील कलाकारांची ओळख करून देण्याची. या दृष्टिकोनातून सुरुवातीला दाखवल्या जाणाऱ्या श्रेयनामावलीत प्रत्येकाच्या नावामागं फोटो देण्याची कल्पना अभिनव आणि स्तुत्यही; पण बाकी सगळ्या महत्त्वाच्या व्यक्तींचे फोटो असूनही कथालेखक अनिल बर्वे आणि गीतकार जगदीश खेबूडकर यांचा फोटो का नव्हता याचं कारण मात्र कळू शकलं नाही.

—शुभदा रानडे

# रंगभूमी

## सर्वांगी सुंदर - नाट्यसमीक्षक मेळावा

१९८४ डिसेंबरचा पहिला दिवस. शनिवार, वेळ सकाळी नऊ-साडेनऊची. टिळक स्मारक मंदिराच्या, प्रेक्षागृहाच्या प्रमुख द्वारावर 'ॲक्टिव्ह थिएटर्स आयोजित मराठी नाट्यसमीक्षक मेळावा' असा मोठा मखमली फलक झळकतो आहे. बाजूंनी फुलांच्या माळा लोंबताहेत. टि. स्मा. मंदिराचा परिसर चौघडा-सनईच्या सुगंधी सुरांनी भरून गेला आहे. रसिक, निमंत्रित, समीक्षक, वार्ताहर गटागटाने गुलाबी नव्हे बोचऱ्या थंडीत, ऊन अंगावर यावे ( बाजू अंगावर यावी असे नव्हे ) असे गप्पा मारीत उभे आहेत. यजमानांचे ( ॲक्टिव्ह थिएटर्सचे ) कुटुंबीय पाहुण्यांच्या आगत-स्वागताला सिद्ध आहेत. तरुण मंडळी ( स्वयंसेवक ) काही ना काहीं कामासाठी इकडून तिकडे ये-जा करीत आहेत तोच आतून ध्वनिक्षेपकावरची ललकारी-आवाहन घुमते.'सुस्वागतम्.बाहेर उभ्या असलेल्या सर्व मित्रांनी त्वरित आता प्रेक्षागृहात यावे. कार्यक्रमास सुरुवात होत आहे.'

मंडळी हळूहळू आत जातात. कार्यक्रमोत्सुक मंडळी आपल्या चपला, पायऱ्यांवर काढून मागे वळून न पहाता पुढे जातात. काही जागरूक मंडळी आपल्या पादुका ( प्लॅस्टिक वा कापडी पिशवीत घालून ) आपल्याच हातात मिरवीत मोक्याच्या जागेचा शोध घेत आत प्रवेशतात. प्रेक्षागृहात व्यासपीठासमोर निमंत्रितांना बसण्यासाठी, गाद्यांवर पांढऱ्या स्वच्छ चादरींची बिछायत आहे. लोकमान्यांच्या पुतळ्यासमोर बसलेली ही मंडळी पाहून, लोकमान्यांच्या सदरेवर आपले काही सांगणे किंवा मागणे मागायला जमली आहेत असेच क्षणभर वाटले. सनईवाल्यांना 'हो' ची सूचना दिली गेली. सूर मंदावले. प्रमुख पाहुणेमंडळी व्यासपीठाजवळच्या दरवाज्यातून आत येऊ लागली. माधव मनोहर ( अध्यक्ष ) विजया मेहता ( उद्घाटक ) विजय तेंडुलकर ( प्रमुख पाहुणे ) त्यांच्या समवेत विष्णु लोखंडे ( 'ॲक्टिव्ह' चे अध्यक्ष ) नि मेळाव्याचे कार्याध्यक्ष डॉ. वि. भा. देशपांडे होते. तसेच इतर मान्यवर मंडळी होती.

माधव मनोहरांनी लोकमान्यांच्या पुतळ्याला हार घातल्यावर ही मंडळी व्यासपीठावर स्थानापन्न झाली. मग विजयाबाईंनी दीप प्रज्वलित करून (खूप मोठी सुंदर समई) मेळाव्याचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले.

खासदार यशवंतराव चव्हाण नि पंतप्रधान इंदिराजी यांच्या स्मृतींना अभिवादन करून समारंभाला सुरुवात झाली. 'सौख्यसुधा वितरो सदानव..' या देवलांच्या नांदीचे सूर उमटले नि वातावरण भारून गेले. ॲक्टिव्हचे अध्यक्ष विष्णु लोखंडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आपली संस्था विजय तेंडुलकरांच्या 'अशी पाखरे येती' या नाटकाने स्थिर झाल्याचे आवर्जून सांगितले. त्यानंतर डॉ. वि. भा. देशपांडे यांनी खुसखुशीत शब्दात मेळाव्याची भूमिका स्पष्ट केली. एकत्र यावे—बोलावे नि त्यातून काय निष्पन्न होते ते तपासून पुढची पावले उचलावी इतकीच प्रामाणिक अपेक्षा आहे.

आपल्या उद्घटनाच्या भाषणात विजयाबाई म्हणाल्या, उत्तम नटालाही आपल्याबद्दल वृत्तपत्रात काय आले आहे, हे पहाण्याची इच्छा असतेच; पण आजची समीक्षा सकस नाही. समीक्षकांना प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. समीक्षक हा रंगभूमीच्या सर्व प्रक्रियांच्या मुशीतून तयार व्हायला हवा. परदेशात किमान पाच—सात वर्षं सर्वांगी शिक्षण झाल्यावरच समीक्षक होतो. समीक्षक, दिग्दर्शक नि कलावंत यांच्या आपल्या संकल्पना नि भूमिकेत बदल घडवून आणू शकतो. त्यांनी आपण सादर केलेल्या हयवदन नाटकाचे उदाहरण दिले. तसेच केनेथ टायनन ( KENETH TYNAN ) या समर्थ समीक्षकाचा दाखला दिला.

## तेंडुलकर–मनोहर

त्यानंतर विख्यात नाटककार विजय तेंडुलकर बोलायला उभे राहिले. विजयाबाईंचा धागा घेऊन त्यांनी केनेथ टायननचे कौतुक केले; पण लगेच परदेशी प्रदीर्घ कालावधीच्या समीक्षकशिक्षणाचा उल्लेख करून म्हणाले, हे परदेशी सौंदर्य आपल्याला उपयोगी नाही. ते परवडणारेही समीक्षक हा लेखकावर जगणारा लेखक आहे. सहाजिकच त्याचे स्थान दुय्यम आहे, ज्यांच्याजवळ सर्जनशीलता ( CREATIVITY ) नाही तो समीक्षेकडे वळतो. नाट्यसमीक्षा अशी त्यांनी बोचक शब्दात व्यक्त केली. प्राध्यापकी जडजंजाळ समीक्षा, हौशी भरपूर वेळ असलेल्या मंडळीची सौंदर्यहीन समीक्षा वृत्तपत्रीय नाटकाची गोष्ट सांगणारी, साहित्यमल्य नसलेली समीक्षा. त्यात भाषेचे सौंदर्य नसते. समीक्षा हा साहित्याचा एक प्रकार झाला पाहिजे. चांगला समीक्षक जिथे पोचायचा तेथे पोचू शकतो. केनेथ टायननच्या पानी दीड पानी सकस नि सौंदर्यपूर्ण समीक्षेचे कौतुक करून, समीक्षकांनी आत्मपरीक्षण करावे असा संदेश दिला.

मग मेळाव्याचे अध्यक्ष माधव मनोहर बोलले. मी समीक्षेसंबंधी काहीही बोलणार नाही, असे विनम्रपणे सांगून नाट्यविषयक अनेक अंगांची चर्चा केली. आपल्या छापील भाषणातला काही भाग वाचून दाखवला.प्रायोगिक नि व्यावसायिक नाटकांची सीमारेषा–तिचे पुसटपण–नवीन नाटकांचा व्यावसायिकांनी शोध घ्यायला हवा. जुन्या गाजलेल्या नाटकांचे प्रयोग का करू नये ? हॉट नाटके ही अटळ वस्तुस्थिती आहे. आजचा नाट्यव्यवसाय हा रंगभूमीचं भले करणारा नसून वाटमारी झाला आहे. त्यांचे सर्वच आपण नाट्यविषयक प्रश्नांना गती देणारे आहे. तरी पण त्यांच्याविषयी नितांत आदर बाळगून म्हणावेसे वाटते, त्याची ही भूमिका नाट्यसमीक्षकांच्याच मेळाव्यात समीक्षकांच्या शिडातली हवा काढून घेणारी ठरली. विगर समीक्षकांना वाजी मारण्यास पोषक ठरली. पुढच्या इतर सत्रात बोलताना समीक्षकांची न्याय्य बाजू योग्य शब्दात मांडली. सकाळचा जाहीर समारंभ संपला.

¤

दुपारच्या चर्चेचा विषय होता, 'नाट्यसमीक्षकांकडून रंगभूमीच्या अपेक्षा' अध्यक्ष होते दामू केंकरे. सहभाग होता–नटवर्य मामा पेंडसे, कमलाकर सारंग, प्रा. लक्ष्मण देशपांडे भि. सि. शिंदे, सतीश आळेकर.



रंगलेल्या चर्चा – विजया मेहता, व. दि. कुलकर्णी, नाना पाटेकर, जब्बार पटेल, कमलाकर सोनटक्के

¤

दामू केंकरे यांनी आपल्या घरेलु भाषेत सुरुवातीलाच सांगितले. की, समीक्षक हा रंगभूमीचाच एक घटक आहे. तो फक्त दीपरेषेपलीकडे ( Foot Llght ) असतो म्हणून वेगळा वाटतो. एकमेकांच्या विचारांच्या आदान-प्रदानावरच रंगभूमीची यशस्वी वाटचाल होत असते. नटवर्य मामा पेंडसे म्हणाले, पूर्वी नाटकमंडळींच्या मालकांना खूष करणारे लिखाण हवे असे. त्यानंतर कमलाकर सारंग यांनी आपले विचार मांडले.

आज लिहितात ते रिपोर्टिंग आहे. फारच थोडे खरे समीक्षक आहेत. त्यांनी उगाचच टीका करू नये. खोटी स्तुतीही करू नये. समतोल परीक्षण हवे.

प्रा. लक्ष्मण देशपांडे : नाटक ही संमिश्रण ( Composite Art ) आहे. संमिश्रणातून एकता साधायला हवी. लेखकाचे शब्द, नटाचा अभिनय-संगीत नेपथ्य याचे त्या नाट्यवस्तूच्या संदर्भात समग्र विश्लेषण म्हणजे समीक्षा.

भि. शि. शिंदे : दलित रंगभूमी हा व्यवसाय नाही. ती चळवळ आहे. दलित रंगभूमीच्या दिशा समीक्षकांना माहीत नाहीत. दलित जीवनमूल्यांची दखल समीक्षक घेत नाहीत. दलित रंगभूमीचा समीक्षक तयार करायला हवा.

सतीश आळेकर : माझे नाटक मी स्वच्छ विचाराअंती मांडतो. माझी भूमिका निश्चित असते. नाटक–प्रेक्षक नाते सनातन आहे. आमची रंगभूमी लोकाश्रयी आहे. परदेशी रंगभूमी सरकार नि उद्योजकांवर जगते. समीक्षेने नव्या नाटकांना प्रोत्साहन मिळते.

दामू केंकरे यांनी समारोपात सांगितले, सुरुवातीच्या काळात टीका वा स्तुति न होणे हे फार बरे. नट नि समीक्षक यांनी सतत आत्मपरीक्षण करावे. इथे हे सत्र संपले.

¤

संध्याकाळी साडेसहा वाजता जाहीर परिसंवाद नि मान्यवरांच्या सत्कारसमारंभासाठी मंडळी स्थानापन्न झाली. प्रथम मेळाव्याचे अध्यक्ष माधव मनोहर यांच्या हस्ते शाल–श्रीफळ–पुष्पगुच्छ नि स्मृतिचिन्ह भेट देऊन मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. त्यात श्री. वसंत शांताराम देसाई, ज्योत्स्नाबाई भोळे, विजय तेंडुलकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी, मामा पेंडसे, जब्बार पटेल, कमलाकर सोनटक्के, जयराम शिलेदार, प्रभाकर पणशीकर, नाना पाटेकर, प्रेक्षकप्रतिनिधी सुधाताई मांडके, नामदेव मुळीक अशी कलाक्षेत्रातली गुणविशेषमंडित मंडळी होती. माधव मनोहरांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष विष्णु लोखंडे यांच्या हस्ते संपन्न झाला. सर्वांचा सत्कार मोठ्या भावपूर्ण वातावरणात पार पडला.

परिसंवादाचा विषय होता– 'नाट्यसमीक्षा प्रेक्षकांची अभिरुची घडवते का ?

अध्यक्षस्थानी होते– कमलाकर सोनटक्के. पहिले वक्ते होते– माधव मनोहर. चिपळूणकर समीक्षकांना 'चोखे' म्हणजे राजाचे सर्व पदार्थ चोखून ( तपासून ) पहाणारे, त्यात विष वगैरे काही नाही ना हे पहाणारे चोखे असत. इथे प्रेक्षक राजा, नि समीक्षक चोखा अशी उपमा आहे. समीक्षक हा नाटक नि प्रेक्षक यामधला दुवा. परंपरागत प्रेक्षक नव्हे. पाहताना बावचळतात. त्यांना खेळाचे मर्म समजावून देतो तो समीक्षक.

विजया मेहता : सकाळच्या उद्घाटनाच्याच भाषणातला आधार देऊन म्हणाल्या समीक्षकाला प्रशिक्षण हवेच. नाटक कथानक प्रधान नको, तरलस्तरांचे हवे. माधवराव ( माधव मनोहर ) लिहितात ते आम्ही जरूर वाचतो.

प्रभाकर पणशीकर : या मेळाव्यात शत्रूच्या शिबिरात एक रात्र असेच आपल्याला वाटत असल्याचे सांगून, त्यांनी सवाल टाकला की, कोण आहे तुमच्यात समीक्षक ? ( माधव मनोहर सोडून ) वर्तमानपत्रातले आठवड्याचे भविष्य नि नाटकांचे समीक्षण सारखेच. नाटकांच्या भरगच्च जाहिराती मिळतात म्हणून नाटकांची परीक्षणे छापतात. हे नाटक पडले, ते कोसळले असे शेरे मारण्यात काय मौज आहे ?

हे क्षणभर उठलेले वादळ प्रा. व. दि. कुलकर्णी यांनी आपल्या भारदस्त भाषणाने शांत केले. ते म्हणाले, समीक्षक नाटकाचा खेळ सर्वांगी पाहूनच लिहितो. प्रेक्षकात अभिरुचि निर्माण करतो. 'एक शून्य बाजीराव' नाटक आधी चालले नाही. त्यावर समीक्षणे आल्यावर, विफलतेतून सफलतेकडे जाणारे नाटक ठरले. आठ वर्षांपूर्वी ही समीक्षा होती. 'भरतशास्त्र' मासिकाचा समीक्षक शत्रू नाही मित्र आहे.

समीक्षकांचे पारडे जड व्हावे असा सवाल जब्बार पटेल यांनी केला. भरभरून लिहावे असे दिग्दर्शक काही करतात का ? सुजाण प्रेक्षक म्हणजे समीक्षक. तो नाटकाचे ॲनलेसिस करतो. नाटक हा ऊब देणारा जिवंत कलाप्रकार आहे. नाटकाची नाडी ओळखून प्रेक्षकांपर्यंत पोचवा.

नाना पाटेकर विनयाने म्हणाले, 'आमच्या चुका दाखवा. आम्ही त्या अवश्य सुधारू. थिएटरमध्ये हजार प्रेक्षक हेच समीक्षक. प्रा. कमलाकर सोनटक्के [यांनी प्रत्येक वक्त्याचे भाषण संपताच यथोचित भाष्य करून परिसंवादाची सांगता केली.

¤

रविवार दिनांक दोन डिसेंबरला, सकाळी खास समीक्षकांसाठी दोन अभ्याससत्रे आयोजिली होती–

'नाट्यसमीक्षा तंत्र आणि मंत्र' पुष्पा भावे यांचे निबंधवाचन. प्रश्नकर्ते प्रा. माधव वझे. अध्यक्ष व. दि. कुलकर्णी

दुसरे होते–

नाट्यसमीक्षा – देशी आणि परदेशी

श्री. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचे निबंधवाचन. प्रश्नकर्ते कमलाकर नाडकर्णी. अध्यक्ष कमलाकर सोनटक्के.

दोन्हीही वक्त्यांनी आपल्या आशयघन निबंधाचा काही भाग वाचून दाखविला. काही ठिकाणी उदाहरणेही दिली. आपले मुद्दे अधिक स्पष्ट केले. विषयाचे संशोधन नि अभ्यासाची दिशा दाखविली. प्रश्न विचारले गेले; पण मतभेद होण्यासारखे काहीच नव्हते. जिथे अधिक स्पष्टीकरण हवे, ते केले गेले. चर्चा होऊन अध्यक्षांनी समयोचित समारोप केला; पण निबंधाचे दोन्ही विषय अत्यंत महत्त्वाचे असल्याने त्याच्या टंकलिखित प्रति समीक्षक प्रतिनिधींना देण्यात आल्या. हे विचारधन अभ्यसनीय नि संदर्भ म्हणून संग्राह्य असल्याचे अनेक समीक्षकांनी आवर्जून सांगितले.

सकाळचे अभ्याससत्र इथे संपले.

¤

दुपारचे नि मेळाव्याचे अखेरचे चर्चासत्र होते 'वृत्तपत्रीय धोरण आणि नाट्यसमीक्षा' अध्यक्षस्थानी होते माधव मनोहर. वक्ते ग. वा. बेहेरे ( सोबत ) आत्माराम सावंत (मुंबई सकाळ) एस. डी. वाघ (महाराष्ट्र हेरॉल्ड) वा. य. गाडगीळ (समीक्षक)

सोबतकार बोलायला उठले नि म्हणाले, आपल्यात चार–साडेचार अधिकारी समीक्षक आहेत. बाकी सारे लेखक. दैनिकात संपादकांच्या सूचनांचे समीक्षकावर दडपण येते. साप्ताहिकात ते नसते. जाहिराती नसतात. समीक्षकाला साहित्याची किमान जाण हवी. समीक्षणाने नाटक कठीण होता कामा नये. समीक्षकाला नाटक एन्जॉय (enjoy) करता आले पाहिजे.

आत्माराम सावंत – समीक्षकाला संपादकाचे तसं काहीच बंधन नसते; पण जागेचे नि वेळाचे बंधन आहेच. त्याने मजकूर वेळेवर दिला पाहिजे. जागेत बसविला पाहिजे. प्रसंगी मागेपुढेही चालते. साप्ताहिकातले परीक्षण मोठे म्हणून चांगले असे नाही. सुजाण प्रेक्षकांना आवडते ते सामान्यांना आवडते. बाळ कोल्हटकरांच्या नाटकावर परीक्षणे प्रतिकूल येतात; पण त्याचे प्रयोग शेकड्यांनी–हजारोंनी होतात. मोठा नाटककार, मोठा नट, यांच्या नावांचे अकारण दडपण येते.

एस. डी. वाघ म्हणाले, वृत्तपत्र सर्वसमावेशक असते. त्यात नाट्यसमीक्षणाला स्थान आहेच. नाटकाच्या सर्वांगांचा अभ्यास असलेला माणूस हवा. नाही तर हा कॉलम बंद ठेवावा.

शेवटचे वक्ते म्हणून वा. य. गाडगीळ आले. आपल्या मुरब्बी अनुभवाचे अनेक किस्से त्यांनी ऐकविले. समीक्षक हा थँकलेस जॉब आहे. तो कुणालाच नको असतो. आज जणू बुकलायलाच आम्हाला इथे आणलं आहे ! आमचा उल्लेख 'खाटिकमंडळी' असा होतो. समीक्षकांची अवस्था त्रिशंकूसारखी असते. ना कलाकारांना प्रेम, ना संपादकांना, ना निर्मात्याला ! थिएटरवर गेलो की, कानांवर शब्द पडतात– आले फुकटे ! खरं म्हणजे समीक्षक कलावंताला न्याय देण्याच्या हेतूनेच लिहीत असतो. ज्याचा त्याचा वकूब वेगळा इतकेच !

हे सत्र संपल्यावर समारोपाकडे पावले पडू लागली.

¤

प्रा. भालबा केळकर यांच्या हस्ते समीक्षकांचा सत्कार झाला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या साठ–सत्तर प्रतिनिधींपैकी काहींनी आपले मनोगत व्यक्त केले. सगळ्यांचा सूर एकच होता. आम्हाला हा मेळावा खूप काही देऊन गेला. मार्गदर्शक ठरला. संयोजकांचे-ॲक्टिव्ह थिएटर्सचे आम्ही मनोमनी आभारी आहोत. भोजन–निवासाची सोय उत्तम होतीच; पण त्यात आतिथ्याचा आगळा ओलावा होता.

मांडवपरतन :

अध्यक्षांनी भावपूर्ण शब्दांत मेळाव्याची सांगता केली. घरी परतताना प्रतिनिधी 'पुन्हा

भेटू या' म्हणत एकमेकांचे निरोप घेत होते. यजमान (अॅक्टिव्ह थिएटर्स) मंडळी दोन दिवसांच्या कामाच्या गडबडीने थकलेली दिसत होती; पण त्यांच्या चेहऱ्यांवर समाधान ओसंडत होते. आपल्या अपेक्षेपेक्षा सोहळा सुरेख पार पडला. या मेळाव्याचे फार मोठे यश म्हणजे महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक कार्यविभागाचे मंत्री माननीय सुशीलकुमार शिंदे नि संपादक कमलाकर सोनटक्के यांनी या उपक्रमाबद्दल संस्थेला वीस हजार रुपयांचे उत्स्फूर्त अनुदान दिले. कार्यकारी मंडळी त्याबद्दल कृतज्ञता नि कौतुक व्यक्त करीत होती.

'गोपाळकाला गोड झाला। आमचा विठोबा घरी आला' यासारख्या साजऱ्या समाधानात सर्वांगी सुंदर समीक्षक मेळाव्याची सांगता झाली.

—गो. रा. जोशी

## मेळाव्यातील उणे अधिक

**वि. भा. देशपांडे**

पुण्यात (१ आणि २ डिसेंबर रोजी) झालेल्या नाट्यसमीक्षक मेळाव्यात रंगभूमीवरील नट, नाटककार, दिग्दर्शक आदी मंडळी समीक्षकांवर, समीक्षेवर घणाघाती आघात करणार हे अपेक्षितच होते. तसेच काही प्रमाणात घडले. ते आघात होत असताना काहीजण दुखावले, काहींना यातना झाल्या असण्याची शक्यता जरूर आहे. या निमित्ताने हे सारे अध्वर्यु समीक्षेवर जाहीर काय बोलतात, (विशेषतः समीक्षकांसमोर) ते समजले !

दोन दिवसांच्या मेळाव्यात समीक्षा आणि समीक्षक यांच्याबद्दल अनेक मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यातल्या काही मुद्द्यांचा ऊहापोह करण्याचा विचार आहे. प्रभाकर पणशीकरांच्या ज्या एका विधानामुळे सारी सभा क्षणस्तब्ध झाली किंवा सुन्नही झाली, ते विधान म्हणजे 'या मेळाव्यात समीक्षक कोण आहेत?' अशा प्रकारची विधाने सभा जिंकण्यासाठी मोहक असतात. काही श्रोत्यांना अशा विधानांचा–वाक्यांचा होणारा परिणाम सुखावणाराही असतो. प्रश्नात्मक बोलण्याच्या पद्धतीतून काही वेळेला अनवस्था प्रसंगही निर्माण होण्याची शक्यता असते. समजा असे कोणी विधान करताच आठ–दहा समीक्षक एकामागे एक असे उभे राहिले असते तर कदाचित वेगळेच नाट्य निर्माण झाले असते ! कदाचित अनवस्था प्रसंग उद्‌भवला असता; पण तसे घडले नाही. कारण उपस्थित समीक्षकांनी दाखवलेला संयम आणि सभेची शिस्त ! उपस्थितात किमान आठ–दहाजण तरी असे होते की ज्यांना नाट्यसमीक्षक म्हणून निश्चित मान्यता आहे ! उलट्या पद्धतीने बोलायचे तर रंगभूमीच्या क्षेत्रात शेकडो कलाकार आहेत त्यातले प्रथम श्रेणीचे नट किती ? का तोंडाला रंग लावला की सारेच 'नट' या पदवीला प्राप्त होतात. तीच गोष्ट दिग्दर्शकांची आहे. ज्यांना सर्वार्थाने दिग्दर्शक म्हणावे किंवा मानावे असे दिग्दर्शक किती ? नाटककार आणि नाट्यलेखक असा कितीसा फरक आपण करतो ? संवादवजा नाट्यलेखन करणारांपासून आपल्याकडे किर्लोस्कर (किंवा जागतिक पातळीवर शेक्सपिअर) या सर्वांना आपण नाटककार या नावानेच संबोधतो. तसे खरे नाटककार किती ? रंगभूमीत समीक्षकांची जमात क्रमाने शेवटी येणारी आणि मूठभर असणारी. त्यात 'समीक्षक' पदवीला जाणारे किती याचे उत्तर पणशीकर आणि अन्य मंडळींनाही मनोमन माहीत आहे ! अशा विधानात सत्यापेक्षा आवेश अधिक असतो हेच खरे !

### समीक्षा प्राध्यापकी ?

रंगभूमी व्यवहाराविषयीच्या उणीवांची चर्चा सुरू झाली की, त्यामध्ये चांगली समीक्षा नाही हे वारंवार बोलले जाते. तसेच जी काही समीक्षा होते ती करणारांमध्ये प्राध्यापकांचा भरणा आहे, ही समीक्षा प्राध्यापकी आहे असेही आवर्जून बोलले जाते. या मेळाव्यात तेंडुलकरांनी हे नमनाचे विधान केलेच. या विधानात त्यांना प्राध्यापकी समीक्षेवरचा राग व्यक्त करायचा आहे की ज्यांची समीक्षा मान्य नाही त्याच्या कारणांत ते प्राध्यापक आहेत हे एक कारण सबळपणाने वापरायचे आहे ? नेमकेपणाने सांगणे अवघड आहे; पण हे त्यांचे विधान जुनेच आहे. विधान जुने किंवा नवे असो तो प्रश्न नाही. प्रश्न असा की, नाट्यसमीक्षा करणारांमध्ये काही प्राध्यापक आहेत त्यामुळे वावगे काय होते ? साहित्याच्या क्षेत्रात समीक्षक म्हणून नावाजलेल्या मंडळींमध्येही प्राध्यापकांची नामावली मोठी आहे. त्यांचा बौद्धिक दर्जा, साहित्याचे आकलन आणि अभिव्यक्त होण्याची पद्धती ही सामान्य दर्जाची मानावयाची का ? तीच गोष्ट कलेच्या–रंगभूमीच्या क्षेत्रात सांगता येईल. समीक्षक प्राध्यापकांचे वाचन, बहुश्रुतता, संकल्पनांचे भान, भाषेची जाण आदी गोष्टींचा लाभ समीक्षेला घडला तर वाईट काहीच नाही. जेव्हा ती समीक्षा प्राध्यापकाच्या विद्वज्जडतेने वाकली जाईल, शब्दांच्या जटिलतेने दुर्बोध होईल तेव्हा त्याची प्रतिक्रिया समीक्षकाला सोसावीच लागेल. त्यातले हीण निघून गेल्यावर जे काही हाती सत्त्वयुक्त राहील ते रंगभूमीला उपयोगी पडणारे आहे, पडत आलेले आहे. 'प्राध्यापकी समीक्षा' म्हणताना आणखी एक खोच आहे, ती म्हणजे जे लोक सर्जनशील नाहीत, ज्यांना कलेच्या क्षेत्रात नवनिर्मिती करता आली नाही, येत नाही ते समीक्षक होतात. खरे तर हे विधानही जुनेच आहे. यात तर्कापेक्षा तर्कट अधिक आहे. जो कलावंत स्वतः कलानिर्मिती करतो किंवा त्या निर्मितीत सहभागी असतो त्याने जर समीक्षा लिहिली तर हवीच आहे; पण लिहिणारे कलावंत किती ? स्वतःपलीकडे जाऊन कलाकृतीच्या समग्रतेचे वस्तुनिष्ठ भान किती कलावंतांना आहे ? स्वतःच्या कोशात मग्न असलेले, जराही प्रतिकूल समीक्षा झाली की हळवेपणाने अस्वस्थ होणारे आपले कलावंत दुसऱ्याबद्दल तपशिलात जाऊन, अभ्यासपूर्ण लिहू शकतील ? चार–दोन अपवाद सोडले तर उत्तर नकारार्थीच आहे !

नाट्यसमीक्षेबद्दल बोलताना विशिष्ट वृत्तपत्रांतली समीक्षा डोळ्यांसमोर ठेवून सतत बोलणे होते; पण तेवढीच समीक्षा असते. वृत्तपत्रीय समीक्षा, साप्ताहिके, नियतकालिके यातून होणारी समीक्षा, ग्रंथपातळीवर होणारी समीक्षा असे भिन्न भिन्न स्तर आहेत. सर्वच समीक्षा एकाच मापाने मोजून निकालात काढण्यात मतलब काय? यातल्या

प्रत्येक स्तराच्या गरजा वेगळ्या, लेखनाला मिळणारी जागा, मिळणारे मानधन, उपलब्ध असलेला वेळ, मिळणाऱ्या सुविधा ह्या सर्वांची एकत्रित गल्लत करून भागणारे नाही. अशा या समीक्षकांना प्रशिक्षण ( ट्रेनिंग ) देऊन काही होईल का ? विजया मेहतांनी हा मुद्दा मांडला. त्या नुकत्याच जर्मनीत 'हयवदन' नाटकाचा दौरा करून आल्या. तिथे समीक्षकांसाठी सप्तवर्षीय प्रशिक्षण कसे असते, त्याचे तपशीलवार वर्णन करून त्यांनी तसे काही करता येईल का असा विचार मांडला. हा मुद्दा विचारात घेण्याजोगा जरूर आहे; पण तेवढा एकच मुद्दा ध्यानात घेऊन चालणारे नाही. जर प्रशिक्षण द्यायचेच असेल तर रंगभूमीतील इतर घटकांचाही त्यात अंतर्भाव हवा. केवळ समीक्षकाला प्रशिक्षण देण्याची गरज काय असा प्रश्न निर्माण होईल. आज आपल्याकडे नट, नाटककार, दिग्दर्शक, तंत्रज्ञ व्हायला कोणत्याच प्रशिक्षणाची अट नाही, गरजही वाटत नाही. अपुऱ्या, अर्धवट ज्ञानाच्या बळावर आणि बऱ्याचशा उत्साहावर एखादा माणूस रंगभूमीच्या क्षेत्रात येतो. अनुभवाने काहीबाही शिकतो, मिळेल तशी संधी पकडतो. तशी त्याला कोणतीच कलात्मक शिस्त प्रवेशाच्या वेळी आपण अपेक्षित नाही. त्यातून मिळते त्याला अमाप यश मिळते, नाही त्याला काही नाही. अखेरीस तो दैववादी बनतो. या क्षेत्रात ( मग ते समीक्षकाला असो की कलाकाराला असो ) मिळणारे प्रशिक्षण हे मर्यादेपर्यंतच असणार. त्याच्या बळावर प्रत्येकाची वाटचाल ज्याच्या त्याच्या आवाक्यावर आणि अवसनावर अवलंबित राहणार; पण तसे घडायला देखील रंगभूमीमध्ये वातावरण निर्माण व्हायला हवे. रंगभूमीच्या अध्वर्यूंनी पुढाकार घेऊन, निर्माण करायला हवे. विजयाबाईंनी मेळाव्यात सुचवलेली ही प्रशिक्षणाची कल्पना आपल्याकडच्या परिस्थितीनुरूप प्रयोग म्हणून करून पहायला हरकत नाही. दुसरी एक कल्पना पुढे आली ती म्हणजे परप्रांतातील रंगभूमीचे दर्शन समीक्षकांना घडविण्याची किंवा त्यांना त्यासाठी अभ्यासवृत्ती देण्यासंबंधी ! ही कल्पना स्वागतार्ह आहे. महाराष्ट्र शासनाचे सांस्कृतिक संचालक प्रा. कमलाकर सोनटक्के यांनी या अभ्यासवृत्तीसंबंधी शासन पुढाकार घेईल याची जाहीर ग्वाही दिली.

अशा काही खोचक-बोचक आणि काही सुखद प्रश्नांची चर्चा मेळाव्यात झाली. कोणत्याही क्षेत्रातल्या प्रश्नांची गुंतागुंत एकाच मेळाव्यात-भेटीत सुटत नसते. या मेळाव्याने नाट्यसमीक्षकांच्या काही प्रश्नांच्या विचारांना आरंभ झाला हेही कमी फलित नाही. हा आरंभमेळावा पुढिलांना निश्चितच दिशा देऊ शकेल ! □

पुस्तके

## अस्वस्थ मनाचा उद्विग्न आविष्कार

# 'ग्रासलेला सूर्य'

महाराष्ट्र राज्य साहित्यसंस्कृतिमंडळाच्या अनुदानाने प्रकाशित झालेला आणि नुकताच १९७८ ते १९८० तील उत्कृष्ट साहित्यकृतींना 'राज्यपुरस्कार' लाभलेल्या चाळीस पुस्तकांपैकी प्रा. शरद देशमुख यांचा 'ग्रासलेला सूर्य' हा एक कवितासंग्रह. या संग्रहाला कै. गुरुजींची (नरहर कुरुंदकर) दीर्घ अशी प्रस्तावना लाभलेली आहे. गुरुजी नावाच्या या विशाल वटवृक्षाने मराठवाड्यात जी एक नवोदित लेखकांची पिढी घडवलीय, त्यांपैकी हा एक कवी. कै. गुरुजी प्रस्तावनेत म्हणतात, 'प्रस्तावनाकाराने मुख्य म्हणजे पाठराखणी करावयाची गरज आहे असे मला वाटत नाही, पण माया वेडी असते. आपल्या विद्यार्थ्यांच्या संग्रहास आपण चार शब्द जोडावेत अशी ओढ अनावर असते म्हणून हा प्रपंच. या निमित्ताने गुरुजींनी जी एक दीर्घ प्रस्तावना दिलेली आहे, ती आजच्या पिढीतील कवींच्या काव्याकडे पाहाण्यासाठी रसिक वाचकांना लाभलेली एक दृष्टीच होय.

'ग्रासलेला सूर्य' वाचून झाल्यावर प्रथम जाणवते ते म्हणजे कवीची सामाजिक बांधिलकी. या बांधिलकीतून कवी जेव्हा जीवनाच्या सर्वांगाचे चिंतन करतो तेव्हा त्याचे मन 'ग्रासलेल्या सूर्या'सारखे अस्वस्थ व उद्विग्न दिसते. मानवी जीवनातील विसंवाद टिपणारा हा कवी आक्रमक व विद्रोही बनतो. संस्कृतीच्या नावाखाली असंस्कृत वागणाऱ्या तरी पण संस्कृतीचा जयघोष करणाऱ्या मतलबी, दांभिक, ढोंगी प्रवृत्तीवर कवी तोफ डागतो. नैतिकतेचा मंत्र जपणाऱ्या पण वासनेच्या गटारात लोळणाऱ्याविरुद्ध कवी ठामपणे उभा आहे. शहर नावाच्या जंगलात माणूस नावाचा पशू जेव्हा आपले भक्ष्य शोधतो तेव्हा कवी म्हणतो-

'बाजारात होतात सौदे ।<br>
स्त्रियांचे लिलाव जंगलाच्या प्रत्येक झाडांवर बसलाय कावळा ।<br>
विष्ठा उकरत......'

ही गिधाडी वृत्ती पाहून कवीचे मन बंडखोर व विद्रोही बनते. हा कवी विद्रोहाकडे विध्वंस म्हणून पाहात नसून समाजपरिवर्तनाचे हत्यार म्हणून पाहातो. समाजातील वाढती भोगवादी प्रवृत्ती पाहून कवी अस्वस्थ होतो व आपली 'स्लोगन' या भोगवाद्यांवर डागतो.

'प्रेतावर संभोग करणारी मानवी गिधाडे,<br>
त्यांच्या प्रवृत्तींना फोडून काढण्यासाठी<br>
प्रत्येक खिडी खिडीतून लढत राहीन<br>
त्यांच्याशी...'

अनेक खिडीतून 'स्लोगन' डागणारा हा बंडखोर कवी आपले नाते सांगतो ते ज्यांनी आयुष्यभर दुःख, दैन्य, दारिद्र्य, अज्ञान उराशी कवटाळलेले अशांशी. हे संपविण्यासाठी कवीने जागोजाग सुरुंग पेरून ठेवलाय, हे काम सफल करण्यासाठी कवी आपल्याकडे साथ मागतो आहे. सभ्यपणाचे कोट पांघरून असभ्य वागणारी वृत्ती कवीची लक्ष बनते. व्यवहार आणि तत्त्वज्ञान यांच्यातील विसंवाद जाणवतो, मूल्यांची राखरांगोळी होते. या विसंवादाची अपत्ये समाजात रंगी-बेरंगी चेहरे घेऊन वावरताना

कवी ते अस्वस्थ मनाने न्याहाळतो. या दृष्टीने 'अॅबॉर्शन' कविता अतिशय बोलकी आहे. नीतिमूल्यांचा जयघोष करणाऱ्या पण अनैतिक मार्गाने 'संभोगातून' समाधीकडे जाणाऱ्या माता-पित्यांना आईच्या उदरातील गर्भ अनाउन्समेन्ट करतो आहे की, तुम्ही आमचे संगोपन करण्यास असमर्थ असाल तर या नादान, भेकड, जगात जन्म घेण्याची आमची इच्छा नाही, तेव्हा 'अॅबॉर्शन' करा !

'हरे राम हरे कृष्णाच्या' नावाच्या खाली वाढलेल्या आमच्या संस्कृतीने समाजाला हजारो बेवारशी अनाथ कर्ण दिले, तेव्हा उद्विग्न मनाने कवी म्हणतो—

'एखादा सखाराम रंगमंचावर फिरतो आहे, तर
हजारो सखाराम समाजात जगत आहेत,
मेलेल्या वासनांना चेतना देत हा एक विसंवादच.

सामाजिक सांस्कृतिक चिंतनाबरोबरच कवी राजकीय चिंतन करीत आहे. राजकीय व्यासपीठावरील भ्रष्टाचाराने काळवंडलेल्या चेहऱ्यांची 'क्रांती' च्या नावाखाली द्रोहाची ठिणगी पेटविणाऱ्या व जातीयवादाविरुद्ध शंख करणाऱ्या पण जातीयवादास खत-पाणी घालणाऱ्या दांभिकतेची कवी उपहास व उपरोधपणे टिंगल करतो आहे.

'जुन्या पाट्या बदलून नव्या लावणे,
हीच आमच्या मते क्रांती आहे.'

राजकीय व्यासपीठावरील हा गारुडी क्रांतीच्या फसव्या घोषणा देऊन मतदानाच्या झोळ्या भरून घेऊन जातो. तेव्हा कवी मतदारांना म्हणतो, हल्ली तुम्ही डूख धरणं सोडून दिलंय. तुमच्याही हातात 'उमेदवारांना' झुलविण्यासाठी गाजराची पुंगी आहे; पण वाजविण्यापेक्षा मोडून खाणंच तुम्हाला अधिक माहीत असल्यामुळे, कवी व्यथित होतो.

स्वातंत्र्य-समतेचा पुरस्कार करणारा हा कवी सामाजिक विषमतेची दरी पाहून 'विषण्ण व अस्वस्थ होतो. आश्वासनांची खैरात उधळून निघून आलेल्या बांडगुळांना कवी म्हणतो— 'तुम्ही सतेवर आपली पोळी चांगलीच भाजून घेतली. आम्ही मात्र दुःखाला कुरळोत, कुरतडोत अश्रूंचे ठेकेदार बनलो. शेवटी..

'आता बोंबलणेच आमचा मंत्र आहे,
तेच आमचे स्वातंत्र्य आहे'

भावनात्मक पातळीवर वावरणाऱ्या हताश व उद्विग्न मनाचा हा सूर आहे. अद्यापही सर्वांनाच खरे स्वातंत्र्य मिळाले नसल्याची तक्रार आहे.

माणुसकीचा वारसा सांगणाऱ्या पण त्याचा लवलेश नसणाऱ्या तुम्हा-आम्हांना कवी मानवतेच्या 'आर्ट गॅलरीत' घेऊन जातो आहे. वर्णभेदातीत उच्च वर्णीय वर्गाने समाजाला दिलेली अपत्ये येथे पाहावयास मिळतात. येथे कला विकणारे कलावंत आहेत, कलेवरांशी संभोग करणारे समीक्षक आहेत, प्रस्थापित साहित्यिक आहेत. यांना उखडून टाकण्यासाठी बुलडोझरसारखे कवीचे मन आहे. मानवतेचा आदर्श सांगणारे चौकातील निर्जीव पुतळे आहेत. लुब्ध, लुसलुशीत शेपसारख्या फॅशनेबल स्त्रिया आहेत, समाज नासवणारे पांढरपेशे आहेत, तसेच आपल्याला माणुसकीचे व मानवतावादाचे नवे अर्थ सांगणारे, भूकबळी, अत्याचारित, बलात्कारित सापळे व कवटयाही आहेत. हे भव्य प्रदर्शन दाखविण्यासाठी कवी आपल्याला वेलकम् करतो आहे. सामाजिक चिंतनातून व्यक्त झालेले कवीचे हे अस्वस्थ मन आपल्याला अंतर्मुख करणारे आहे.

'मास्तर' ही पहिलीच कविता इतर कवितांपेक्षा आगळी-वेगळी असून जीवनाचा संवाद-विसंवाद टिपत जाणारी कविता आहे. प्रस्तावनेत कै. गुरुजी म्हणतात, 'ज्यांची पुष्कळ निंदा या कवितेत आहे तो मास्तर तुम्ही असणे आवश्यक असते, माझ्यात तो मास्तरपणा आहे असे मी मानतो' म्हणूनच की काय गुरुजींनी या कवितेवर दीर्घ भाष्य केले आहे. या कवितेतील मास्तर म्हणजे जगाच्या दृष्टीने वाया गेलेला अप्रतिष्ठित व कमी पगारावर काम करणारा निरुपद्रवी प्राणी; परंतु नवी पिढी घडविणारा व समाजाला वळण लावणारा हा मास्तर आपल्या विद्यार्थ्यांना सांगतो—

'जीवना' बद्दल विश्वास बाळगा
जीवन तुम्हाला उमेद देईल.'

हे तत्त्वज्ञान सांगणारे मास्तर स्वतःच उमेद गमावून जीवन जगतात. या कवितेत मास्तराचे एक मोठे दुःख आहे, ते म्हणजे 'मास्तराच्या हाताखाली शिकलेला, मोठ्या पगारावर व हुद्द्यावर काम करणारा विद्यार्थी रिटायर झालेल्या मास्तरकडे वाया गेलेली केस म्हणून उपहासात्मक दृष्टीने पाहतात हेच होय.

'म्हातारा गरुड' नावाची कविता जयप्रकाश नारायणांविषयी आदर व्यक्त करणारी कविता आहे. 'क्रांती तुझं ब्रीद, मृत्युंजय तुझा मंत्र, अग्नीची तुझी जातकुळी, प्रकाश हा तुझा धर्म' या सार्थ शब्दांत जयप्रकाशजींचं व्यक्तिमत्त्व साकारलं आहे.

जीवनातील संवाद-विसंवाद टिपणारा हा कवी शब्दांना बाह्यांगाचा सोस देत नाही तर उघडे-नागडे सत्य सांगण्यासाठी जो रोखठोकपणा असावा लागतो तो या कवीकडे आहे. भावनात्मक पातळीवर वावरणारा हा कवी विसंवाद टिपताना अस्वस्थ व उद्विग्न बनतो. बंडखोर व विद्रोहाची भूमिका घेणाऱ्या या कवीकडे क्रांतीसाठी लागणारे निग्रही-कठोर व निश्चित कार्यक्रमाची नियोजनबद्ध आखणी नाही. कारण भावनात्मक पातळीवर वावरणाऱ्या या कवीला दुभंगल्या अवस्थेत आपण 'हॅंगर' सारखे लटकून असल्याचे जाणवते. दुभंगलेल्या मनाला जोडताना शास्त्रीय चिंतनाची जोड पुढच्या प्रवासात लाभावी ही अपेक्षा.

**—प्रा. शरद देशमुख**

ग्रासलेला सूर्य
फिनिक्स प्रकाशन
पृष्ठे : ४६, किंमत : १०/- रु.


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

# केरळातील दोन 'परमेश्वर'

अजित ना. कानिटकर, त्रिवेंद्रम

त्रिवेंद्रमपासून कोट्टायम रस्त्यावर साधारण ४५ ते ५० किलोमीटरवरील कल्लरा हे गाव. 'खेडेगाव' या अर्थाने हे 'गाव' नाही. वस्ती लहानशी असली तरी येथे १० वीपर्यंतची शाळा आहे, दुबई आखाती देशांतून केलेल्या कष्टांच्या कमाईवरच्या पाचपन्नास टूरिस्ट टॅक्सिज व मोटर्स आहेत, एक चित्रपटगृहही आहे. माझ्याबरोबर युवे होर्आरग नावाचा गोऱ्या कातडीचा पश्चिम जर्मनीतून आलेला एक भटका प्रवासी वृत्तपत्रकारही आहे. गावात पोहोचल्यानंतर शाळा सापडायला वेळ लागत नाही. शाळेच्याच पटांगणात एका झाडाचा आडोसा बघून दोन-चार बाकडी टाकून त्यावर काही मंडळी बसलेली, ध्वनिवर्धकाचीही सुसज्ज व्यवस्था या लहानशा गावात आहे. १००–१२५ शाळेतील पोरे आणि तितकेच युवक प्रौढांचे लक्ष झाडाच्या आडोशाखाली बसलेल्या मंडळींकडे लागलेले आहे.

एक जण ध्वनिवर्धकाचा ताबा घेतो, सर्व जमावाकडे रोखून बघतो. बोलण्यास सुरुवात करतो– 'एक प्रश्न आहे' 'माझाही एक प्रश्न.', 'आणखी एक प्रश्न' जमावातून आणखी चार–सहा प्रश्न विचारणारे हात वर येतात. प्रश्नकर्ता बोलणे पुढे चालू करतो– 'या सर्व जगामध्ये सर्वात शक्तिमान कोण?' उत्तर एकच आहे. एकमेव आहे– 'मनुष्य-समाज' शब्दांची जागा आता गाण्याने घेतली आहे. हेच गाणे खड्या सुरात म्हणत जमावातून प्रश्नकर्ते ४–६ जण व्यासपीठाकडे येताआहेत. एकूण १२ जणांचा गट आता तेथे जमला आहे. १० पुरुष लुंगी लावून उघडेबंब आहेत! पण त्यांची राकट–पीळदार शरीरे आखीवरेखीव व सुडौल दिसताहेत. उर्वरित २ विद्यार्थिनी आहेत. गाणे पुढे चालू होते. 'ताजमहाल कोणी बांधला?' 'शहाजहान!'– 'छे अजिबात नाही.' 'मुळीच नाही' एव्हाना ताजमहाल 'बांधण्याची' क्रिया व्यासपीठावर सुरू झाली आहे. १२ चा गट इतका एकसंध व सहज सोप्या प्रतीकांतून काम करतो आहे की बांधकाम चाललेले डोळ्यांसमोर भासते आहे. त्यातलाच एकजण दगडाखाली भार न सहन होऊन पडतो आहे. त्याचे विव्हळणे...पण काम चालू आहे...गाणे चालूच आहे. 'ताजमहाल कोणी बांधला?' 'श्रम करणाऱ्या, राबणाऱ्या जनतेने!' गाणे पुढे चालू, 'ही साम्राज्ये कोणी उभारली, राष्ट्रे कोणी निर्मिली? ही सुबत्ता कोणी निर्माण केली?..' 'राज्यकर्ते, पुढारी, राजे–सरदार?'– 'अजिबात नाही–उत्तर एकच एकमेव उत्तर'– 'श्रम करणाऱ्या–राबणाऱ्या मानवाने!' असेच आणखी दोन-तीन प्रश्न, गाणे चालू आहे. गाणे संपतासंपता पुन्हा ४–६ जण श्रोत्यांकडे जाता आहेत. गाणे म्हणतच– 'उत्तर एकच आहे, एकमेव आहे, या सर्वांची निर्मिती मनुष्याने केली आहे.'

¤

'केरळ शास्त्रसाहित्य परिषद' या वैशिष्टयपूर्ण संघटनेच्या दक्षिण केरळातील 'शास्त्र-कला जथ्याचा' आजचा हा १८ व्या दिवशीचा सकाळचा पहिला कार्यक्रम चालू आहे कल्लरा या गावात.

¤

पहिल्या नांदीनंतर आता सुरू झाले आहे एक छोटे नाटक. उपस्थितांत शाळेतील विद्यार्थी असल्याने त्याची निवड केली आहे. नाटकाचे नाव आहे– 'झाड व मुलाची गोष्ट.' एका नदीकाठचे झाड, त्या झाडाशी खेळणारा मुलगा, फळे तोडून खाणारा–पानाफांद्यांशी खेळणारा. दिवस जसेजसे जातात तसे दोघेही मोठे होतात, पण एक दिवस एक 'परशु' धारी जंगल कॉंट्रॅक्टर झाडाला येऊन फांद्या कापून घेऊन जातो. छोटा मुलगा म्हातारपणी आसऱ्यासाठी येतो तो ते झाड झाले आहे निष्पर्ण. दीनवाणे होऊन हा म्हातारा फळे मागतो; पण फळे तरी तुटक्या झाडाला कोठून येणार? झाड त्या मुलाला सांगते 'मी असहाय्य आहे, मी असहाय्य आहे!'... नाटक संपले आहे, त्यात छोटे संवाद आहेत, समूहगीतही आहे, आजूबाजूच्याच चार–सहा फांद्या तोडून आणून कलाकारांनी 'झाड' तयार केले आहे. १०–१२ मिनिटांची छोटी कथा पण पर्यावरण–वृक्षसंवर्धन यांचे मर्म सांगून जाणारी.

यापुढील कार्यक्रम आहे–एक छोटा विनोदी नाटयप्रवेश 'जाहिराती.' बहुदेशीय कंपन्या जाहिरातीने सामान्य माणसाला कसे खाऊन टाकतात याचे उपहासगर्भ दर्शन घडविणारा. दातांच्या तऱ्हेतऱ्हेच्या टूथपेस्टचा या माणसावर जाहिरातीने इतका मारा होतोय की त्याचे दात गळून जायची वेळ आली आहे! अंगाला लावण्याचा साबण, सिगरेटस्, तऱ्हेतऱ्हेची तेले यांच्याबाबतीतही असेच. शेवटचे दृश्य–हाच सामान्य माणूस आजारी पडलाय आणि ५ वेगवेगळे वैद्य तऱ्हेतऱ्हेची औषधे त्याच्या तोंडात कोंबून त्याचा मृत्यूच जवळ आणताहेत! रोगी दगावला आहे व डॉक्टर्स आपापसात खिदळत आहेत!

आणखी एक शेवटचा कार्यक्रम याच प्रकारचा सूचक. शास्त्रज्ञांना वेठीस धरून कामास लावणारा एक राजकीय उद्योजक! या उद्योजकाच्या पहाऱ्याखाली व हुकुमानुसार हे शास्त्रज्ञ शोध लावता आहेत प्रयोगशाळांमध्ये आणि त्याचा उपयोग हा उद्योजक करतो आहे विरोधकांना नेस्तनाबूद करायला! पण हा भस्मासूर इतका बलिष्ठ झाला आहे की शेवटी या राजकीय उद्योजकाला खाऊनच तो मोकळा झाला आहे. अणुयुद्धाच्या वाढत्या धोक्याबद्दल व शास्त्रतंत्रज्ञांच्या विनाशाकडे नेणाऱ्या उपयोगांपासून सावध करणारे हे छोटे नाटक!

एक तासाहून अधिक वेळ कार्यक्रम होऊन गेला आहे. कार्यक्रम संपताच सर्व 'कलाकार' मंडळी, माझ्यासारखी पाहुणेमंडळी व आणखी पाच–सहाजण जवळच्याच एका घरात

न्याहारीसाठी गेलो आहोत. 'पुट्टु', 'केळी' व 'चाया' अशी खास केरळीय पद्धतीची न्याहारी घाईघाईतच होते आहे. प्रत्येकाने 'चाया'चा ग्लास स्वतःच धुऊन ठेवायचा आहे. 'संस्कार भवन–बाल वेदी'च्या कार्यालयात हा कार्यक्रम योजण्यात आला आहे. मी भिंतींवरील विविध फळे वाचेपर्यंत लुंगीधारी कलाकारमंडळी मेटॅडरमध्ये बसलीही आहेत–पुढच्या गावास प्रयाण करण्यासाठी. भिंतीवरच्या एका फलकावर लिहिले आहे– 'Go to the People; Live with them; Learn from them; Love them; Build on with what they have !'

## बारा हजार सदस्य

'केरळशास्त्रसाहित्यपरिषद' या केरळमधील वैशिष्ट्यपूर्ण संघटनेने योजलेल्या शास्त्रकला जथ्यामधील हा एक दिवस. शास्त्रसाहित्यपरिषद आहे तरी काय? त्यांच्याच एका प्रसिद्धिपुस्तकात 'नेति नेति' या प्रकारे या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.... 'परिषद राजकीय पक्ष नाही; पण परिषदेचे अनेक कार्यकर्ते राजकीय पक्षांशी संबंधित असू शकतात. परिषद म्हणजे एक धर्मादाय संस्था नव्हे की, जी मानवी मूल्यं व कळवळा अशा प्रेरणांनी काम करते; पण परिषदेच्या वतीने अनेक आरोग्ययोजना, प्रौढ साक्षरतावर्ग इत्यादी योजले जातात. परिषद म्हणजे सांस्कृतिक संघटना नव्हे; पण सर्व कलामाध्यमातून परिषदेच्या कल्पनांचा प्रसार केला जातो. परिषद म्हणजे शैक्षणिक संस्था नव्हे; पण अनौपचारिक शिक्षणाचे अनेक कार्यक्रम परिषद हातात घेते. आम्ही संशोधनसंस्थाही नाही; पण पर्यावरण, विकास प्रकल्पांचा परिणाम, समुचित तंत्रज्ञान–Appropriate Technology यावर परिषदेने संशोधन केलेले आहे! आम्ही म्हणजे ग्रामविकासप्रकल्प पूर्ण करणारी संस्था नव्हे; पण आमचा प्रयत्न शास्त्र जनसामान्यांपर्यंत पोचावे हा मात्र आहे! परिषद म्हणजे प्रकाशन–संस्था नाही; पण लोकांना आकर्षक पद्धतीने शास्त्रविज्ञानावरची Popular Science Books मात्र परिषदेने अनेक छापली आहेत. शेवट परिषद म्हणजे बुद्धिवाद्यांची संघटना नव्हे; पण शास्त्रीय दृष्टिकोण लोकांमध्ये वाढावा असा आमचा अवश्य प्रयत्न आहे....'

या 'नेति नेति' पद्धतीने केरळ शास्त्रसाहित्यपरिषदेच्या कामाचे काहीसे स्वरूप लक्षात येते. सारांशात केरळात गेल्या २१ वर्षांच्या प्रयत्नानंतर खोलवर पाळेमुळे रुजलेली जवळपास १२ हजार सदस्य असलेली ही केरळातील लोकविज्ञानचळवळ आहे. शास्त्र व तंत्रज्ञान काही मोजक्या, हितस्वार्थी मंडळींच्या कचाट्यात सापडले आहे, त्यांच्या तावडीतून त्याची सुटका करून ते जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे, खुले करणे हे या कामाचे प्रमुख उद्दिष्ट. समाजबदलासाठी, समाजक्रांतीसाठी शास्त्र, 'Science for Social Revolution' ही परिषदेच्या कामाची मुख्य घोषणा.

नाविन्यपूर्ण कार्यक्रम हा परिषदेच्या कामाचा एक निकष आहे. केरळातील जवळपास ३ लक्ष प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी 'युरेका सायन्स टॅलन्ट परीक्षा' परिषद योजते. 'शास्त्रकेरलम्' हे महाविद्यालयीन युवकांसाठीचे मासिक–२०,००० प्रती खप! 'शास्त्रगती' शालेय विद्यार्थ्यांसाठीचे मासिक तर लहान विद्यार्थ्यांसाठी 'युरेका' नावाचे एक मासिक परिषदेने नियमितपणे छापले आहे. २ वर्षांपूर्वी लहान मुलांसाठी विज्ञानतंत्रज्ञानाबद्दलच्या गोष्टी सचित्र पुस्तकांद्वारे प्रसिद्ध केल्या आणि घोषणा केली की, –'मुलांना आइस्क्रीम नको–हे सायन्सक्रीम हवे आहे–ते द्या!' या पुस्तकसंग्रहाची जंगी विक्री झाली हे ओघानेच आले.]

## शास्त्र–कला जथा

या सर्व उपक्रमांमध्ये भर पडली आहे गेल्या ५ वर्षांपासून सुरू झालेल्या 'विज्ञानयात्रेची.' १९७७ मध्ये पहिल्यांदा उत्तर केरळातून दक्षिण केरळापर्यंत ३० दिवसांच्या या यात्रेत ११ हजार कि. मी. चा प्रवास करून ९०० ठिकाणी या यात्रेने कार्यक्रम योजले. कार्यक्रमाचे विषय होते– केरळचे औद्योगीकरण, निरक्षरता हटवा, केरळातील नैसर्गिक संपत्ती–यासारखे. १९८० व १९८१ मध्ये अशीच विज्ञानयात्रा योजण्यात आली; पण त्यात भर देण्यात आला होता– नृत्य, गीत, नाट्य, समूहगीत, मूकनाट्य या कलामाध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात आलेल्या विषयांवर. १९८२ मध्ये तर वाढता प्रतिसाद पाहून उत्तर व दक्षिण केरळात प्रत्येकी एक एक असे दोन जथे– दि. २ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर– गांधीजयंती ते सी. व्ही. रामनजयंती. असे ३७ दिवस प्रवास करून विविध प्रचलित विषयांवर कार्यक्रम सादर करत होते. यंदाच्या वर्षी उत्तर, मध्य व दक्षिण केरळसाठी तीन वेगवेगळे जथे प्रवास करीत होते.

¤

कल्लरा येथे न्याहारी आटोपून कन्याकुलंगरा या पुढच्या गावाकडे २ मेटॅडोरसह आमचा प्रवास सुरू झाला आहे. कल्लरा येथे कार्यक्रम सुरू होताच एक पायलट–जीप प्रचारासाठी पुढच्या गावात गेलेली आहे. कलाकारमंडळी फक्त लुंगी लावूनच अजूनही आहेत. अर्ध्या तासाच्या प्रवासातील डुलकी ही त्यांना उत्साह देणारीच आहे. एक–दोघेजण मागच्या कार्यक्रमात जमलेले पुस्तकविक्रीचे पैसे, डब्यातले पैसे यांची मोजणी करण्यात–हिशोबात गुंतले आहेत. हे गाव कोट्टायम्–त्रिवेंद्रम् हमरस्त्यावरच आहे. मेटॅडोर थांबताच लगेच आम्ही सर्व जण बाहेर, चंडा वाजवायला एकाची सुरुवात, त्यापाठोपाठ १२ कलाकार रांगेने सभास्थानी, सर्वांत पुढचा जो आहे त्याच्या हातात शास्त्रसाहित्यपरिषदेच्या नावाचा फलक. सभास्थान म्हणजे रस्त्याकडेलाच एका झाडाखाली ध्वनिवर्धक इ. लावून तयार केलेले.

सुरुवात पहिल्याप्रमाणेच 'ओरु चोद्यम्' एक प्रश्न या गीत–नाट्याने. सर्वच ठिकाणी ते नांदीचे गाणे आहे. येथेही तास–दीडतासाचा कार्यक्रम आहे. काही कार्यक्रम पहिल्या ठिकाणी जे झाले त्याचीच आवृत्ती, काही वेगळे.

## सीता

'ही भारतीय स्त्रीची कहाणी, 'सीता' हे त्याचे प्रातिनिधिक रूप.'– निवेदन चालू आहे. समोर नाट्य चालू आहे, कोणतीही रंगभूषा-वेषभूषा इ. नसून. ही 'सीता' कशी आहे? लहानपणी तिने खेळायचे नाही, वयात आल्यावर टारगट मुलांच्या त्रासापासून बचाव म्हणून तिने घराबाहेर पडायचे नाही, लग्नाच्या बाजारात लिलावाचा सौदा होतो त्याप्रमाणे हुंडा 'घासाघीस' होऊन

तिने विवाह करायचा... (हे सर्व निवेदन नाही तर त्या झाडाखाली जिवंत नाट्य चालू आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असे उपहासाने म्हणत लुंगीधारी कलाकार लुंगी-चेच धोतर करून ब्राह्मण होऊन आलेआहेत, कपाळाला बांधलेले पांढरे टॉवेल त्यांनी जानव्यासारखे गळ्यात घातले आहे...लग्न-संस्कार, म्हणजे मंगळसूत्र घालण्याचा प्रसंग नाट्यात दाखविला जातो आहे जणू जना-वरास दोरी बांधून घरात आणण्यासारखा.) विवाहानंतर ती सासरी येते तो नवऱ्याला काम नाही, त्यामुळे तीच बाहेर रोजंदारीवर कामास जाणार, तिथल्या ठेकेदाराची तिच्या-वर वाईट नजर, याबद्दल समाजात कुचा-ळक्या व उलटसुलट चर्चा, हे सर्व काम करून घरी पुन्हा काम आहेच व दारूला पैसे माग-णारा नादान नवरा आहेच,..आणि असाच तिचा वर्षानुवर्षे चालणारा कार्यक्रम.

नाट्याचा हा विषय. वर लिहिलेल्या सर्व गोष्टी १५–२० मिनिटे पाहतो आहे. निवे-दन शेवटी... 'ही आजची सीता... भार-तीय स्त्रीची एक प्रातिनिधिक कहाणी...' दहा–वीस स्त्रीमुक्तीपरिषदांतून भाषणांनी जो परिणाम व्हायचा नाही तो या १५ मिनिटांतून होतोय. बघ्यांमधीलही काही मुली मुसमुसू रडता आहेत.

## तुम्ही काय करणार ?

कन्याकुलंगरा येथे आणखीही दोन विषय आहेत की, ज्यांची धग जनसामान्यांना जाण-वते. केरळ सरकारने यंदाचे वर्ष हरिजन–गिरिजन वर्ष म्हणून प्रकट केले व त्यात विविध योजनांमधील मुख्य योजना म्हणजे त्यांना घरबांधणीसाठी कर्जे देण्याची; पण सहीही करायला न येणारी त्यातली अनेक मंडळी आपले पैसे 'मध्यस्तां'नी हडप केल्यावर काय करणार ? त्यांची दुर्दशा दाख-विणारे एक नाट्य या गावातील कार्यक्रमात दाखवण्यात आले. आणखीही दुसरा विषय केरळांतील अस्थिर राजकारणाचा, संधिसाधू टोपीफिरवू आमदारांचा– Political Horse trading ! उपस्थित २००–२५० या विनोद प्रहसनामुळे खूष आहेत... पण शेवटी निवे-दक एकदम कठोर होऊन विचारतोय... 'तुम्ही काय करणार आहात ? असे चालू देणे योग्य आहे का ?' गंभीर सुरावर नाट्याचा शेवट झाला आहे.

कन्याकुलंगरानंतर वामनपुरम्‌मध्ये 'जी. के. पी. च्या घरी जेवणाचा कार्यक्रम आहे. जी. के. पी. म्हणजे गोपालकृष्ण पिल्ले-तो परिषदेचा एक चाहता आहे अशी माहिती बरोबरची कार्यकर्ते मंडळी देतात. जेवताना होअरिंगबरोबर पश्चिम जर्मनीतील ग्रीन पार्टीबद्दलच्या गप्पा रंगात आल्या आहेत.

¤

कन्याकुलंगरानंतर दुपारी २-३० वाजता पनयरा येथे शाळेत कार्यक्रम आहे; तो संपवून आयरुर येथे ४-३० वाजता व त्यापाठोपाठ ७-३० वाजता कोलियोकोड येथे दिवसभरा-तील शेवटचा कार्यक्रम आहे. मेटॅडोरमधून फिरून फक्त कार्यक्रम पाहण्याचेच श्रम घेणारे आम्ही पाहुणे दमलो आहोत; पण कलाकार गाडीतील डुलकीनंतर कार्यक्रमात तितक्याच ईर्षेने, लगन असल्यागत जिवंतपणा आणता आहेत. हे सर्व कार्यक्रम ज्याने दिग्दर्शित केले तो त्रिचूर School of Drama चा पदवी-धर जोस मरिमक्कल आमच्यासोबत दिवस-भर आहे. गेले २० दिवस कला–जथ्याचा असा कार्यक्रम चालू आहे असे तो सांगतो. जर्मन कवी 'ब्रेश्त' च्या पुष्कळ कल्पना आम्ही वापरल्या आहेत असेही तो सांगतो. त्रिवेंद्रमपासून दक्षिणेस ५०–५५ कि. मी.वर मरुत्तरकोणम् येथे आइन्स्टाइन जंक्शन येथे दक्षिण केरळ जथ्याचा समारोप आहे. कोलियोकोडहून त्रिवेंद्रमला परतणारी गाडी आम्ही पकडली आहे.

¤

केरळ शास्त्रसाहित्यपरिषद कार्यालयात त्यांना 'एम्. पी. सार' हा असे म्हणतात. 'सार' हा 'Sir' या इंग्रजी शब्दाचा नेटिव्ह उच्चार ! डॉ. एम. पी. परमेश्वरन् हे या शास्त्रसाहित्यपरिषदेच्या कामाच्या मागचे मुख्य संघटक–चिंतक. त्यांची पी. एच. डी. आहे अणु–विज्ञान शास्त्रातील. १९६२ ते १९६५ रशियात संशोधनासाठी होते. त्यानंतर मुंबईच्या भाभा अणुविज्ञान संशोधनकेंद्रात काही काळ होते. एप्रिल १९६६ मध्ये मराठी विज्ञानपरिषद मुंबईस स्थापन झाली. त्यात-ही त्यांचा मोठा पुढाकार होता. १९६९ नंतर मात्र शास्त्रसाहित्यपरिषदेच्या कामासाठीच डॉ. परमेश्वरन यांनी पूर्ण वाहून घेतले आहे. बुटकेसेच. गळलात शेवनम पिशवी, नाकावर घरंगळणारा चष्मा व बोलण्याचा इतका प्रचंड ओघ की, शब्दच त्यात निसटून जावेत, सदैव पायाला भिंगरी असल्यासारखी भ्रमंती ही 'एम. पी. सार' व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये ! पुस्तके प्रकाशित करून Popular Science ची पुस्तकमाला–संच तयार कर-ण्याची कल्पनाही डॉ. परमेश्वरन यांचीच. मागे एकदा भेटीत ते म्हणाले होते की, अणु-विज्ञान शास्त्रातील इंजिनिअर ते प्रकाशक असा माझा प्रवास आहे ! या पुस्तकविक्री-तून मिळणारा पैसाच परिषदेच्या कामासाठी वापरला जातो. परिषदेच्या राजकीय भूमिके-बद्दल काय तर परिषद ही राजकीय संघटना नाही असेच त्यांचे उत्तर होते. हे म्हणजे संघ 'संघ म्हणून भाग घेणार नाही, स्वयंसेवक व्यक्तिगतरीत्या भाग घेऊ शकतात.' या विधानासारखे आहे किंवा विश्व हिंदू परि-षदेने संघाशी आमचा काही संबंध नाही हे म्हणण्यासारखे जसे आहे तसे शास्त्रसाहित्य-परिषदेने कम्युनिस्टांशी आमचा काही संबंध नाही असे म्हणल्यातले आहे; पण डॉ. एम. पी. ना भेटणे हा एक चैतन्यमूर्तीस भेटल्या-नंतर मिळणाऱ्या अनुभवासारखा आहे.

## भारतीय विचारकेंद्र

त्यांचेही नाव 'परमेश्वर' आहे. त्यांच्याही नावात 'पी.' आहे; 'एम्' मात्र नाही; पण त्यांच्याशी संबंधित मंडळी त्यांच्याबद्दल बोलताना 'परमेश्वरजी' असा आदरपूर्वक उल्लेख करतात. त्रिवेंद्रम व केरळात गेल्या दोन वर्षांपासून सुरू झालेल्या 'भारतीय विचारकेंद्र' – 'Centre of studies for National Reconstruction' या संस्थेचे ते संचालक आहेत.

¤

प्रत्येक संघटना–संस्थेची विशिष्ट कार्य-पद्धती–वर्तनपद्धती हळूहळू निर्माण होत असावी. केरळात व्यक्तीच्या नावापुढे 'जी' किंवा 'चेटन्' (चेटन् याचा पल्यळम अर्थ-बंधु) लागला की हट्कून समजावे की हा माणूस संघाचा आहे ! कम्युनिस्ट पद्धतीत इंग्रजी आद्याक्षरांनी हाक मारायची. AKG म्हणजे A. K. गोपालन, E. M. S. (नंबु-द्रिपाद) M. P. sir इत्यादी. ही कार्यपद्धती –वर्तनपद्धती सर्व प्रकारे कार्यकर्त्यांमध्येही त्या त्या संघटनेच्या संक्रमित होत असावी.

जसे महाराष्ट्रात गौरवर्णीय रुंद कपाळाचा मिशा असणारा तरुण बहुधा संघाचा, रंगी-बेरंगी तीनहून अधिक गुंड्यांचा झब्बा घालणारा प्रबोधिनीचा किंवा पायजमा–झब्बा–शबनम बरोबर समाजवादी असे ठोकताळे सहसा चुकणार नाहीत तसे बहुधा केरळात आहे. 'भारतीय' शब्द कोठेही आला की तो प्रकल्प संघाचा व People हा शब्द जेथे असेल तो प्रकल्प कम्युनिस्टांचा असे डोळे झाकून म्हणायला हरकत नाही. संघपरिवारातील वक्ते साधारणत: भाषणाची सुरुवात –'प्रियपट्टा सहोदरे, सुहुर्तकळे' (प्रिय बंधु–मित्रहो) अशी करणार तर कम्युनिस्ट-वक्ते 'कॉम्रेड–सखाकळू' अशीच करणार ! शास्त्रसाहित्यपरिषदेच्या त्रिवेंद्रम कार्यालयाचे नाव आहे 'पद्धतीभवन', भारतीय विचारकेंद्रकार्यालयाचे नाव आहे 'संस्कृती-भवन' !

□

पी. परमेश्वरन् यांचेही नाव केरळात नवीन नाही. सुरुवातीस संघाचे केरळातील प्रचारक, त्यानंतर जनसंघाचे कार्यकर्ते, अखिल भारतीय उपाध्यक्ष, त्यानंतर आणीबाणीनंतर दिल्लीतील दीनदयाळ संशोधन संस्थेचे संचालक, विशाल हिंदू संमेलनाचे अध्यक्ष व गेले दोन–अडीच वर्षे केरळातील भारतीय विचारकेंद्राचे संचालक अशी विविध क्षेत्रे त्यांनी अनुभवली आहेत. परमेश्वरजींचे वक्तृत्व हे भारावून टाकणारे, भावनोत्कट असते असे पुष्कळदा अनेकांच्या अनुभवास येते. अलिकडच्याच त्यांच्या 'Is Vivekananda a socialist' या वृत्तपत्रातील लेखाने कम्युनिस्ट बुद्धिमंतांत एकच खळबळ उठवून दिली होती.

१९८२ विजयादशमीच्या मुहूर्तावर दत्तोपंतजी ठेंगडी यांच्या उपस्थितीत भारतीय विचारकेंद्राची केरळात सुरुवात झाली एका अर्थाने कम्युनिस्टांच्या प्रयत्नांना विधायक शह देण्यासाठीच हा उपाय असावा. केरळातील मुस्लिम–ख्रिश्चन दबावगटांचेच राजकारण, कम्युनिस्ट पक्षाची खोलवर गावागावातील पक्षसंघटना, हिंदूंमधील जातींमधील संघटित होऊन चाललेली भांडणे इ. विविध प्रश्नांच्या पार्श्वभूमिवर, या अशा परिस्थितीत योग्य दृष्टिकोन मांडण्याची आवश्यकता, विचारकेंद्राच्या स्थापनेमागची महत्त्वाची प्रेरणा आहे. त्यांच्याच एका पुस्तिकेत लिहिल्याप्रमाणे– 'भारतीय मूल्यांची मूलभूत चौकट आधारभूत धरून विविध राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांचा अभ्यास–त्यावर उपाय–उत्तरे शोधण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. शास्त्र–तंत्रज्ञान यांचे उपयोजनही या दृष्टिकोनातून करायला हवे. काही मंडळी 'शास्त्रीय दृष्टिकोन यायला हवा' असा प्रचार करताना हिंदूंच्या श्रद्धांचे हेतुपुरस्सर खच्चीकरण करू पाहता आहेत. त्यामुळे स्वदेशी शास्त्रचळवळ आवश्यक आहे, we need social- sociological missionaries, we need economic missionaries, we need political missionaries, we need educational missionaries and above all, we need cultural and spiritual missionaries.' –असा त्या पुस्तिकेचा समारोप केला आहे.

## सांगड आवश्यक

गेल्या दीड–दोन वर्षात भारतीय विचारकेंद्राच्या १२ शाखा केरळात सुरू केल्या आहेत. Relevance of Vivekanada today, स्वा. रंगनाथानंद यांचे भाषण, स्वदेशी शास्त्रचळवळीवर परिसंवाद, दि. ७ नोव्हेंबर हा सर सी. व्ही. रामन यांचा जन्मदिवस 'राष्ट्रीय शास्त्रदिवस' म्हणून साजरा करण्याची कल्पना इ. कार्यक्रमांमुळे तथाकथित विचारवंत' विचारकेंद्राकडे आकर्षिले जातील असे दिसते का ?

एका अर्थाने केरळात हा लढा विविध क्षेत्रात चालू आहे. बाल स्वयंसेवक–तरुण स्वयंसेवक–विद्यार्थीपरिषद, भारतीय मजदूर संघ–वनवासी कल्याण आश्रम ही एक साखळी तर बालसंघम्–S. F I – C. P.M. party member – CITU ही दुसरी साखळी ! 'बालसंघम्' ही कम्युनिस्टांची बालांची शाखा ! गेल्या आठवड्यात त्यांची एक जंगी घोषयात्रा निघाली होती– घोषणा होत्या वाढत्या अण्वस्त्राबद्दलच्या व त्यातून उद्भवणाऱ्या युद्धाबद्दलच्या धोक्याच्या ! धोक्याच्या ! मणिपूर १९७९ दौऱ्याची आठवण झाली. तेव्हा तेथील एक पत्रकार म्हणाले होते, 'मणिपुरी माताकी जय' सगळे शिकवतात, 'भारत माताकी जय' कोणीच म्हणायला येथे शिकवत नाही. तशातलाच हा प्रकार. संघाचे याला उत्तर 'बालगोकुलम्'– दरवर्षी कृष्णजन्माष्टमी 'बालगोकुलम्' चे मेळावे–मिरवणुका निघतात. त्यांच्यासाठी कथाकथन–गाणी इ. कार्यक्रम असतात.

□

शास्त्रसाहित्यपरिषद जथा पाहिल्यानंतर जसे जसे दिवस जाता आहेत, तसे तसे मनातील प्रश्न सुटण्याऐवजी वाढतच जात आहेत. राष्ट्रवादी शक्तींनी अशा चळवळी का हातात घ्यायच्या नाहीत ? त्यांनी केवळ 'वैदिक गणित' आणि 'कौटिल्य–चाणक्याने सांगितलेले अर्थशास्त्र' हेच विषय धरून का बसायचे ? समुद्रगुप्तकाळात येथे Metalurgy प्रगत होती या संशोधनापेक्षा जनसामान्यांच्या प्रश्नांना भिडणाऱ्या चळवळी त्यांनी का घ्यायच्या नाहीत ? आणि एम. पी. परमेश्वरांनाही त्या नाटकाचे नाव 'सीता' च का ठेवावेसे वाटले ? खरं तर अशा 'झरीना', 'मेरी' किती तरी आहेत; पण 'सीता' ठेवून भारतीय स्त्रीत्वाच्या आदर्शाचा जो मानदंड त्यालाच धक्का पोचवण्यासाठी 'सीता' हे नाव ठेवले जाते. 'आइन्स्टाइन जंक्शन' आमच्याकडे असू शकते; पण डॉ. भाभा, सी. व्ही. रामन्, डॉ. भटनागर, डॉ. साराभाई यांच्याबद्दल का आम्हास प्रेम–आदर व अभिमान वाटू नये ? 'एकात्मता यज्ञ', 'रामजन्मभूमिविमोचन यात्रा' संघटित करण्याबरोबरीने राष्ट्रीय शक्तींनी पर्यावरणरक्षण, लोकसंख्यावाढ, चांगल्या शेतीच्या पद्धती, आरोग्यास उपयुक्त प्रदर्शने यांच्या 'यात्रा' योजण्यास काय हरकत आहे ?

प्रश्नांची यादी वाढता वाढता विवेकानंदांच्या अलीकडे वाचलेल्या पत्रांची आठवण होते– ते १०० पूर्वी सांगतात...... 'Try to get up a fund, buy some magic-lanterns, maps, globes etc. and some chemicals. Get every evening a crowd of the poor and low, even the pariahs, and then teach them about religion first, and then teach them through magic–lantern and other things, astronomy, geography etc... This is primary. You must have a hold on the masses...!' आणखी काही वर्षांनी आणखी एक महात्मा हेच जरा वेगळ्या शब्दात मांडू लागला– 'जर परमेश्वरास अवतार घ्यायचा असेल तर भाकरीच्या रूपाने घ्यावा लागेल !'

□

'एम. पी. सार' आणि 'परमेश्वरजी' यांची स्वतंत्र भारतात सांगड होऊ शकेल काय ? तशी आवश्यकता आहे काय ? अशा नव्या 'परमेश्वराची' खरंच आम्हाला आवश्यकता आहे का ?

□

**श्रीग्रामायन**

**बलसागर**

या पूर्वीच्या दोन पुस्तकांप्रमाणेच

**निर्माणपर्व**

या प्रस्तुत पुस्तकाचा विषय आहे विकसनशील, स्वावलंबी भारत.
एका खळबळजनक कालखंडातील हे चिंतन. चळवळीतील प्रत्यक्ष सहभागाची पार्श्वभूमी लाभलेले – शहादे चळवळ, जेपींचे बिहार आंदोलन, आणीबाणी, जनता पक्षप्रयोग, ग्राहकचळवळ, म्हैसाळप्रयोग . . .

★

श्रीग्रामायन या पुस्तकाबद्दल एका तरुण वाचकाने लिहिले होते – ' ग्रामीण भारताच्या वाटांचा शोध घेणाऱ्या कोणाही कार्यकर्त्याला ' श्रीग्रामायन ' मध्ये रेखाटलेली या ग्रामजीवनाची चित्रं आजच्या काळात आणि संदर्भात तितकीच ताजी वाटावीत, अशी आहेत. कदाचित त्यांना वाट पुसतच एखादा पुढली चित्रं चितारू शकेल. '

याच वाचकाने ' बलसागर ' बद्दल लिहिले होते – ' विविध विचारधारांना खुल्या मनाने लेखक येथे सामोरा जात आहे. त्यांचे सुस्पष्ट व तर्कसंगत विश्लेषण येथे आहे आणि आजच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाची नवी मांडणी करण्याचा प्रयत्नही आहे. '

या पुस्तकात, या ' निर्माणपर्वा ' तही हा प्रयत्न आहे.

एक नवी मांडणी आहे. समन्वयाचे पूर्वसूत्र आणखी पुढे नेले आहे . . .

★

**हा समन्वय कोणत्या शक्तींचा ? कोणते प्रवाह एकत्र यायला हवेत ?**

# ॥ निर्माणपर्व ॥

हे पुस्तक याचा शोध घेणारे आहे.

**लेखक : श्री. ग. माजगावकर**

**राजहंस प्रकाशन**

**मूल्य चाळीस रुपये**

पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे.